# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १९ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६५ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण

तभा वृत्तसेवा / विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १८ :- महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले.ु.होश. ारहरीरीहींर.सीें.ळप या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे.



मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ आए. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ श्रीकर परदेशी तसेच अन्य विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ई नवीन संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सहज सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर विविध जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क (ऑनलाईन सेवा), आपले सरकार, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई पोलीस,महाराष्ट्र सागरी मंडळ, महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमी, केंद्रीय अन्वेषण ब्यूरो,पोलिस संशोधन केंद्र, (सीपीआर) पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे, महाराष्ट्र सुरक्षा दल, मुंबई वाहतूक पोलिस, एनजेडीजी । राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड, देशाच्या सेवेत भारतीय पोलीस, राष्ट्रीय तुरुंग माहिती पोर्टल, ई-प्रोसिक्युशन आदी विभागांचे जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदे बिनविरोध; आज अधिकृत घोषणा होणार

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर दि.१८ डिसेंबर : गेल्या अनेक महिन्यापासून रिक्त असलेल्या विधानसभा विधान परिषदेच्या सभापतीपदी अखेर भाजपाचे जेष्ठ सदस्य राम शिंदे यांची बिनविरोध निवड झाली आहे. विधानमंडळात त्यांचा केवळ एकमेव अर्ज दाखल झाल्याने ते बिनविरोध निवडून आले असून त्याबाबतची अधिकृत घोषणा गुरुवारी होणार आहेत.

**आमचे नेते , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी विधानपरिषदेचा सभापती म्हणून माझी निवड केली. विरोधकांनी उमेदवार न देता माझ्या निवडीला पाठिंबा दिला. बिनविरोध निवड होणे हे लोकशाहीसाठी चांगले आहे. त्याबाबत महायुती आणि महाविकास आघाडीचे आभार मानतो.या संधीचे मी नक्की सोने करेन**

**- राम शिंदे (भाजपा आमदार)**

महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेने शिंदे गटाने या पदासाठी आग्रही होता मात्र भाजपाने हे पद आपल्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या पदासाठी विद्यमान उपसभापती नीलम गोऱ्हे इच्छुक होत्या. मात्र त्यांना आत त्याच पदावर समाधान मानावे लागणार आहे.

२९ महिन्यापूर्वी तत्कालीन सभापती रामराजे निंबाळकर यांची मुदत संपल्यापासून हे पद रिक्त होते. त्यावेळेपासून गोरे ह्या पिठासन अधिकारी म्हणून काम पाहत होत्या शिवसेनेत फूट पडल्यानंतर त्यांनी एकनाथ शिंदे गटात प्रवेश केल्याने उद्धव ठाकरे गटाकडून सभापती पदाच्या निवडीबाबत वारंवार मागणी केली जात होती. अखेर हिवाळी अधिवेशनात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी या पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित केला त्यानुसार मंगळवारी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आज बारा वाजेपर्यंत सभापती पदासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत होती या कालावधीत केवळ भाजपाकडून राम शिंदे यांचाच अर्ज दाखल करण्यात आला. विरोधी महाविकास आघाडीकडून अर्ज न दाखल झाल्याने शिंदे हे बिनविरोध निवडून आले आहेत .गुरुवारी त्याबाबतची औपचारिक घोषणा केली जाईल.

## भारतीय शेतक-यांना आता शेतीफवारणीत ड्रोनची मदत घेता येणार

मुंबई : देशात कृषी क्षेत्राशी संबंधित उत्पादनांच्या निर्मितीसाठी अग्रगण्य कंपनी म्हणून ओळखल्या जाणा-या कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड आणि क्रिश-ए या दोन कंपन्यांनी भागीदारी केल्याचे आज जाहीर केले. महिंद्रा एण्ड महिंद्रा लिमिटेड फार्म इक्विप्मेंट सेक्टर कंपनीच्या व्यवसाय वृद्धीकरणाचा भाग म्हणून क्रिश ए कंपनीची निर्मिती झाली आहे. कोरोमंडल कंपनीच्या ग्रोमोर ड्राइव्हच्या माध्यमातून शेतीतील बी-बियाणे तसेच इतर कामांसाठी ड्रोन फवारणी सेवा देली जाईल. जेणेकरुन शेतक-यांच्या दैनंदिन कामकाजात हातभार लागेल.

सध्या आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांत आरपीटीओच्या प्रशिक्षित वैमानिकांकडून ग्रोमोर ड्राइव्हची सेवा दिली जात आहे. कोरोमंडल ड्रोन सेवा धक्षा मानवरहित प्रणालीच्या आधारे कार्यान्वित केली जाते. या प्रणालीच्या वापराने कंपनीला बाजारपेठेत अग्रगण्य स्थान मिळाले आहे. कंपनी ड्रोन पुरवठ्यसह पायलट प्रशिक्षण तसेच आवश्यक सर्व सेवा ग्राहकांना पुरवते. बाजारात ड्रोनसेवेच्या वाढत्या मागणीत कॉरॉमन्डेल कंपनी एक उदयोन्मुख कंपनी म्हणून उदयास आली आहे. ड्रोनसेवा पुरवताना महिंद्रा कंपनीच्या एफईएस विभागाच्यावतीने शेतक-यांना क्रिश एखेती के लिए एप हे एप्लिकेशन पुरवले जाते.

## जीएसटीच्या ५४ हजार कोटींच्या विवादित मागण्यांसाठी १.१४ लाख अर्ज अपेक्षित : उपमुख्यमंत्री अजित पवार

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १८ डिसेंबर :- महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ विधेयकातील कलम ७३ अंतर्गत वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० च्या करमागण्यांशी संबंधित व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्याची अभय योजना राज्यात लागू करण्यात आली असून ३१ मार्च २०२५पर्यंत ही देय कर रकमेचा भरणा करण्याची अंतिम तारीख आहे. त्यापूर्वी देय रकमेचा भरणा केल्यास त्यावरील सर्व व्याज व दंड माफ होणार असल्याने संबंधित व्यापाऱ्यांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी विधानसभेत केले.

योजनेसंदर्भात माहिती देताना ते म्हणाले की, राज्य प्राधिकरणाच्या अखत्यारीतील करदात्यांकडून साधारण एक लाख चौदा हजार अर्ज अपेक्षित आहेत. विवादित रक्कम ५४ हजार कोटी रुपयांची आहे. त्यापैकी विवादीत कर २७ हजार कोटी रुपयांचा त च दंड व शास्तीची रक्कम २७ हजार कोटी रुपयांची आहे. यापूर्वीचा अनुभव विचारात घेता विवादीत कराच्या सुमारे २० टक्के रक्कम योजनेमध्ये जमा होते. त्यानुसार या योजनेमध्ये सुमारे ५ हजार ५०० कोटी ते ६ हजार कोटी रुपये विवादीत कर रक्कम जमा होणे अपेक्षित आहे. यापैकी अर्धी रक्कम म्हणजे २ हजार ७०० कोटी ते ३ हजार कोटी रुपये राज्य शासनास मिळतील व उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडे जमा होईल. या योजनेमुळे व्यापाऱ्यांना सुमारे ५ हजार५०० ते ६ हजार कोटी रुपयांच्या व्याज व दंडातून दिलासा मिळेल. या अभय योजनेची माहिती करदात्यांना, वकीलांना, चार्टर्ड अकाऊंटंट, नागरिकांना होण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बाबासाहेब आंबेडकरांचा अवमानाबद्दल अमित शाहांनी देशाची माफी मागावी : नाना पटोले

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १८ डिसेंबर:

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा ज्या पद्धतीने उल्लेख केला तो अत्यंत आक्षेपार्ह आहे. भाजपाला देशाच्या संविधान निमार्त्याबद्दल किती राग आहे तेच बाहेर आले असून डॉ. बाबासाहेबांच्या बद्दल भाजपाचा खरा चेहरा जनतेच्या समोर आला आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी केली.

विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानाचा काँग्रेस पक्ष जाहीर निषेध करत आहे. त्यांनी सर्वांना जगण्याचा, व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला, त्यामुळेच आपण सर्वजण स्वाभिमानाने आपल्या देशात नांदत आहोत. भारतीय जनता पक्षाच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल जी खदखद आहे. तीच त्यांच्या बोलण्यातून व्यक्त झाली आहे. अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याने त्यांनी देशाची जाहीर माफी मागावी, अशी मागणीही पटोले यांनी केली.

विधानसभा अध्यक्ष व विधान परिषद सभापती यांची निवड बिनविरोध करण्याची परंपरा महाराष्ट्रात राहिली आहे. विधानसभेचा उपाध्यक्ष, परिषदेचा उपसभापती विरोधी पक्षांचा करण्याची परंपरा आहे ती खंडीत झालेली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे भूमिका मांडली आहे व ते याबाबत सकारात्मक आहेत. सभागृह चालवण्यासाठी विरोधी पक्षनेता नाही अशी व्यवस्था योग्य नाही. शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात विरोधी पक्ष नेता असला पाहिजे, त्यावर विधानसभा अध्यक्ष निर्णय घेतील अशी अपेक्षा आहे, असेही पटोले म्हणाले.

## बीड मतदारसंघातील महत्वाच्या प्रश्न आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात मांडले

### शहरातील पाणीपुरवठा, बंधारा, टुकूर प्रकल्पाबाबत केल्या मागण्या

नागपूर दि.१८ (प्रतिनिधी):- बीड मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाच्या आणि लोकांच्या दृष्टीने उपयुक्त परंतु प्रलंबित असलेले प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१८) रोजी नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मांडले. बीड शहरातील अनियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न, खांडेपारगाव येथील टुकूर साठवण तलाव प्रश्न आणि शहरातील बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल बांधणी करणे हे महत्वाचे विषय मार्गी लावण्याबाबतची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात औचित्याच्या मुद्यांद्वारे केली.



आ.संदीप क्षीरसागर केलेल्या मागण्या

बीड शहर पाणीपुरवठा

बीड शहराची लोकसंख्या ३ लाख आहे. बीड शहरात सध्या कार्यरत असलेली पाणीपुरवठा योजनेची यंत्रणा ही अनेक वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळे बीड शहराला पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. परंतु बीड शहराला पाणी न मिळण्याचे नेमके हे नाही, बीड शहराच्या आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करण्यासाठी अटल अमृत योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपये इतकी वीजबिल थकबाकी असल्याने या योजनेसाठी महावितरण कडून नवीन कनेक्शन दिले जात नाही आणि परिणामी बीड शहराला १५ ते २० दिवसांतून एकदा पाणी पुरवठा होतो, तेही पाणीसाठा मुबलक असताना आणि यंत्रणा तयार असताना. त्यामुळे शासनाने नगरपालिकेकडे असलेले थकीत वीजबिल भरण्यासाठी विशेषबाब म्हणून निधीची तरतूद करावी.

बिंदुसरा नदीवरील बंधारा कम पूल

बीड जिल्ह्यात पावसाचे प्रमाण हे अनियमित असते. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशी परिस्थिती बीडमध्ये असते. दुष्काळात तर साहजिकच पाणीपातळी खालावते आणि शहरातील व परिसरातील विहीर आणि बोअर कोरड्या पडतात. परंतु मुबलक पाऊस पडल्यानंतर देखील पाणी अडविण्यात नसल्याने त्या पाण्याचा उपयोग होत नाही. शहरातून जाणाऱ्या बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा बांधण्याबात गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा आणि मागणी सुरू आहे. हा पूल कम बंधारा बांधल्यानंतर एखाद्या वेळी पाऊस जरी पडला नाही, तरीदेखील अडविलेल्या पाण्यामुळे ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरातील विहीरींना आणि बोअरला पाणीसाठा उपलब्ध राहील. या बंधार्याची मंजुरी अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे या महत्वाच्या कामाला शासनाने मंजूरी आणि निधी उपलब्ध करून द्यावा.

टुकूर साठवण तलाव

बीड मतदारसंघात टुकूर साठवण तलाव प्रकल्पाची २००३ साली मंजुरी झालेली आहे. परंतु या परिसरातील गावांचा या प्रकल्पाच्या भूसंपादनाला विरोध असल्यामुळे हा प्रकल्प इतक्या वर्षांपासून रखडलेला आहे. यातून मार्ग म्हणून साठवण तलावाच्या ऐवजी नदीवर ४ निम्न पातळी बंधारे जर बांधले तर तितक्याच क्षमतेची पाणी साठवणूक होणार आहे. यासोबतच तलाव प्रकल्पाच्या तुलनेत अर्ध्या निधीतच हे काम होईल त्यामुळे शासनाचे पैसे वाचतील आणि महत्वाचा प्रश्न मार्गी लागेल. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

## अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

नागपूर,दि. १८ : माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय'ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.




ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रुट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत.

## केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ 'मविआ' आमदारांचे 'वॉक आऊट'

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर,दि.१८ डिसेंबर - संसदेत देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात उदगार काढल्यामुळे त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे सभागृहात उभे राहिले असता त्यांना बोलू न दिल्यामुळे आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी वॉक आऊट केले.

सभागृहात आम्ही गृहमंत्र्यांच्या उदगारावर निषेध व्यक्त केला असता ते रेकॉर्ड वर यावे, यासाठी सभापती यांनी वेगळी भूमिका घेतली. गृहमंत्री यांचे उदगार हे संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अपमान करणारे आहे. महायुती त्यांचा आदर करत नाही का? असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा मुद्दा राज्यातील सभागृहात उपस्थित केला जातो मग गृहमंत्री यांच्या उदगाराचा मुद्दा का उपस्थित केला जात नाही, असा सवाल करत दानवे यांनी निषेध व्यक्त केला.

## तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा अधिनियमात रूपांतरित

नगर : तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला अधिनियमात रुपांतरीत करण्यात आले. नागपुर हिवाळी आधिवेशनात विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संदर्भात मांडलेल्या विधेयकाला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरीकांनी खरेदी केलेल्या १ गुंठा, २ गुंठे, ३ गुंठे अशा क्षेत्रांचे तुकडे नियमानुकूल होण्यास मोठी मदत होईल असा विश्वास ना.विखे पाटील यांनी व्यक्त केला.

तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला १० ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेऊन मा. राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने दिनांक १५/१०/२०२४ अध्यादेश प्रसिध्द करण्यात आलेला होता. या अध्यादेशाचे आज विधिमंडळाच्या मान्यतेने अधिनियमात रुपांतर झालेले आहे.

सन १९४७ साली अमलात आलेल्या तुकडेबंदी कायद्यातील तरतुदी नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रमाणभूत क्षेत्र ठरविण्यात आले होते. मात्र याप्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण करण्यास कायद्याने निर्बंध आहे. यामुळे सर्वसामान्य नागरीकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या.

२०१७ साली करण्यात आलेल्या सुधारणे नुसार सन १९६५ ते २०१७ या कालावधीत झालेले तुकड्यांचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजार मुल्याच्या २५ टक्के रक्कम शासन जमा करणे आवश्यक होते. मात्र ही रक्कम सर्वसामान्य नागरीकांच्या आवाक्या बाहेर होती.

## संघ घोषाचा समग्र इतिहास संग्रहालयामुळे नव्या पिढीसमोर येईल

### डॉ. मोहन भागवत यांचा विश्वास

पुणे : योग्य गोष्टी समाजापुढे मांडल्या गेल्या नाहीत, तर अयोग्य गोष्टी समाजापुढे येतात. या पार्श्वभूमीवर संघाच्या घोषाचा समग्र इतिहास एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणाऱ्या घोष अभिलेखागाराचे महत्त्व खूप मोठे आहे. अभिलेखागारामुळे घोषाचा योग्य इतिहास नव्या पिढीसमोर येईल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय घोष संग्रहालयाचे उद्घाटन डॉ. भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. संघाच्या पुण्यातील



'मोतीबाग' कार्यालयात घोष संग्रहालय आणि अभिलेखागार (अर्काइव) हा प्रकल्प साकारला असून संघाच्या घोषासंबंधीची विस्तृत माहिती आणि वाद्ये येथे संग्रहित करण्यात आली आहेत. घोषासंबंधीचे ग्रंथ, पुस्तके, लेख आणि विविध प्रकारची सामग्री येथे मांडण्यात आली आहे. घोष विषयाच्या अभ्यासकांना तसेच या विषयातील तज्ज्ञांना येथे संशोधन तसेच अध्ययनही करता येणार आहे. संघाच्या घोष विभागाचा इतिहास नव्या पिढीला माहिती होणे आवश्यक आहे. पूर्वीच्या काळात घोष विभाग कसा होता आणि तो कसा विकसित होत गेला याची माहिती एकाच ठिकाणी संग्रहित असणे आवश्यक होते. हे काम येथील अभिलेखागारामुळे झाले आहे, असे डॉ. भागवत म्हणाले.

प्रांगणीय संगीताची परंपरा भारतातून लुप्त झाली होती. हे प्रांगणीय संगीत भारतीय संगीताच्या दालनात पुन्हा संघामुळेच आले. प्रांगणीय किंवा मैदानी संगीताचे पुनरुज्जीवन ही संघाच्या घोषाची विशेषता आहे, असेही डॉ. भागवत यांनी सांगितले.

**आवश्यक सर्व गोष्टी या अभिलेखागारात संग्रहित झाल्या आहेत. सर्व प्रकारची अचूक, सार्वत्रिक आणि अधिकृत अशी माहिती इथे सर्वप्रकारे उपलब्ध होईल, असे हे अभिलेखागार व्हावे.**

**डॉ. मोहन भागवत**

**सरसंघचालक, रा. स्व. संघ**

अभिलेखागार प्रमुख मोरेश्वर गद्रे यांनी प्रकल्पाची माहिती दिली. संघाच्या पश्चिम क्षेत्राचे शारीरिक शिक्षण प्रमुख सुनील देसाई यांची यावेळी प्रमुख उपस्थती होती. सुहास धारणे यांनी सूत्रसंचालन केले.




# एकदा सातबारा कोरा कराच; हेच सरकार सातबारा कोरा करू शकत

## महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विश्वास - आमदार बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली आहे ही घोषणा करत असताना कर्जमाफीच्या अनुषंगाने सरकारच्या समोर अनेक आव्हाने आहेत मराठवाड्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि अजित दादा पवार यांच्याकडून लोकांना अपेक्षा आहेत हे सरकार आमचा सातबारा कोरा करू शकता असा विश्वास लोकांमध्ये आहे आणि त्यामुळेच एकदा शेतकऱ्यांचा सातबारा सरसकट कोरा कराच अशी आग्रही मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात मांडली. मराठवाडा विदर्भात सह महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची कुटुंब आणि जिल्हा सरसकट कर्जमाफीची वाट पाहत आहे कुठल्याही प्रकारची अट शर्त न ठेवता सरसकट सातबारा कोरा कसा करता येईल यासाठी या सरकारने प्रयत्न करावेत अशी मागणी देखील यावेळी आमदार लोणीकरांनी केली.

राज्यात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वात महायुतीच्या सरकार स्थापन झाले आणि महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेसारखी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गोरगरीब महिलांना आधार देणारी त्यांना मदत करणारी योजना जाहीर केली सुरुव-ातीच्या काळात या योजनेवर विरोधकांनी टीका केली, टिंगल केली. यावेळी विरोधक म्हणाले लाडकी



बहीण योजना आणली आता लाडकी मेहुणी योजना आणा, अशा पद्धतीने गोरगरीब महिलांना मदत करणाऱ्या योजनेची अवहेलना करण्यात आली. विरोधकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या टिप्पणी आणि टीका केल्या मात्र राज्यातल्या गोरगरीब शेतकरी कष्टकरी कामगार महिलांना प्रति महिना १५०० रुपये देणारी क्रांतिकारी योजना राज्यामध्ये राबवली. परतुर विधानसभा मतदारसंघात १ लाख १० हजार महिलांच्या खात्यामध्ये राज्य सरकारनं लाडकी बहीण योजनेच मानधन टाकल आणि म्हणूनच लाडक्या बहिणीचा आशीर्वाद या सरकारला मिळालेला आहे मी या सर्व लाडक्या बहिणीचे आभार मानतो असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात केले

राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणवर चर्चा करताना विधिमंडळात माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर बोलत होते यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, महाराष्ट्र सरकारनं राज्यामध्ये ज्या कल्याणकारी योजना राबवलेल्या आहेत त्याच पार्श्वभूमीवर राज्यातल्या १३ कोटी जनतेने महायुतीचं सरकार निवडून दिला आहे. राज्य सरकारकडून जनतेच्या अनेक अपेक्षा आहेत सरकारकडून निवडणुकीदरम्यान देण्यात आलेली सर्व आश्वासने पूर्ण करण्याचे मोठे आव्हान सरकार समोर आहे. गोरगरिबांसाठी ज्या कल्याणकारी योजना राबवलेल्या आहेत, ज्या कल्याणकारी योजना शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या आहेत त्यावर अत्यंत गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन जनसामान्यांचे हित जोपासण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. महामहीम राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्र सरकारची पुढची दिशा सरकारचं कामकाज आमदारांच्या समोर अभिभाषनामध्ये मांडलेला आहे. त्यानुसार आता सरकारने आपली दिशा ठरवून कामाचा वेग वाढवणे अपेक्षित आहे असे देखील आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. आवश्यक असल्याचे मत लोणीकर यनी यावेळी व्यक्त केले जल जीवन मिशन राबवत असताना गावात पाण्याची टाकी आहे का इथपासून ते ती टाकी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने बांधलेली आहे की भारत निर्माण योजनेने इथपर्यंत लक्ष देण्याची गरज आहे मी स्वतः पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री असताना १८ ००० गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम केलं मराठवाड्याला दुष्काळाचा लागलेला डाग पासून काढण्यासाठी पाणीपुरवठा योजनेच्या संपूर्ण टीमसह आम्ही त्यावेळी तेलंगाना श्रीलंका ऑस्ट्रेलिया इजराइल गुजरात अशा सर्व वॉटर ग्रीडचा अभ्यास करून त्याचा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करून ही योजना कार्यान्वित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते मध्यंतरी महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही परंतु आता पुन्हा एकदा महायुतीचे कार्यक्षम असे सरकार आलेले आहे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मराठवाडा वॉटर ग्रीड हा ड्रीम प्रोजेक्ट आहे त्यामुळे या योजनेला नक्कीच गती मिळेल असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला लोणीकर म्हणाले की इजराइलच्या धरतीवर मराठवाड्याचा खाली वाहून जाणार पाणी उजनीच्या धरणातलं पाणी मराठवाड्यातल्या आठही जिल्ह्यांमध्ये वळवून मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहेत आणि मराठवाडा वॉटर ग्रीड माध्यमातून हा प्रयोग नक्कीच यशस्वी होऊ शकतो असा विश्वास देखील आमदार लोणीकरांनी यावेळी व्यक्त केला

## संक्षिप्त

### जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान 'सुशासन सप्ताह प्रशासन गाव की और' साजरा होणार -जिल्हाधिकारी पांचाळ



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर या कालावधीत 'सुशासन सप्ताह' साजरा करण्यात येणार असून, यात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी 'प्रशासन गाव की और' हा उपक्रम साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

सर्व विभागांमार्फत १९ ते २४ डिसेंबर २०२४ दरम्यान सुशासन सप्ताहात केंद्र व राज्य शासनाच्या सर्वच योजना गावपातळीवर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. यात नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच ऑनलाईन आणि ऑफलाईन प्राप्त तक्रारींचा निपटारा केला जाईल. तहसीलदार आणि गटविकास अधिकारी, नगर पालिका प्रशासन व इतर विभागांमध्ये योग्य समन्वय ठेवून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.



**मोती तलावाच्या बाजूला असलेल्या स्विमिंग पूल बऱ्याच दिवसांनी बंद पडलेला होता त्याचे काम पुन्हा सुरू करण्यात आले. (छायाचित्र किरण खानापुरे)**

### हर्ष बागल यांना होमी भाभा परीक्षेत यश



**परतूर/प्रतिनिधी**
**तभा वृत्तासेवा**

येथील विवेकानंद इंग्रजी स्कुल येथील इय्यता ६ तील विद्यार्थी हर्ष जगन्नाथ बागल याची नुकत्याच झालेल्या होमी भाभा परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. यात त्याची पुढील प्रात्यक्षिक फेरी साठी निवड झाली असून त्याच्या या यश बदल सस्था अध्यक्ष शेषराव बाहेकर, समिती अध्यक्ष संदीप बाहेकर ,वडील रवीं जगन्नाथ बागल सह अनेकांनी अभिनंदन केले.

### मंगलदिप पगारे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन /प्रतिनिधी**

शहरातील रहिवाशी व वंचित बहुजन आघाडी चे माजी शहराध्यक्ष मंगलदिप (पप्पू)साहेबराव पगारे (वय ३७) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दिनांक १७ डिसेंबर मंगळवारी
वेळ ११:३५ वा घाटी रुग्णालय औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर ) येथे दुःखद निधन झाले.मागील तीन दिवसापासून त्यांची तब्बेत ठीक नसल्याने त्यांच्यावर प्रथम भोकरदन येथे उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना औरंगाबाद येथे हलविन्यात आले होते. तेथे शासकीय रुग्णालय घाटी येथे उपचार सुरु असतानाच त्यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर मंगळवारी रात्री उशिरा भोकरदन येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, काका, दोन भाऊ, एक बहीण, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

## पुणे येथील पुस्तक महोत्सवात छोट्या लेखिकेने वेधले वाचकांचे लक्ष

### एका दिवसात शंभर पुस्तकांची विक्री माजी मंत्री विनोद तावडे,ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी केले आराध्या नंदकरचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

आराध्या राजीव नंदकर या अवघ्या ११ वर्षीय छोट्या लेखिकेच्या सारा पार्कर अँड द मॅजिकल ओरब या मोठया पुस्तकाने पुणे येथील पुस्तक महोत्सवात वाचकांचे लक्ष वेधले असून एका दिवसात शंभर पुस्तकांची विक्री झाली आहे. दरम्यान, राज्याचे माजी शिक्षण मंत्री विनोद तावडे, ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्यासह अनेक मान्यवरांनी स्टॉलला भेट देऊन कु.आराध्या नंदकर या छोट्या लेखिकेचे कौतुक केले आहे.

राष्ट्रीय बुक न्यास मार्फत फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथे आयोजित केलेल्या पुणे बुक फेस्टिव्हल मध्ये या छोटया लेखिकेने लिहिलेल्या सारा पार्कर अँड द मॅजिकल ओरब या पुस्तकाच्या एका दिवसात १०० पेक्षा जास्त प्रती विकल्याचा विक्रम झाला आहे. त्यामुळे पुणे बुक फेस्टिवल मध्ये आराध्या राजीव नंदकर या छोट्या लेखिकेवर मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव व कौतुक होत आहे.या कामगिरीबद्दल राज्याचे माजी



शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे तसेच साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार विजेते आणि ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनीही स्टॉलला भेट देऊन तिचे अभिनंदन केले. आराध्या राजीव नंदकर ही ११ वर्षाची छोटी लेखिका असून तिने वय वर्ष १० असतांना सारा पार्कर अँड द मॅजिकल ओरब हे १४४ पानांचे पुस्तक लिहिले आहे. पुणे बुक फेस्टिव्हलमध्ये अनुराध्या पब्लिकेशन मार्फत तिचे हे पुस्तक स्टॉल क्रमांक उ-२३ मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा बुक फेस्टिव्हल दिनांक १४ डिसेंबर २०२४ ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत सकाळी ११ ते रात्री ९ या कालावधीत सुरू आहे. विशेष म्हणजे आराध्या नंदकर हिचे वडील राजीव नंदकर हे राज्यातील प्रशासकीय क्षेत्रातील एक मोठे नाव असून त्यांचीही आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

आराध्या ही वाचन संस्कृती लोप पावत असलेल्या सोशल मीडियाच्या जगात एक आशेचा किरण आहे. अनेक लहान मुले तिचे पुस्तक उपलब्ध असलेल्या स्टॉलला भेट देत असून तिच्याशी संवाद साधून प्रेरणा घेतांना आढळून आली. मुलांची मोबाईल पासून सुटका करून घ्यायची असेल तर मुलांच्या हातात पालकांनी मोबाईल ऐवजी आत्ता पुस्तक दिले पाहिजे. मुले ही आपल्या देशाची भवितव्य असून पुस्तके ही त्यांच्यावर मूल्यसंस्कार रूजवण्याची मोठी माध्यमे आहेत.आराध्या नंदकर ही पुस्तक वाचन सोबतच पेंटिंग आणि ट्रेकिंग करते. तसेच ती कराटे मध्येही ब्लॅक बेल्ट आहे. भविष्यात तिला लेखिका व्हायचे असून आपल्या देशाचे नाव साहित्य क्षेत्रात जगात मोठे करण्याचे तिचे ध्येय आहे.या कामगिरी बद्दल आराध्याचे राज्यभरातून कौतुक होत आहे.



नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे लाडकी बहीण योजनेचे शिल्पकार तथा उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची जालना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी नागपूर येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी सोबत जालना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे , व इतर मान्यवर उपस्थित होते.


## परभणी घटनेच्या निषेधार्थ जळगाव सपकाळ येथे रस्ता रोको आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

परभणी घटनेच्या निषेधार्थ दि.१६.डिसेंबर रोजी सकाळी भोकरदन तालुक्यातील जळगांव सपकाळ येथे भिमसैनिक रस्त्यावर उतरून सकाळी ८.वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे अन्वा ते रे.पिंपळगाव या मुख्य महामार्गावर ठिय्यादेत जोरदार घोषणादेत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीचे निवेदन स.पो.निरीक्षक संतोष माने पारध पोलिस ठाणे यांना देण्यात आले दरम्यान रस्ता रोको आंदोलन वेळेस पोलिसांचा चोक बंदोबस्त तैनात होता या वेळी परीसरातील भिम सैनिक मोठ्याप्रमाणात उपस्थित होते वाहतूकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती तसेच लांब पर्यंत वाहनाचे रांगा लागले होते काही काळ पुर्णपणे चक्काजाम झाला होते.

## धनराज मोकासे याची सौनिक परेडसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**पारध बु,/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथील निवासी सध्या पुणे येथे नेताजी सुभाषचंद्र बोस सौनिकीय शाळेत इयत्ता ७ व्या वर्गात सौनिकीय शिक्षण घेत असुन तो सध्या इंग्लेड येथुन आलेल्या सौनिकीय कमोंडो सोबत सौनिकीय परेड साठी त्याची निवड झाली या परेड साठी त्यांच्या वर्गातुन तो फक्त एक व शाळेतुन सात मुलांची निवड झाली असुन येत्या प्रजासत्ताक दिना निमितिने त्याला विंग कमोडो परेड साठी निवड झाली आहे तसेच दैनिक बदलता महाराष्ट्र पेपरचे प्रतिनिधी संतोष मोकासे यांचा मुलगा असुन या निवडीबद्दल जेष्ठ पत्रकार रविंद लोखंडे गजानन देशमुख कैलास दांडगे समाधान तेलग्रे रमेश जाधव सागर देशमुख तेजराव दांडगे शेख शकील रामसिंग ठाकुर अमोल शिंदे भोकरदन यांनी तसेच ग्रामपंचायत उपसरपंच शेखर श्रीवास्तव पारध पोलीस स्टेशनचे सपोनि संतोष माने सपोनि अभिजित मोरे सपोनि ज्ञानेश्वर पायघन सपोनि मुकुंद देशमुख पोलीस कर्मचारी गणेश निकम प्रकाश सिनकर भगत राजपुत संतोष कड गणेश पायघन व सर्व पोलीस कर्मचारी व पत्रकार बांधवांनी अभिनंदन करुण पुढील भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे

### माहोरा येथे आ.संतोष पाटील दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त

## ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या किर्तनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद - भोकरदन विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संतोष पाटील दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त माहोरा येथील छत्रपती शिवाजी महाराज आश्रम शाळा माहोरा येथे दि .१९ डिसेंबर गुरुवार रोजी रात्री ८ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकार ह. भ प निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून , या कार्यक्रमास मा . केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे , सौ . निर्मलाताई दानवे तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहे . माहोरा व





माहोरा पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी ह भ प निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या किर्तनास उप-स्थित राहण्याचे आवाहन राजेश पाटील म्हस्के अध्यक्ष छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती जाफ्राबाद यांनी केले आहे.

# गर्भलिंग निदान करणेकामी वापरण्यात येणारी अवैध सोनोग्राफी मशीन विक्री करणारी टोळी केली जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखा व जिल्हा सामान्य रुग्णालय जालना यांची संयुक्त कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक १८/१२/२०२४ रोजी जालना शहरामध्ये गर्भलिंग निदान करणेकामी वापरण्यात येणारी अवैध सोनोग्राफी मशिन विक्रीसाठी येणार असल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय जालना चे जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी झउझछउद्ध जालना डॉ. राजेंद्र पाटील यांना मिळाल्याने त्यांनी पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल साहेब व मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी साहेब यांना सांगितल्याने पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखा, जा-लनाचे एक पथक स्थापन करुन जिल्हा



शल्य चिकित्सक यांचेसोबत कारवाई करणेकामी पाठविले.

जिल्हा शल्य चिकित्सक श्री. पाटील साहेब यांचे पथक व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी संयुक्तरित्या गंर्भलिंग निदान करणेकामी वापरण्यात येणारी अवैध सोनोग्राफी मशिन विक्रीसाठी आलेला इसम नामे संदीप कैलास गोरे, वय-२३ वर्ष, रा. भिलपुरी, ता. जि. जालना ह.मु.महेको कंपनी फार्महाऊस, राजुर रोड, ता. जि. जालना, २) सामनाथ परसराम बारसे, वय-३० वर्ष, रा. हनुमान नगर, कमलापुर, वाळुज, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ३) योगेश शालीकराव धांडे, वय २२ वर्ष, रा.चाळगेनगर, इंदेवाडी, ता.जि.जालना यांना सापळा लावुन कलावती हॉस्पीटल समोर, जालना येथे ताब्यात घेण्यात आले व त्यांच्या ताब्यातुन एक रु.५,००,०००/- किंमतीची गर्भलिंग निदान करणारी सोन-ोग्राफी मशिन, एक स्विफ्ट डिझायर कार, एक टिव्हीएस ज्युपीटर स्कुटी असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने तालुका पोलीस ठाणे, जालना येथे झउझछउद्ध कायदयांतर्गत गुन्हा दाखल करणे चालु आहे. सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोप-ाणी, जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी झउझछउद्ध जालना डॉ. राजेंद्र पाटील, श्री.अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे मार्गदर्शनाखाली, डॉ. बेबी सरोज घोलप, जिल्हा नोडल अधिकारी झउझ-छउद्ध जालना, ॲड.सोनाली कांबळे विधी सल्लागार झउझछउद्ध जालना, डॉ. प्रज्ञा कुलकर्णी स्त्री रोग तज्ञ, डॉ.ज्ञानेश्वर वायाळ, क्ष किरण तज्ञ, शेख वसीम शेख हनीफ सांख्यिकी सहायक सर्व जिल्हा सामान्य रुग्णालय जालना, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि.श्री.योगेश उबाळे, पोउपनि. राजेंद्र वाघ, पोलीस अमंलदार सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पव्हरे, प्रशांत लोखंडे, सुधीर वाघमारे, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, इर्शाद पटेल, धीरज भोसले, सोपान क्षीरसागर, योगेश सहाणे, कविता काकस, सत्यभामा काकडे, सौरभ मुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केलेली आहे.

# शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्याकडून पोलीस, बाऊन्सरमार्फत होणारी गुंडागर्दी थांबवा

## आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केली मागणी....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जवळगा मेसाई गावामध्ये काही दिवसापूर्वी बाऊन्सरच्या माध्यमातून दहशत पसरविण्याचा प्रकार घडला होता. आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत औचिताच्या मुद्द्यामध्ये हा विषय सभागृहात मांडला. यावेळी त्यांनी पवनचक्की कंपन्यांची दहशत मोडून काढत संबधित लोकांवर योग्य कारवाई करण्याची मागणी आमदार पाटील यांनी केली.

यावेळी पाटील म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यामध्ये मागील काही वर्षांपासून पवनचक्की उभारण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु झाले आहे. त्यासाठी आवश्यक जमिनी घेताना कंपनीच्या लोकांकडून दहशत निर्माण करून शेतकऱ्यांना दमदाटी करण्याचे प्रकार वाढले आहेत. मागच्याच आठवड्यात तुळजापूर तालुक्यातील जवळगा मेसाई गावात काळ्या रंगाच्या दहा ते बारा गाड्या आल्या. त्यातून म ोठया संख्येनं बाऊन्सर उतरले व त्यांनी शेतकऱ्यांना दम दाटी केल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी पोलीस बघ्याची भूमिका घेत राहिले. अश्यावेळी पोलीस तक्रारीची वाट पाहतात अनेक प्रकरणात पोलीस स्वतः हुन कारवाई करतात. त्याप्रमाणे अश्या प्रकरणी देखील आहे.



अशीच कारवाई अपेक्षित आहे. काही ठिकाणी तर पोलीसच या कंपनीच्या लोकांना सहकार्य करताना दिसतात मग अश्यावेळी शेतकऱ्यांनी न्याय तर कोणाकडे मागायचा असाही मुद्दा उपस्थित केला.

यासाठी ही दहशत मोडून काढणे आवश्यक आहे म्हणून पोलीस व गुंडागर्दी करणाऱ्या बाऊन्सर वर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय येथे अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

संयुक्त राष्ट्राने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तूत केला आहे. त्यानुसार दरवर्षी १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय ,मुंबई यांनी देखील राज्यात १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत सूचना दिल्या आहे.

त्याचाच एक भाग म्हणून आज १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करण्यात आला. अल्पसंख्याक हक्क दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणिव करुन देण्याचे काम आयोजित कार्यक्रमातून करण्यात



आले.

जिल्हयामधील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयांनी देखील अल्पसंख्याक हक्क दिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात उपजिल्हाधिकारी संतोष भोर, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जून झाडे, धाराशिव तहसीलदार मृणाल जाधव व तहसीलदार (महसूल) अभिजीत जगताप आदीसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. धर्म यांच्याकडून एकलव्य विद्या संकुलात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

धाराशिव येथील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. प्रसाद धर्म एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यम गरवाडी (ता. तुळजापूर) येथे दर बुधवारी भेट देतात. वसतिगृहातील मुला मुलींची आरोग्य तपासणी करतात. आजारी मुलांची काळजी घेतात. आजारी मुला मुलींना मोफत औषधे देतात.

दर बुधवारी डॉ. धर्म यांची भेट होत असलेने वसतिगृहातील मुलांचे आजाराचे प्रमाण कमी होत आहे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या उद्देशाने भटके विमुक्त मुलांची एक प्रकारे सेवा करत आहेत. डॉ.अभय शहापूरकर यांच्या प्रयत्नातून प्रसाद धर्म दर आठवड्यास एकलव्य विद्या संकुलास भेट देत आहेत.

या सेवेबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुखदेव काळे, उपाध्यक्ष डा. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचीत, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, फ ुलाजी ताटीकुंडल वार, संगीता पाचंगे तसेच सर्व कर्मचारी यांनी आभार मानले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांना २५ हजार मानधन द्यावे

## प्रशिक्षणार्थींचे परंड्यात तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ डिसेंबर -**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांचा कार्यकाल वाढविण्यात यावे २५ हजार मानधन देण्यात यासह विविध मागण्या परंडा येथील प्रशिक्षणार्थी यांनी तहसिलदार मार्फत मुख्यमंत्र्या यांच्याकडे केले आहे.

सोमवार दि १६ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व आस्थापनावर ६ महिन्याच्या कार्यकाळाचे प्रशिक्षण घेत आहोत.

तसेच आमचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आम्हाला आमचा कार्यकाळ वाढवून द्यावा, आम्ही विविध विभागामध्ये जॉब करत आहोत तेथेच आम्हाला कायम सेवेची संधी देण्यात यावी. देवेंद्र फडणवीस यांनी



मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याच्या आदल्या दिवशी केलेल्या भाषणात लाडके भाऊ आणि लाडक्या बहिणींच्या योजना व त्यांना दिलेल्या आश्वासन पूर्ण करणार आहोत, असा शब्द दिला होता.

त्यानुसार महाराष्ट्रातील युवक आणि युवतीं साठी कायम स्वरुपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून द्यावा, खालील मागण्या आपणाकडून पूर्ण करून आम्हा सर्वांना कायम सेवेची संधी द्यावी, युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींना किमान २५ हजार रुपये वेतन/ मानधन देण्यात यावे.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सेवेत कायम स्वरूपी सेवेची संधी द्यावी, शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना देय असलेल्या सर्व सवलती देण्यात याव्यात, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयाम ध्ये भरती प्रक्रीयेमध्ये प्रशिक्षणार्थीसाठी १० टक्के राखीव जागा ठेवाव्यात, सर्व प्रशिक्षणार्थींना अंशकालीन कर्मचाऱ्यांचे आरक्षण लागू करण्यात यावे इत्यादी मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

# जळकोट प्रशालेत अल्पसंख्यांक अधिकार हक्क दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१८ डिसेंबर -**

जळकोट येथील जिल्हा परिषद प्रशालेत १८ डिसेंबर हा शासनाने जाहीर केलेला अल्पसंख्यांक अधिकार हक्क दिवस साजरा करण्यात आला.

अल्पसंख्यांक दिनानिमित पालक रफिक मुल्ला यांचा पुष्पगुच्छ देऊन शाळेचे मुख्याध्यापक पी.एल. तरमोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पालक जास्मिन बागवान यांचा सत्कार शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या पुनम दूधभाते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावी



मधील अल्पसंख्यांक विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सत्कार शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण समितीचे उपाध्यक्ष विजय पिसे हे होते. यावेळी अल्पसंख्यांक अधिकार हक्क दिवसाची माहिती शाळेचे मुख्याध्यापक तरमोडे व शाळेच्या शिक्षिका पी. एस कांबळे यांनी आपल्या मनोगतामधून अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नतीसाठी करण्यात आलेले कायदे, विविध शिष्यवृत्ती, संविधानातील कलम, अल्पसंख्यांक सम ाजासाठीच्या विद्यार्थी लाभाच्या शिष्यवृत्ती अल्पसंख्याक समाजाचे सण, उत्सव, हक्क, संविधानातील तरतुदी याबाबत सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमास शाळेचे शिक्षक पी.एल. तरमोडे, एस.ए.सारणे, जे.बी. शिंदे, एस.एस. पवार, जी.एस. बनपट्टे, पी.एस. कांबळे, व्ही.ए. कदम, ए.आर. सुरवसे, परिचारक स्वामी, शिक्षण समिती सदस्य तुकाराम कुंभार, पुनम दुधभाते, अर्चना कांबळे तसेच शाळेतील शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

शासकीय/अनुदानित/ विनाअनुदानित व कायम स्वरूपी विनाअनुदानित दिव्यांगाच्या विशेष शाळा कर्मशाळामधील दिव्यांग मुला-मुलींच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना खेळामध्ये संधी मिळावी त्याच्यातील सुप्त क्रीडाविषयक कौशल्यांना संधी मिळावी व दिव्यांग व्यक्तीमधील न्यूनगंड दूर होऊन त्यांचा जीवनाकडे सकारात्मक पाहण्याचा दृष्टिकोन विकसित व्हावा तसेच दिव्यांग व्यक्तीसुद्धा समाजाचा एक उपयुक्त घटक म्हणून पुढे यावा यासाठी दरवर्षी ३ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो.यानिमित्ताने १७ व १८ डिसेंबर दरम्यान दोन दिवशीय दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

या जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन तुळजाभवानी स्टेडियम धाराशिव येथे जिल्हाधिकारी डॉ.मैनक घोष यांच्या हस्ते १७ डिसेंबर रोजी दीप प्रज्वलन करून व क्रीडाज्योत प्रज्वलीत व महापुरुषांच्या फोटोचे पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर होते.

यावेळी स्काऊट गाईडचे विक्रांत देशपांडे समाज कल्याण विभाग लातूरचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसाठवार,प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष मयूर काकडे,अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शिंदे,दिव्यांग संघटनेचे उपाध्यक्ष शौकत अली,मोहम्मद अत्तार सहसंघटक प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन,संगमेश्वर दत्तात्रय बिराजदार राष्ट्रीय पॅरा ओलंपिक खेळाडू प्रयागताई पवळे,राष्ट्रीय पॅरालिक खेळाडू शहाजी चव्हाण,रशीद कोतवाल,ङ बी.आर. कलवले, बालाजी शिंदे,चंद्रकांत जाधव, सचिन सरवदे, सच्चिदानंद बांगर, जगताप उपस्थित होते.

# संविधान प्रतिमेची विटंबना करणाऱ्या दोषींवर कडक कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

परभणी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना केल्याप्रकरणी जातीवादी सम ाजकंटकावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी मागणी संविधान संरक्षण समिती धाराशिवच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे राज्यपाल यांना निवेदन देण्यात आले आहे.

सदरील निवेदनात गुन्हेगारावर तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संविधान संरक्षण समितीच्या वतीने करण्यात निवेदनाद्वारे आली आहे.

सदरील निवेदनावर रिपाइं (खरात) पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत, हरिभाऊ बनसोडे, प्रा.डॉ. दीनकर झेंडे, गौतम सोनवणे, चंद्रकांत गायकवाड, राहुल राऊत, अजय गायकवाड, बी.व्ही. भालेराव यांच्यासह अनेक भीमसैनिकाच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत तडवळे येथील जि.प. शाळांचे यश

## दोन मुलींची प्रात्यक्षिक स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.१८ डिसेंबर -**

मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक राज्यस्तरीय स्पर्धेची लेखी परीक्षा ३० नोव्हेंबर २०२४ रोजी झाली होती. सहावी वर्गातील विज्ञान विषयासाठी होणाऱ्या या लेखी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा कसबे तडवळे शाळेतील १७ विद्यार्थी तर जिल्हा परिषद आदर्श कन्या शाळा शाळेतील १९ विद्यार्थींनी उत्तीर्ण झाल्या आहेत. यामध्ये कन्या शाळेतील नंदिनी मते व संस्कृती शेंडगे यांची राज्यस्तरीय प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

उत्तीर्ण मुलींमध्ये स्वराली सुतार, जेबामहेक शेख, वैष्णवी जमाले, आर्या धायगुडे, संस्कृती होगले, ज्ञानेश्वरी करंजकर, आराध्या करंजकर, आस्मि ता ढमे, स्नेहा कोरडे, स्वरांजली गजाकोष,सुफिया कोतवाल, अपूर्वा सपाटे, कार्तिकी राहींज, स्वामीनी जगदाळे, मोनाली लंगडे, शिवानी कोरे



व वेदिका चव्हाण या विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत.

तसेच जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेतील गणेश सोमनाथ कसबे, सुशांत रणजीत चव्हाण, भैरवनाथ जगदीश सपाटे, रुद्र सोमनाथ वाकडे, शिवराज अशोक करंजकर, समर्थ गोविंद जमाले, आयुष शरद शिनगारे, समर्थ संताजी जमाले, योगेश गणेश लांडगे, अथर्व भालचंद्र थोरवे, यश बारिस्टर कपाळे, अमित उमेश शिनगारे, धनराज बापू सवासे, रुद्र ज्ञानेश्वर भोरे, अथर्व हरिश्चंद्र होगले, श्रेयश शिवाजी करंजकर व असिफ मेहबूब आतार हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी कन्या शाळेतील मुलींना विज्ञान पदवीधर गणपती यावलकर तर केंद्रीय शाळेतील मुलांना विज्ञान पदवीधर शिक्षिका हेमलता चांडगे, अंजली डुमणे व बाळासाहेब जमाले यांचे मार्गदर्शन लाभले.

राज्यस्तरीय विज्ञान परीक्षेतील या यशाबद्दल विस्ताराधिकारी किशोरी जोशी, केन्द्रप्रमुख जगदीश जाकते, शाळा व्यवस्थान समिती अध्यक्ष पवार, अध्यक्ष सोमनाथ भोसले, केंद्रीय मुख्याध्यापक केशव पवार, कन्या शाळा मुख्याध्यापक रहिमान सय्यद, आदर्श शिक्षक जगन्नाथ धायगुडे, दत्तात्रय मगर, संजय देशटवाड, मोहम्मद नदाफ, अजय जानराव, प्रवीण गाडे, शहाजी पुरी, रामकृष्ण ढवळे, देवेंद्र घायतिडक यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

# देशसेवेसाठी तरुणांनी तत्पर रहावे : डॉ संजय अस्वले



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ डिसेंबर -**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील उमरगा येथील कॅडेट रावण ममाळे (सीआयएसएफ) माजी विद्यार्थी संदिप कुंभार (आयटीबीपी), नवनाथ पाश्मे (सीआरपीएफ) यांचे स्पर्धा परीक्षा पोलीस सैन्यदल कडमी, करिअर कट्टा, NCC विभागा तर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्यांचा सत्कार व अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षिय भाषणात कॅडेटसना, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सरांनी आपल्या भाषणात सांगितले की केवळ सैन्यदल, पोलीस, निमलष्करी पदावर भरती झाल्या नंतर न थांबता एमपीएससी, युपीएससी या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातुन वर्ग एक (क्लासवन), वर्ग दोन (क्लासटु 'ची तयारी करावी असे, सांगितले. यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, करिअर कट्टा, सैन्य-पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण जे की लेखी परीक्षेची तयारी करूण घेते व एनसीसीच्या माध्यमातून मैदानाची तयारी करूण घेते.

यासाठी विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेऊन देशाची सेवा करावी असे आवाहन केले. या कार्यक्रम ासाठी उप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पदमाकर पिटले, कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, उपस्थित होते. सूत्रसंचलन डॉ. चंद्रसेन करे आणि आभार डॉ. समाधान पसरकले यांनी केले.

या कार्यक्रमास म हाविद्यालयातील प्राध्यापक, कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी बहुसंखेने उपस्थित होते.

## जाहीर समन्स

रे.मु.नं. १३२/१९९६
निशाण नं. २३०
नेमलेली तारीख - १०/०१/२०२५

### बार्शी येथील में. श्रीमती पी.व्ही. राऊत साहेब सि.ज.ज्यु.डि. यांचे कोर्टात

**विश्वास महप्पा खुणे वगैरे ....वादी**
**विरूध्द**
**बळवंतराव यादवराव घोगरे वगैरे ....प्रतिवादी**

**यात प्रतिवादी क्र. १ ई) अनुराधा बाळासाहेब पाटील, रा. सारोळा बु, ता.जि. धाराशिव**

ज्याअर्थी यातील वादी यांनी आपणाविरूध्द या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/१९९६ या में. न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यानुसार में. न्यायालयाकडुन आपणास वर नमुद पत्तयावर समन्स पाठविले असता त्याची बजावणी होत नाही. आपण वरील पत्त्यावर रहात आहात परंतू समन्स बजावणी होत नाही म्हणून तुम्हास या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहिर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अथवा नेमलेली तारीख १०/०१/२०२५ आपण आपल्या प्रतिनिधीमार्फत अथवा स्वतः जातीने आपला लेखी बचाव सदर दाव्यात दाखल करावा व आपला कायमचा पत्ता या न्यायालयात नेमलेल्या तारखेस दयावा. या प्रमाणे आपल मुदतीत हजर राहून आपला लेखी जबाब बचाव दाखल न केल्यास व हजर न राहिल्यास वादीच्या मागणीप्रमाणे दावा मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**कळावे,**
**हे जाहिर समन्स आज दि. ०३/१२/२०२४ कोर्टाचे सही व शिक्यांशी प्रसिध्द केले.**

हुकूमावरून,

स्वाक्षरित/- कनिष्ठ लिपीक
स्वाक्षरित/- सहा.अधिक्षक

सहा. अधिक्षक सह दिवाणी न्यायालय, क. स्तर. बार्शी

## जाहीर समन्स

रे.मु.नं. १३२/१९९६
निशाण नं. २२९
नेमलेली तारीख - १०/०१/२०२५

### बार्शी येथील में. श्रीमती पी.व्ही. राऊत साहेब सि.ज.ज्यु.डि. यांचे कोर्टात

**विश्वास महप्पा खुणे वगैरे ....वादी**
**विरूध्द**
**बळवंतराव यादवराव घोगरे वगैरे ....प्रतिवादी**

**यात प्रतिवादी क्र. १ इ) अलका अर्जुनराव पंडीत रा. दहिटण, ता. गेवराई, जि. बीड**

ज्याअर्थी यातील वादी यांनी आपणाविरूध्द या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/१९९६ या में. न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यानुसार में. न्यायालयाकडुन आपणास वर नमुद पत्तयावर समन्स पाठविले असता त्याची बजावणी होत नाही. आपण वरील पत्त्यावर रहात आहात परंतू समन्स बजावणी होत नाही म्हणून तुम्हास या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहिर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अथवा नेमलेली तारीख १०/०१/२०२५ आपण आपल्या प्रतिनिधीमार्फत अथवा स्वतः जातीने आपला लेखी बचाव सदर दाव्यात दाखल करावा व आपला कायमचा पत्ता या न्यायालयात नेमलेल्या तारखेस दयावा. या प्रमाणे आपल मुदतीत हजर राहून आपला लेखी जबाब बचाव दाखल न केल्यास व हजर न राहिल्यास वादीच्या मागणीप्रमाणे दावा मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**कळावे,**
**हे जाहिर समन्स आज दि. ०३/१२/२०२४ कोर्टाचे सही व शिक्यांशी प्रसिध्द केले.**

हुकूमावरून,

स्वाक्षरित/- कनिष्ठ लिपीक
स्वाक्षरित/- सहा.अधिक्षक

सहा. अधिक्षक सह दिवाणी न्यायालय, क. स्तर. बार्शी

## अग्रलेख...

# अडलेले घोडे आणि घोडदौड

अधिकृतरीत्या आणि नियमानुसार विरोधी पक्ष नेतेपद मिळविण्याइतपत संख्याबळ मिळवू न शकलेल्या महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीचे घोडे ईव्हीएमवर अडकलेले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने घोडदौड सुरू केली आहे. १६ डिसेंबर २०२४ पासून नागपूर येथे महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १५ तारखेला रिवाजाप्रमाणे चहापान ठरले होते. त्यावर महाविकास आघाडीने रिवाजाप्रमाणेच बहिष्कार टाकला. ईव्हीएमच्या नावाने बोंबा ठोकणे हासुद्धा आता विरोधकांचा रिवाजच झालेला आहे. त्यानुसार अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ईव्हीएम हटावचे नारे देत विरोधकांनी कंठशोष केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने जोरात आपटी खाल्ली. त्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने चांगले यश मिळविले. तेव्हाही ईव्हीएमवरच निवडणूक झाली होती. पण, लोकसभा निवडणुकीतील यशाला सर्वांनी घट्ट मिठी मारली आणि स्वतःची पाठ थोपटून घेतली. आता विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा मतदारांनी पार 'निकाल' लावला तेव्हा मात्र त्यांनी ईव्हीएमच्या नावाने बोंबा मारणे सुरू केले आहे. या निरर्थक वितंडवादाकडे ना लोक गांभीर्याने पाहताहेत ना सरकार. महायुतीच्या सरकारने आपले काम सुरू केले आहे. राज्य विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महायुती सरकारने ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या आणि आपल्या कामाच्या दिशेची चुणूक दाखवून दिली. माझी लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी, बळीराजा वीज सवलत योजनेसाठी ३१५० कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ७००० कोटी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांसाठी ४११२ कोटी, इतर मागास बहुजन कल्याण विभागासाठी २६०० कोटी, जलसंपदा खात्यासाठी २१६५ कोटी, कृषी आणि पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसायाकरिता २१४७ कोटी, ग्रामविकास विभागासाठी २००७ कोटी, आदिवासी विकासासाठी ८३० कोटी तसेच सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग १३७७ कोटी अशा पुरवणी मागण्या मांडून त्या तरतुदी महायुती सरकारने करून घेतल्या. विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने ९४ हजार कोटी रुपयांच्या मागण्या सादर केल्या होत्या. आता यावेळी महायुती सरकारने घोषित योजनांसाठी पुरवणी मागण्या मांडून आपण शब्द पाळणाऱ्यांचे सरकार आहोत, हे सिद्ध करून दिले. या पुरवणी मागण्या अधिवेशनाच्या अखेरीस चर्चेअंति मंजूर होतील आणि ज्या घटकांना लाभ द्यायचे आहेत, त्यांना ते मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सादर करण्यात आलेल्या एकूण ३५ हजार ७८८ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी २१ हजार कोटींच्या मागण्या कार्यक्रमांसाठी करावयाच्या खर्चाच्या आहेत आणि सुमारे ९००० कोटींच्या मागण्या या अनिवार्य खर्चाच्या आहेत. केंद्र पुरस्कृत योजनांसाठी अर्थसाहाय्य प्राप्त व्हावे यासाठी भरीव तरतूद केली गेली आहे. मुंबईतील मेट्रोपासून शेतकरी, शेती, सिंचन ते लाडक्या बहिणी अशी महायुती सरकारच्या कल्याणकारी विचारांची रेंज आहे. नेतृत्वामुळे आणि इच्छाशक्तीमुळे हा असा फरक शासन-प्रशासनात दिसून येतो. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती एका नव्या पर्वासाठी सिद्ध झाली आहे. फडणवीस हे कर्तबगार लोकनेते आहेत, हे यापूर्वीच सिद्ध झालेले आहे. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्याच कारकीर्दीत त्यांनी औद्योगिक विकास, परकीय गुंतवणूक, पायाभूत सुविधांचा विकास, सामाजिक कल्याण आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या क्षेत्रात उत्तम काम केले. आता महायुती सरकारने शेतकरी आणि महिलांपासून तरुण आणि शहरी व्यावसायिकांपर्यंत विविध घटकांच्या जीवनाला स्पर्श करून समाजातील विविध घटकांच्या जीवनात बदल आणण्याचे ठरविलेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मजबूत, स्थिर आणि निर्णायक आहे. युतीच्या राजकारणात आव्हाने अधिक असतात. त्यांचा यशस्वी सामना करून फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यांना एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोन अनुभवी नेत्यांची उपमुख्यमंत्री म्हणून समर्थ साथ मिळते आहे. फडणवीस यांची राजकीय कुशाग्रता, आश्वासने पूर्ण करण्यासाठी त्यांची बांधिलकी हे सारे वादातीत आहे. त्यामुळेच एरवी युती-आघाडीच्या सरकारांमध्ये दिसणारी अस्थिरता महायुतीच्या सरकारमध्ये कुठेही नाही आणि त्यामुळेच आर्थिक विकास हा अजेंड्याचा मुख्य विषय घेऊन या सरकारने काम सुरू केले आहे. यापूर्वीचा काळ पाहिला तर जागतिक पातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी मॅग्नेटिक महाराष्ट्रसारख्या उपक्रमांना मिळालेले यश दिसते. मुंबईतील अटल सेतू, कोस्टल रोड, मेट्रो आणि मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग ही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात साकारलेल्या प्रकल्पांची उदाहरणे. 'मेक इन महाराष्ट्र' आणि 'कौशल्य विकास' यांवर सरकारने लक्ष केंद्रित केल्यामुळे औद्योगिक विकासात; विशेषतः माहिती तंत्रज्ञान, उत्पादन आणि कृषी यासारख्या क्षेत्रांमध्ये राज्य अग्रेसर ठरते आहे. कोविडचा काळ आणि महाविकास आघाडीचा बिघाडीचा कारभार ही अडीच वर्षे वगळली तर गेल्या दशकभरातील साडेसात वर्षे महाराष्ट्राने केवळ विकासच अनुभवला. त्याची प्रचीती येणारे क्षेत्र म्हणजे शेती. दुष्काळ, अतिवृष्टी यासारखी आव्हाने असतानाही शेती स्थिरावते आहे. देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला आहे. 'जलयुक्त शिवार अभियान' ही अत्यंत यशस्वी योजना. उन्हाळ्यातही हिरवीगार शिवारे महाराष्ट्रात पाहायला मिळत आहेत. याशिवाय, महायुती सरकारने महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, त्यांना आरोग्यसेवा, शिक्षण आणि आर्थिक संधींमध्ये अधिकाधिक प्रवेश प्रदान करण्याच्या उद्देशाने अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. उद्योजकता आणि आर्थिक स्वावलंबन यांना प्रोत्साहन देण्यासाठी महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. लैंगिक छळ, कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या गुन्ह्यांवर कडक कायदे करून फडणवीस प्रशासनाने महिलांच्या सुरक्षेवरही लक्ष केंद्रित केले आहे. उपेक्षित समुदायांसाठी सरकारने कौशल्य विकास, शिक्षण आणि नोकऱ्या अशा तीन पातळ्यांवर काम केले. ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे नागरिकांना थेट सरकारी सेवांशी जोडणाऱ्या 'आपले सरकार' योजनेमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता सुनिश्चित केली आहे. महायुती सरकारनेही शिक्षण आणि आरोग्य सुधारणांवर भर दिला आहे. महानगरे, शहरे, निमशहरी भाग, ग्रामीण भाग, आदिवासीबहुल विभाग अशा सर्व क्षेत्रांकडे महायुती सरकारचे लक्ष असल्याचा पुरावा म्हणून सरकारच्या कामांची यादीच सांगायची झाली तर ती फार मोठी होईल. यांत सर्वांत महत्त्वाचे आहे ती दिशा आणि लक्ष्य. कोणत्या मार्गाने जायचे आणि कुठे जायचे, याबद्दल स्पष्टता आहे. त्यामुळेच पुरवणी मागण्या मांडताना त्यातील दिशा आणि लक्ष्य स्पष्ट दिसते. लाडक्या बहिणींना लवकरात लवकर त्यांच्या हक्काचा निधी द्यायचा आहे, याचे भान सरकारला आहे. शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा आहे, ही भावना आहे. सिंचन, सहकार, शिक्षण, उद्योग या क्षेत्रांत भरारी घेण्यासाठी पायाभरणी करायची आहे, यासाठीची दृश्य धडपड आहे. निर्णायक नेतृत्व असले की हा फरक दिसतो. महाविकास आघाडीचे सरकार उणेपुरे अडीच वर्षे होते. त्या काळात महाराष्ट्राची सर्वार्थाने पीछेहाट झाली. अडीच वर्षे वाया गेली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार आले. त्यामुळे महाराष्ट्राचे गाडे रुळावर आले. आता पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून ते अधिक वेगाने पुढे सरकेल. आगामी काळात महायुती सरकारला भरपूर काम करावे लागणार आहे, हेही खरे. जागतिक अर्थकारणातील अस्थिरतेचा उद्योग क्षेत्रावर झालेला परिणाम, युद्धाच्या स्थितीमुळे निर्माण झालेले प्रश्न, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न यांचीही हाताळणी महायुती सरकारला करावी लागेल. ती करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांचे सामूहिक नेतृत्व सक्षम आहे. महाविकास आघाडीने ईव्हीएम आणि अन्य कोणत्याही मुद्यांवर कितीही बोंबा ठोकल्या, तरी महायुतीच्या पर्वात महाराष्ट्राच्या विकासाची घोडदौड नव्याने सुरू होईल, यात शंका नाही.

## प्रासंगिक

**राहुल गोखले**

# घटक पक्षांचाही काँग्रेसवर अविश्वास!

सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले तेव्हा सत्ता न मिळूनही इंडिया आघाडीच्या आणि विशेषतः काँग्रेसच्या गोटात जल्लोषाचे वातावरण होते. त्याचे एक कारण म्हणजे मावळत्या लोकसभेच्या तुलनेत काँग्रेसचे बलाबल जवळपास दुप्पट झाले आणि त्या पक्षाचे ९९ खासदार निवडून आले. जल्लोषाचे खरे कारण हे भाजपाला स्वबळावर बहुमत मिळू शकले नाही हे होते. आता भाजपाची घसरण सुरू झाली आहे, अशा तोऱ्यात काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटक पक्ष वागू लागले होते. लोकसभेतील विरोधी पक्ष नेतेपद गेल्या दोन लोकसभांच्या कार्यकाळात रिक्त होते. कारण आवश्यक खासदार संख्या कोणत्याही विरोधी पक्षाकडे नव्हती. यावेळी मात्र ते पद राहुल गांधी यांना अधिकृतपणे मिळाले. साहजिकच इंडिया आघाडीचे नेतृत्व काँग्रेस आणि पर्यायाने राहुल गांधी करणार हे अगदी उघड होते. राहुल गांधी देखील लोकसभेच्या सभागृहात आणि बाहेर अशा थाटात विधाने आणि वक्तव्ये करू लागले होते की, ते पुढील पंतप्रधान होणे म्हणजे केवळ औपचारिकता आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या कामगिरीमुळे इंडिया आघाडीतील घटक पक्षांना काँग्रेसचे नेतृत्व मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते. मात्र, सहा महिन्यांतच ते चित्र पालटले आणि इंडिया आघाडीचे नेतृत्व ममता बॅनर्जी यांना देण्याचे सूर उमटू लागले आहेत. आघाडीतील घटक पक्षांना अचानक काँग्रेसचे नेतृत्व नकोसे का झाले आणि ममतांच्या बाजूने इतके सूर का उमटू लागले, हा औत्सुक्याचा विषय असला, तरी काँग्रेससाठी तो आत्मपरीक्षणाचा विषय आहे.



याचे बीज बहुधा लोकसभा निवडणुकांनंतर झालेल्या काही राज्यांतील विधानसभा निवडणुका आणि वेगवेगळ्या मतदारसंघांसाठी झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांत असावे. लोकसभा निवडणुकांत मिळालेले यश म्हणजे पुढील सर्व निवडणुकांतील विजयांची नांदी, असा काँग्रेसचा होरा असावा आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी तो नाकारावा, अशी स्थिती नव्हती. तथापि, त्यानंतर हरयाणापासून महाराष्ट्रापर्यंत विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी काँग्रेसच्या शिडातील हवा काढून घेतली. हरयाणामध्ये काँग्रेस सहज जिंकेल असे अंदाज व्यक्त होत होते; तेथे काँग्रेसचा दारुण पराभव झाला. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीला बहुमत मिळाले खरे; पण त्यात काँग्रेसचा वाटा अगदीच नगण्य होता. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वाखालील आघाडीला बहुमत मिळाले. तेथील विजयाचे श्रेय हे काँग्रेसपेक्षा झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे. महाराष्ट्राने काँग्रेसच्या दारुण स्थितीवर शिक्कामोर्तब केले. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा भावी मुख्यमंत्री म्हणून उल्लेख होत होता; तेच पटोले आता आपल्याला प्रदेशाध्यक्षपद नको म्हणून पक्षश्रेष्ठींना विनंती करीत आहेत. लोकसभा निवडणुकांनंतर कोणत्याच राज्यात काँग्रेसला भरीव कामगिरी करता आलेली नाही.

संसदेत आणि बाहेर सतत राज्यघटना, अदानी, जातिनिहाय जनगणना हे विषय रेटून काँग्रेसला यशाला गवसणी घालता आलेली नाही; किंबहुना अदानी हा विषय काँग्रेसने आता फार रेटू नये, असा विरोधकांचा सूर आहे. पण राहुल गांधी त्याच विषयाला बिलगून बसले आहेत. त्यामुळे इंडिया आघाडीतील अन्य पक्षांना कदाचित काँग्रेसचे ओझे वाटू लागले असावे. याचे एक कारण म्हणजे ज्या राज्यांत विरोधकांना यश मिळाले तेथे ते त्या त्या राज्यातील प्रादेशिक पक्षामुळे; काँग्रेसमुळे नव्हे. असे असेल तर काँग्रेसच्या देशव्यापी स्वरूपाचा फायदा काय असा प्रश्न आघाडीतील नेत्यांना पडला असल्यास नवल नाही. त्याचेच पडसाद लालूप्रसाद यादव यांच्यापासून शरद पवारांपर्यंत अनेकांनी ममता बॅनर्जी यांच्यात इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे, असे सुतोवाच करण्यात उमटले असावे. इंडिया आघाडी स्थापन झाली तेव्हा नेतृत्व करण्याची नितीशकुमार व ममता बॅनर्जी यांची मनीषा आणि महत्त्वाकांक्षा होती. नंतर नितीशकुमार यांनी भाजपाबरोबर जाण्याचा निर्णय घेतल्याने तो प्रश्न निकालात निघाला आणि ममता यांनीही पश्चिम बंगालमध्ये स्वबळावर लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय जाहीर केल्याने आघाडीच्या नेतृत्वाची माळ अखेरीस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्या गळ्यात पडली. आता मात्र भाजपाची पुन्हा घोडदौड सुरू झाल्याने विरोधकांच्या गोटात निराशा पसरली आहे आणि काँग्रेसचे नेतृत्व कुचकामी असल्याची भावना प्रबळ होत आहे. आम आदमी पक्षाने आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'एकला चलो रे'ची भूमिका घेतल्याने काँग्रेसबरोबरची संभाव्य आघाडी बारगळली आहे. पण आघाडीचे नेतृत्व ममता बॅनर्जी यांना द्यावे, असे सूर का उठत आहेत, हेही पाहणे गरजेचे आहे. खरे तर लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावरील बहुमतापासून दूर ठेवण्यात ज्या पक्षांनी कामगिरी बजावली, त्यांत समाजवादी पक्ष प्रमुख. उत्तरप्रदेशात भाजपाची पीछेहाट झाल्याने निकालांत मोठा फरक पडला. तेव्हा अखिलेश यादव यांचेही नाव आघाडीच्या नेतेपदाच्या चर्चेत असायला हरकत नव्हती. मात्र, उत्तरप्रदेशात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या नऊ जागांवरील पोटनिवडणुकांत भाजपाने सात जागांवर बाजी मारल्याने समाजवादी पक्षाला धक्का बसला. पश्चिम बंगालमध्ये मात्र तृणमूल काँग्रेसची लोकसभा आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत सरशी झाली. ज्या सहा जागांवर पोटनिवडणूक झाली, त्यापैकी पाच जागांवर तृणमूलने आपला दबदबा कायम राखलाच; पण सहावी जागा जी भाजपाने २०१६ आणि २०२१ सालच्या विधानसभा निवडणुकीत जिंकली होती; तीही तृणमूलने काबीज केली. वास्तविक गेल्या काही काळात पश्चिम बंगालमधील घडामोडींमुळे तृणमूल काँग्रेस आणि ममता बॅनर्जी यांची कोंडी झाली होती. तरीही त्यांनी पोटनिवडणुकीत त्या पक्षाने सर्व जागा जिंकल्या. बहुधा त्यामुळेच ममता यांच्यात इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची क्षमता असल्याची भावना घटक पक्षांत निर्माण झाली असावी.

अर्थात् लालूप्रसाद यादव यांच्यापासून शरद पवारांपर्यंत अनेकांना ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर अचानक विश्वास कसा निर्माण झाला, हा प्रश्न उरतोच. तसा तो होता तर लोकसभा निवडणुकीपूर्वीच इंडिया आघाडीचे नेतृत्व याच नेत्यांनी ममता यांना का दिले नाही, हाही प्रश्न उपस्थित होतो. काँग्रेसची साथ आणि नेतृत्व घटक पक्षांना आता जाचू लागले आहे की, काँग्रेस घटक पक्षांना विश्वासात घेत नसल्याने काँग्रेसला इशारा देण्यापुरती ही मोर्चेबांधणी आहे? या सर्वांची उत्तरे लवकरच मिळतील. एक मात्र खरे; लोकसभा निवडणुकांनंतर सत्तेपासून योजने दूर असूनही काँग्रेसचा उधळलेला वारू आता जमिनीवर आला आहे. एका मागून एक निवडणुकीत काँग्रेस सपाटून मार खात आहे. परिणामतः इंडिया आघाडीचे नेतृत्व काँग्रेस आणि राहुल गांधी किंवा मल्लिकार्जुन खडगे कोणत्या अधिकारात करणार, हाही सवाल आहे. ममता बॅनर्जी यांना जनतेचा देशव्यापी भरवसा जिंकता येईल का हा नंतरचा प्रश्न. पण जनता काँग्रेसला नाकारत असताना इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी तरी काँग्रेसला 'दया' का दाखवावी, हा मुद्दा आहेच. काँग्रेसला दया दाखविण्याऐवजी ममता यांना आघाडीचे नेतृत्व देणे श्रेयस्कर हा घटक पक्षांचा पवित्रा म्हणजे त्या पक्षांनी काँग्रेसवर दाखविलेला अविश्वासच आहे.

९८२२८२८८१९

## वेध

**गिरीश शेरेकर**

# एसटीचे उत्पन्न वाढले; दर्जा केव्हा सुधारणार?

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अस्तित्वात आहे. या महामंडळामार्फतच एसटी बसचे संचलन होते. सार्वजनिक वाहतुकीची कोणतीही अन्य साधने उपलब्ध नसताना एसटी बस सर्वांचा आधार राहिली आहे. ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून एसटी बसला ओळख मिळाली. 'गाव तेथे एसटी', 'रस्ता तेथे एसटी' या ब्रीदवाक्यांपासून सुरू झालेला एसटीचा प्रवास 'प्रवाशांच्या सेवेसाठी' या ब्रीदवाक्यापर्यंत पोहोचला आहे. विद्यमान स्थितीत वाहतुकीचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. पण, एसटी बसचे महत्त्व जेथे पर्याय नाही, तेथे अद्याप कायम आहे. विशेषत्वाने ग्रामीण महाराष्ट्रातल्या ज्या भागात रेल्वे नाही आणि खाजगी वाहतूक मर्यादित आहे, तेथे एसटी बसशिवाय दुसरा समर्थ पर्याय आजही नाही. राज्यातली निम्म्यापेक्षा जास्त जनता राज्यांतर्गत प्रवासासाठी एसटी बसचाच वापर करते, हे अनेक वेळा आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. याचा अर्थ एसटीच्या सुविधा फारच चांगल्या आहेत, असा होत नाही. जनतेसमोर प्रवास करण्याचे मर्यादित पर्याय असणे आणि सवलतीच्या दरात प्रवास करण्याची सोय या दोन कारणांमुळे प्रवाशांची संख्या बसकडे नाईलाजाने का होईना वळली आहे. परिणामस्वरूप एसटीचे उत्पन्न वाढले, पण दर्जा अद्याप पाहिजे त्या प्रमाणात सुधारलेला नाही, हे वास्तव आहे.

एसटी महामंडळाने अनेक चढ-उतार पाहिले आहेत. मध्यंतरी एसटीची खूप वाईट स्थिती होती. २०१४ साली महायुतीचे सरकार आल्यानंतर थोडे चांगले बदल व्हायला लागले. शिवशाही, शिवनेरी, शयनयान अशा वेगवेगळ्या बसेस सुरू झाल्याने प्रवाशांची संख्या व उत्पन्न वाढले. बदल होत असतानाच कोरोनाची लाट आली. या काळात एसटी ठप्प होती. त्यातून सावरत नाही तर कर्मचाऱ्यांच्या संपाने एसटी महामंडळ हतबल झाले. एसटीचे व्हायचे तेवढे नुकसान झालेच. पण, कर्मचाऱ्यांची पगाराची मागणी निकाली निघाली. जून २०२२ मध्ये पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन झाले. या सरकारने एसटी बसला पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. प्रवासी संख्या वाढविण्यासाठी ७५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या ज्येष्ठांना मोफत आणि सर्व प्रकारच्या महिलांना ५० टक्के सवलतीने प्रवास या दोन योजना सरकारने सुरू केल्या. महिलांनी तर योजना उचलूनच धरली. प्रवासी संख्येसोबतच उत्पन्नात वाढ नोंदविण्यात आली. यंदाच्या वर्षातील सर्वाधिक उत्पन्न नोव्हेंबर महिन्यात एसटीला मिळाले आहे. ते ९४१ कोटी आहे. या महिन्यात एसटीने दररोज ६० लाख प्रवाशांची वाहतूक करून ३१.३६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविले. गेल्या वर्षाच्या याच काळातील उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न सुमारे २६ कोटी रुपयांनी जास्त आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी दिवाळीच्या काळात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात आली होती. यंदा ही भाडेवाढ नसताना उत्पन्न वाढले आहे. एसटीचे प्रवासी उत्पन्न वाढले असले, तरी त्या प्रमाणात एसटीचा खर्चदेखील वाढलेला आहे. इंधनाचे वाढते दर, कर्मचाऱ्यांची वेतनवाढ, टायर व सुट्या भागांच्या दरात झालेली वाढ हे त्याचे कारण आहे. त्यामुळे संचित तोटा ११ हजार कोटी रुपयांर्यंत पोहोचला आहे. नोव्हेंबर महिन्यात नियमित खर्चासोबतच कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट दिल्यामुळे सुमारे ५२ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा एसटीच्या तिजोरीवर पडला आहे. कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतनाची हजारो कोटींची थकबाकी प्रलंबित आहे. या सर्वांचा विचार करून नाईलाजास्तव उत्पन्न आणि खर्चातील ताळमेळ राखण्यासाठी एसटीने तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसा प्रस्ताव शासनाला पाठविल्याचे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले आहे. डॉ. कुसेकर यांनी सांगितलेल्या अडचणी मान्य केल्या तरी सध्या ज्या दराने एसटीचा प्रवास होतो, त्या दराइतक्या तरी सुविधा प्रवाशांना दिल्या जातात का? याचे उत्तर महामंडळाने द्यायला हवे. अनेक आगारांची स्थिती वाईट आहे. प्रत्येक ठिकाणी सुविधांचा अभाव आहे. बसची स्थिती तर सांगताच येत नाही, इतक्या त्या खराब आहे. देखभाल नसल्याने दिवसागणिक भंगार बसची संख्या वाढत आहे. बस कुठे बंद पडेल याचा भरवसाच नाही. ज्येष्ठांना व महिलांना सवलत असल्याने ते नाईलाजाने एसटीतून प्रवास करत आहेत. त्यांच्यामुळेच उत्पन्न वाढले आहे. हे सत्य समजून न घेता महामंडळ आपलेच रडगाणे सांगत आहे. सुविधांवर काही बोलत नाही. त्यासाठी काही योजना महामंडळाकडे नाही. अलिकडे तर बसस्थानकावर नव्या बस दिसतच नाही. महामंडळाने जनतेच्या मजबुरीचा फायदा न घेता एसटी बसचा दर्जा सुधारावा. नव्या सरकारने त्याकडे लक्ष द्यावे, अशी माफक अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# भक्तिशास्त्रातील शरणागती

भक्तिशास्त्रामध्ये शरणागती सांगितली आहे. शरणागती म्हणजे परमेश्वराला अनन्यभावाने समर्पित होणे. तो पाहिजे ते करण्यास समर्थ आहे, हा विश्वास ठेवून त्याला मदत मागणे. 'शरण जाणे' हा प्रकार तसे पाहिले तर युद्धातील प्रकार. एखादा शत्रू आपल्यापेक्षा बलाढ्य आहे, त्याच्यासमोर आपला टिकाव लागत नसेल तर शस्त्र खाली टाकायचे आणि नतमस्तक होऊन आपले नुकसान टाळायचे किंवा जीव वाचवायचा. दुसरे म्हणजे एखादा मोठा बलाढ्य शत्रू आपल्यापुढे आहे. आपल्याला त्याच्याशी दोन हात करणे शक्य नाही. अशावेळी एका प्रचंड शक्तिशाली मित्राला मदत मागणे, त्याला आलेले संकट हरण करण्याची विनंती करणे होय.

भक्तिशास्त्रात आपल्याला जन्मदुःखे, जरादुःखे किंवा नित्यदुःखे असतात. आपल्या सुखी संसारातील हीच दुःखे म्हणजे आपले शत्रू. ही दुःखे दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करीतच असतो, पण काही दुःख मानवी हस्तक्षेपाच्या बाहेरची असतात तेव्हा मनुष्याला देव आठवतो आणि मग आपण धावा करतो तो ईश्वराचा. हा धावा म्हणजे शरणागती होय. बलाढ्य शत्रू आपल्या आटोक्यात नाही तेव्हा त्याहून बलाढ्य शक्तीला अनन्यभावाने दीनार्त होऊन मदत मागणे म्हणजे शरणागती होय किंवा आपल्या वर्तमान सुखी संसारात आपल्यावर भविष्यात कोणतेच अरिष्ट म्हणजे भोगरूपी शत्रू येऊ नये म्हणून आर्तभावाने परमेश्वराला समर्पित होणे, नतमस्तक होणे म्हणजे शरणागत होय. भक्तिशास्त्रात शरणागतीसाठी कोणता भाव असावा, याबाबत मार्गदर्शन केले आहे.

अनुकूल्यस्य संकल्पः प्रतिकूल्यस्य वर्जनम्।
रक्षिष्यतीति विश्वासो गोप्तृत्वे वराणां तथा।
आत्मनिक्षेप-कार्पण्ये शषद्-विधा शरणागतिः॥

**१) अनुकूलस्य संकल्प** : आपल्या आराध्याजवळ जे आपण मागणार ते त्या भगवंताला अनुकूल असावे. म्हणजे आध्यात्मिक क्षेत्रात दोन प्रांगण आहेत. एक आपले संसारिक सुखाचे प्रांगण जिथे जीव पारतंत्र्यात आहे आणि शिव स्वतंत्र आहे. इथे स्व अर्थाचे प्राबल्य असल्यामुळे ईश्वर स्वतंत्र आहे. सर्वस्व त्याच्याच हातात असते. दुसरे म्हणजे भक्तीचे प्रांगण जिथे जीव स्वतंत्र आणि ईश्वर पारतंत्र्यात असतो. इथे ईश्वराची नाही तर जीवाची सत्ता चालते. भक्ताचा अधिकार अधिक असतो. 'धरीला पंढरीचा चोर, गळा बांधुनिया दोर...' ही उत्कट प्रेमाची अवस्था. हा भक्त ईश्वराला जे आवडते, जे ईश्वराला अनुकूल तोच संकल्प करतो. ईश्वरानुकूल अशीच साधना करतो.

**२) प्रतिकूलस्य वर्जनम्** : ईश्वराला अनुकूल संकल्प म्हणजे त्याच्या इच्छेच्या प्रतिकूल संकल्प किंवा साधन प्रपंच नसावा. असा प्रतिकूल संकल्प पाहिजे. 'रक्षिषः इति विश्वासः' त्याला शरण गेलो तर तो परब्रह्म परमात्मा माझे रक्षण करतोच, हा दृढविश्वास असला पाहिजे. तो पाहिजे ते करण्यास समर्थ आहे.

'जैसा समर्थु दाता कोणाशी, नास्ती न म्हणे।'

**३) आत्मनिक्षेप** : त्या ईश्वराला शरणागत होताना कायावाचामनोभावे समर्पित होणे. म्हणजे आपल्यावर आलेले दुःखही त्याचेच आणि आता मी त्याच्यावर अनन्यभाव ठेवला आहे; त्याचे जे फळ मिळणार तेही त्यालाच. याला भार समर्पण आणि फळ समर्पण म्हणतात.

**४) गोप्तृत्व वरण** : तो ईश्वरच माझे रक्षण करणार आहे, या भावाने त्याचे वरण करणे म्हणजे तोच माझा एकमात्र स्वामी आहे, हा भाव ठेवणे.

**५) कार्पण्य भाव** : म्हणजे दीन भावाने शरण जाणे. तो दाता आहे. तो विन्मुख पाठवीत नाही. त्याच्या चरणावर लोटांगण घालताना दीन भाव असावा. कारण तो 'शरणागत दिनार्त' आहे.

याशिवाय शरणागती पत्करताना पुढील गोष्टी आवश्यक आहेत.

**१) मानमर्षण** : म्हणजे त्याच्यासमोर जाताना मानपानाचा विलय व्हावा. अहंकाराचा वाराही नको की उन्मत्तपणाचा अग्नी नको. वृक्षाला फळे लागल्यावर वृक्ष जसा विनम्रपणे झुकतो तद्वतच अध्यात्मात विनय महत्त्वाचा आहे. सुखे मी मिळवली आणि दुःखे परमात्म्याने दिली, हा भाव नको.

**२) भयदर्शन** : शरणागती पत्करली म्हणजे कुठली तरी भीती आहे हे व्यावहारिक आहे. त्याची जाणीव ठेवणे म्हणजे भयदर्शन होय. यात कर्मफळाचा आस्वाद नको आणि कर्तृत्वाचा अहंकारही नको.

मी कर्ता म्हणशी तेणे तू कष्टी होशी।
आणि रामकर्ता म्हणशी पावशी यश कीर्ती प्रताप॥
कर्तृत्व आणि भोक्तृत्व त्याचेच.

**३) भर्त्सना** : मी पणा त्यागून सतत स्वतःवर टीका करीत राहणे. स्वतःमध्ये असलेल्या चुकांवर चिंतन करणे त्यानुसार मार्ग ठरविणे. शरणागती पत्करताना स्वतःची भर्त्सना महत्त्वाचीच आहे.

**४) आत्मविचारणा** : स्वतःच स्वतःला विचारणा करणे की माझ्यात किती शुद्धभाव आहे. तुम्ही अंधारात कसे वागता, यालाच चारित्र्य म्हणतात. (Charector is 'what you are in dark') अंधारात मी कसा वागतो? हे स्वतःला विचारणे म्हणजे यालाच 'आत्मविचारणा' म्हणतात. शरणागत होताना कर्तुम् तंत्र म्हणजे मी शरण गेलो, आता तो फळ देईल. म्हणजे तो वेगळा आणि मी वेगळा, असा द्वैतभाव बहुतेक असतो. पण हळूहळू आपल्याला वस्तू तंत्र म्हणजे त्या वस्तुस्वरूप होणे. 'शिवम् भुत्वा, शिवम् यजेत। शिवाची पूजा करताना शिवस्वरूप होणे हीच अद्वैत भावना शरणागतीची अंततोगत्वा आहे.

थोडक्यात आपण सर्वसामान्य माणसे त्या विश्वाच्या नियंत्याला शरण जातो, ते भौतिक अडचणी दूर होऊन ऐहिक सुखे प्राप्त व्हावीत म्हणून. ते जरूर मागा, पण भौतिकतेचा परोत्कर्ष साधताना 'आत्मनो मोक्षार्थम्' लक्षात ठेवले पाहिजे. ऐहिक सुखासोबत अध्यात्मही कायम लक्षात ठेवले पाहिजे. शरणागतीत ईश्वराच्या या अपेक्षा आहेत. परीक्षेत उत्तीर्ण व्हायचे असेल तर ही गुरुकिल्ली लक्षात ठेवली पाहिजे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### विरोधी पक्षांनी देशभक्तीचा परिचय द्यावा

आपण खरोखरंच देशाचे नागरिक आहोत असे जर विरोधी पक्षाचे नेते, कार्यकर्ते व प्रतिष्ठित वृद्ध नेत्यांना वाटत असेल तर एकदा तरी त्यांनी देशभक्तीचा परिचय स्वतःहून करून द्यावा. देशावर खरोखरंच प्रेम असेल तर व आपला देश एकसंध, बलशाली व्हावा असे मनापासून वाटत असेल, देशाचे विभाजन ही वाईट घटना झाली असे वाटत असेल, अखंड भारत झाला पाहिजे, समर्थ भारत झाला पाहिजे, भारत हिंदुराष्ट्र झाला पाहिजे असे वाटत असेल तर तसे कबूल करा व जगाला ओरडून सांगा की हा भारत महान देश आहे म्हणून. तसेच बांगलादेशात हिंदू बांधवांवर, महिलांवर, तेथील देवस्थानांवर जे हल्ले झाले, अत्याचार झाला त्याचाही निषेध करावा व विरोधी पक्ष व सत्तापक्ष एक आहे हे जगाला सांगून द्यावे. बांगलादेश आता वठणीवर येतो बघा, पण त्यासाठी एवढे धाडस विरोधी पक्षांना दाखवावे लागेल.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### अपने अपने राम

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून गेल्या काही वर्षांपासून नागपुरात संगीत, नाटक, नृत्य, साहित्य, आध्यात्मिक कार्यक्रम यावर आधारित खासदार सास्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. ही नागपूरकरांसाठी पर्वणी ठरली आहे. हा महोत्सव स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या सहभागाने अनोख्या कार्यक्रमांनी सजलेला आहे. याचा उद्देश केवळ मनोरंजन नसून अनेकानेक लोकांचा सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग वाढावा, विकास व्हावा तसेच सांस्कृतिक मूल्ये लोकांपर्यंत पोहोचावीत हा उद्देश आहे. या उत्सवात धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रम तसेच लोकप्रबोधन आणि मनोरंजन यांचा संगम दिसून येतो.

यात एक उत्कृष्ट कार्यक्रम म्हणजे डॉ. कुमार विश्वास यांचे 'अपने अपने राम' या विषयावरील त्रिदिवसीय प्रवचन. डॉ. कुमार विश्वास यांनी सोप्या आणि रसाळ पद्धतीने राम उलगडून दाखवला. रामकथा केवळ अध्यात्मापुरती अथवा कथेपुरती मर्यादित न ठेवता आजच्या काळात त्याचे अनुकरण कसे करावे हे समजावून सांगितले. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, मित्रत्व, आदर्श पुत्र, राजा, पती, पिता कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू श्रीराम. धनुर्धर राम विशद करून सांगितला. तसेच रामायणातील प्रत्येक व्यक्तिरेखेचे महत्व पटवून दिले. ते आजच्या काळातही अनेक गोष्टीत लागू होते. आपल्या दैनंदिन वैयक्तिक जीवनात रामाचा आदर्श कसा ठेवावा हे वेगवेगळ्या पद्धतीने आजच्या काळाशी सांगड घालून आपल्या रसाळ वाणीने आणि खुमासदार पद्धतीने पटवून दिले आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवले. राम आणि श्याम एकच आहेत हे सांगितले आणि आजच्या काळात दोघांची कशी आवश्यकता आहे हे पटवून दिले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे 'अपने अपने श्याम' हा कार्यक्रम ते करतात. हा देखील कार्यक्रम पुढच्या वर्षी आयोजित करावा ही नम्र विनंती. असे चांगले कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे अभिनंदन.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### नायलॉन मांजावर बंदी आणा

पुढील महिन्यात मकर संक्रांत आहे. त्या दृष्टीने पतंग उडविण्याची व पतंग कापण्याची स्पर्धा याच महिन्यात मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे. आकाशात पतंगाचा पेच झाल्यावर समोरच्याचा पतंग कापण्यासाठी नायलॉनचा मांजा वापरण्यात येत आहे. तो बाहेरच्या देशातून आलेला मांजा आहे. हा मांजा अतिशय धारदार असतो. हा मांजा नायलॉनचा असल्याने व त्याला काचेचा बारीक चुरा लावलेला असल्याने पतंग कटल्यानंतर जो मांजा खाली येतो तो मोटारसायकल किंवा सायकल चालविणाऱ्याच्या गळ्यात अडकतो. मोटारसायकल व सायकल गतीने चालवत असल्याने नायलॉन मांजाने अनेक दुचाकीस्वारांचे गळे चिरले जातात, डोळ्यांना इजा होते. अनेकांच्या मानेला खोलवर चिरल्याने काहींचे मृत्यू देखील होतात. आकाशातील पक्षी जखमी होतात. त्यामुळे या मांजाचा वापर करणाऱ्यांवर व विकणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करून पूर्णतः बंदी आणावी.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### पक्षपात-शह-श्वास

बुद्धिबळाच्या खेळात असो अन्य खेळांमध्ये शह दिल्याशिवाय विजयप्राप्ती होत नाही, या मंत्राचा जप सध्या उपराष्ट्रपती व राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याविषयी करताना दिसतात. उपराष्ट्रपतिपदावरून हटविण्यासाठी १४ दिवस आधी अविश्वास प्रस्ताव नोटीस गरजेची असताना व हा प्रस्ताव लोकसभेतही बहुमताने मंजूर करावा लागतो हे सुद्धा सुज्ञ विरोधकांना का कळू नये? भारतीय लोकशाहीतील शेतकरी पुत्राविरोधातील हा कट म्हणजे लालबहादूर शास्त्रींच्या 'जय जवान जय किसान' या ब्रीदाचा अपमानच म्हणावा लागेल. पक्षपाताविरोधात लढण्याचा विरोधकांचा अखेरचा श्वास म्हणावा का? पण ही कुऱ्हाड विरोधक स्वतःच्याच पायावर मारून घेत आहेत असे वाटते. संसदेतील सभागृहातील गोंधळ म्हणजे शह नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## क्राईम वृत्त...

### निळकंठेश्वरच्या विकासासाठी कोटींचा निधी मंजूर

**औसा, दि.१८ डिसेंबर -**

औसा तालुक्यातील किल्लारी येथील ग्रामदैवत श्री निळकंठेश्वर देवस्थानच्या विकासासाठी ३ कोटीं रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



आ. अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून निधीची तरतूद करण्यात आली असून ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत निळकंठेश्वर ब वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी विविध विकास कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. श्री निळकंठेश्वर देवस्थान येथे भक्तनिवास बांधकाम, पुरुष शौचालय बांधकाम, स्त्री शौचालय बांधकाम आणि रस्ता व नाली बांधकाम करण्यासाठी ३ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आ. अभिमन्यू पवार यांच्या दुसऱ्या टर्ममधील औसा मतदारसंघातील विकासयात्रेची सुरुवात श्री निळकंठेश्वराच्या आशीर्वादाने होत आहे.



### बाबासाहेब पाटील यांना कॅबीनेट मंत्रीपद मिळाल्याने देवणी जल्लोष

**देवणी, दि.१८ डिसेंबर -**

देवणी येथील बोरोळ चौकात महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांन फटाके फोडत एकमेकांना पेढे भरवुन जल्लोष साजरा केला. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महेश जाधव विळेगावकर, जिल्हा उपाध्यक्ष अनिल कांबळे, अल्पसंख्याकचे तालुकाध्यक्ष रियाज मोमिन, उद्धव मोरे, मलिकार्जुन सुरशेट्टे, माधव बालुरे, गफ्फुर खुरेशी, निळकंठ बिरादार, संजय बिरादार, दत्ता चाळकापुरे, नरसींग सुर्यंवशी, बालाजी सुर्यंवशी, सोमनाथ लद्दे, माजिद मुंजेवार, सचिन घाळे, लक्ष्मण रणदिवे, संजय बिरादार, सलिम मणियार, आकाश पाटील, स्वप्निल बावगे, सागर मसगले, राहुल टिळे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते.



### मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी शुभंम पांचाळ

**उदगीर, दि.१८ डिसेंबर -**

उदगीर येथे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थी उदगीर येथील बैठक घेऊन येथे उपस्थित होते.पुढील वाटचालीसाठी एक संघटना तयार करण्यात आली. या संघटनेच्या उदगीर तालुकाध्यक्षपदी शुभंम पांचाळ तर सचिवपदी मन्मथ भुसागरे यांची निवड करण्यात आली आहे. तर आवरीत कार्यकरणीत उपाध्यक्ष म्हणून तौफीक सत्तार पठाण, बुद्धरत्न संजीव भुताळे, सहसचिव शुभंम मुसने, प्रदीप सोनकांबळे, कोषध्यक्ष नरेंद्र पिचारे, भैययासाहेब मसुरे, सल्लागार पठाण आसिफ, रोहित कांबळे, संघटक, अविनाश बिरादार, संदीप हल्लाळे, मार्गदर्शक सचिन झुमकुलवाड, विशाल रोडेवाड, सदस्य म्हणून नंदकुमार मुसने, साक्षी एकलिंगे, अनिता लोहारे, संग्राम बुडगे, शरद कांबळे, सुवर्णा देवनाळे, आशा कुंडगीर ई निवड करण्यात आली आहे.




### ‘त्या’ घटनेच्या निषेधार्थ शिरुर अनंतपाळ कडकडीत बंद

**शिरूर अनंतपाळ, दि.१८ डिसेंबर -**

शिरूर अनंतपाळ येथील या सर्व कार्यकर्त्याकडून परभणी येथे झालेल्या संविधान प्रतीकृतीची विटंबना झाल्याने त्या घटनेच्या निषेधार्थ शिरुर अनंतपाळ तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला. शिरूर अनंतपाळची बाजारपेठ म्हणजे हे सर्व तालुक्याचे बाजारपेठ आहे. पण आज पुकारलेल्या बंदमुळे या बाजारपेठेत दिवसभर शुकशुकाट दिसून आला. या बंदसाठी खालील कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली गर्जन गायकवाड, सत्यजित सूर्यवंशी, सिद्धांत गायकवाड, गणेश कांबळे, तुषार मादळे, विशाल गिलचे, गौतम कांबळे, चेतन मदाळे, अविनाश जाधव, राकेश बानाटे, रोहित गायकवाड, राहुल मादळे, राम कांबळे, सिद्धार्थ बानाटे, रोहित हारणे, गजानन कांबळे, अजय बानाटे, परमेश्वर गायकवाड, वेदांत बानाटे, साईनाथ कांबळे, हुसेन मादळे, शावलीन मादळे. आदी मान्यवर उपस्थित होते.

### श्याम भुरे यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.१८ डिसेंबर -**




श्याम रामा भुरे यांचे अपघाती वयाच्या ८३ वर्षाचे असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, नातवंडे असा कौटुंबिक दृष्ट्या सधन परिवार आहे. यांच्यावरती अंत्यसंस्कार दि.१६ डिसेंबर रोजी दैठणा येथील सार्वजनिक शांतीधाम समशानभूमी या ठिकाणी यांच्यावरती दु. ४ करण्यात आलेले आहे.

### शकुंतला कुलकर्णी सुगावकर यांचे निधन

**लातूर, दि.१८ डिसेंबर -**

ज्येष्ठ नागरिक शकुंतलाबाई यशवंतराव कुलकर्णी सुगावकर यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी दुपारी निधन झाले.



मृत्युसमयी त्यांचे ८५ वर्षे वय होते. त्यांच्यावर बुधवारी, दि.१८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता खाडगाव रोड स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. शिक्षक एस. वाय. कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत्या.

## राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ३२ प्रकरणे निकाली...

# १ कोटी ४३ लाख ७० हजार रुपये वसूल

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१८ डिसेंबर -**

तालुका विधी सेवा समिती, निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशानुसार निलंगा येथील न्याालयात अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी दि.१४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत एकूण ३२ प्रकरणे निकाली काढण्यात आले. तर १ कोटी ४३ लाख ७० हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, कलम १३८ एन.आय. ॲक्टची प्रकरणे, कोर्टात प्रलंबित असलेली तडजोडपात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे असे एकूण ५८२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २२प्रकरणे निकाली काढून ८२ लाख ८५ हजार रुपये तडजोडी अंती नुकसान भरपाई वसूल करण्यात आली. तसेच दाखलपूर्व प्रकरणांमध्ये बँकांचे वसुली दावे असे एकूण २१६० प्रकरणांपैकी १० प्रकरणे निकाली काढून ६० लाख ८५ हजार रुपये वसूल करण्यात आले, दोन्ही प्रकरणामध्ये एकूण १ कोटी ४३ लाख ७० हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत.

या लोक अदालतीमध्ये ॲड. एस.व्ही. सोळंके, ॲड.ए.व्ही. सबनीस, ॲड.आर.बी. सुर्यवंशी, ॲड.टी.जी. सुर्यवंशी, ॲड.व्ही.बी. कांबळे यांनी पंच म्हणून काम पाहीले. तसेच पॅनल प्रमुख म्हणून निलंगा न्यायालयातील अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश एस.टी. भलेराव, दिवाणी न्यायाधीश व स्तर निलंगा ए.बी. मरलेचा, सह दिवाणी न्यायाधीश व स्तर निलंगा व्ही.डी.




भोसले, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर निलंगा आर.डी. खराटे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर निलंगा ए.एस. गुंजवटे यांनी यांनी काम पाहिले. तर लोक अदालत यशस्वी करण्यासाठी न्यायालयीन कर्मचारी व तालुका विधी सेवा समितीचे एस.बी. चांदोरीकर यांनी परिश्रम घेतले.

### सुमित कोकरे याचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१८ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा विद्यार्थी सुमित सुरेश कोकरे याची राज्यस्तरीय क्रिकेट संघात निवड होऊन तो राष्ट्रीय स्पर्धेत जाणार आहे.

याबद्दल या खेळाडूचा त्याच्या वडीलासह महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि कार्यकारिणीचे सदस्य बसवराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यास क्रीडासंचालक एस.बी.मुंढे आणि प्रा.रोहन येनाडले यांचे मार्गदर्शन लाभले होते.

## कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ; अहमदपूर, चाकूर तालुक्यात आनंदोत्सव

#### आ. बाबासाहेब पाटील कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेणारे पाहिले मंत्री

**तभा वृत्तसेवा**
**चाकुर, दि.१८ डिसेंबर -**

आ. बाबासाहेब पाटील यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेताच चाकूर व अहमदपूर तालुक्यात फटाके फोडून, पेढे भरपूर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चाकूर अहमदपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी रविवार दि.१५ डिसेंबर रोजी नागपूर येथील राजभवनावर कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिपदाची व गोपनीयतेची शपथ घेतली. राज्यपाल सी. राधाकृष्णन यांनी पाटील यांना शपथ दिली.



तब्बल वीस वर्षांनी चाकूर अहमदपूर विधानसभा मतदार संघाला आ. बाबासाहेब पाटील यांच्या रूपाने मंत्रिपद मिळाले आहे.

पाहिले कॅबिनेट मंत्री होण्याचा मानही आ. पाटील यांच्या नावे जात आहे. यापूर्वी किशनराव देशमुख, रामचंद्रराव पाटील व विनायकराव पाटील यांनी राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. आ. बाबासाहेब पाटील यांची मंत्री म्हणून शपथ घेताच नागपुरात आलेल्या पाटील समर्थक कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला.

तसेच चाकूर व अहमदपूर तालुक्यात फटाक्याची आतीषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शिरूर ताजबंदमध्ये तर दिवाळीच साजरी करण्यात आली. त्याचबरोबर ग्रामीण भागातही फटाकाची आतिषबाजी करण्यात आली.

मंत्री म्हणून शपथ घेण्याअगोदर दुपारच्या सुमारास आ. बाबासाहेब पाटील यांनी नागपूर येथील दीक्षाभूमिवर जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

यावेळी बौध्द अनुयायांनी पंचशील व त्रिशरण ग्रहण केले. तसेच आ. पाटील यांचा याठिकाणी सत्कारही केला.

## जीवनाच्या महत्वपुर्ण कौशल्याचा विकास सांघिक खेळामधुनच होऊ शकतो : जाधव



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१८ डिसेंबर -**

किशोरवयीन जीवन हे प्रगतिशील जीवन आहे या जीवनामध्येच व्यक्तीच्या सर्वांगीण गुणाच्या विकासाची प्रक्रिया वेगवान चालू असते, अशावेळी त्यांना सांघिक खेळामध्ये सहभागी होऊन स्वतःला व्यक्तिमत्व अधिक विकसित करण्याची संधी मिळते. नेतृत्व कौशल्य, पराजय सहन करण्याची कला, विजय आनंद साजरी करण्याची कला, संघटन कौशल्य इत्यादी महत्त्वपूर्ण कौशल्याचा विकास सांघिक खेळामधूनच निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन दि.१४ रोजी रविवारी कलापंढरी संस्थेच्या वतीने बिटरगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या कलापंढरी किशोरी क्रिडा महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आर.एस. जाधव यांनी केले.

आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुर्यकांत चव्हाण होते तर प्रमुख अतिथी म्हणून बाबासाहेब कदम, अंकुश शेळके, वसंत यादव, सविता कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामीण भागातील किशोरी मुली मध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणापूर तालूक्यातील बिटरगाव येथे किशोरी क्रिडा महोत्सवाचे दि.१५ नोहेंबर रोजी रविवारी आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक जाधव बोलत होते. ते पुढे बोलताना म्हणाले कि, अनेक ठिकाणी मुलांच्या खेळाच्या स्पर्धेचे आयोजन केलेले असते. परंतू आज या ठिकाणी कलापंढरी सामाजिक संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील किशोरी मुलींना खेळात आपले करीअर घडवण्यासाठी एक चांगला प्लॅटफॉर्म तयार करुन दिला आहे. प्रत्येक किशोरी मुलींनी आपले खेळांमध्ये करीअर निर्माण करण्यासाठी प्रयत्नशिल राहिल्यास नक्कीच यश आपलेच असेल, अशी भावना ठेऊन प्रत्येकी खेळ आवडीने खेळला जावा, असेही प्रतिपादन पोलीस उपनिरीक्षक आर एस जाधव यांनी केले.

आयोजीत करण्यात आलेल्या क्रिकेट, खोखो, कब्बडी स्पर्धेमध्ये पानगाव, बिटरगाव, वडवळ आदीसह इतर गावातील किशोरी मुली सहभागी झाल्या होत्या. यशस्वीतेसाठी सविता कुलकर्णी, शिवदर्शन सदाकाळे, जयवंत जंगापल्ले, मधुकर गालफाडे, वैभव क्षीरसागर, शालूताई साके, फराना शेख, आदींनी परीश्रम घेतले.

### शॉर्टसर्किटमुळे अडीच एकर ऊस जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.१८ डिसेंबर**

तालुक्यातील साकोळ शिवारातील शेतामधून गेलेल्या विजांच्या तारांमुळे शॉर्टसर्किट होऊन दोन शेतकऱ्यांच्या अडीच एकर उसाला लागली आग लागली.

महावितरणच्या तारांमुळे साकोळ येथील सर्वे नं.२२६ मधील २० गुंठे ज्ञानोबा काशिनाथ कडेकर तर याच सर्वे नंबर मधील महेश मोहन रामशेट्टे यांच्या शेतातील २ एकर मधील महावितरणच्या विद्युत तारांच्या ठिणग्या पडून ऊसाला आग लागून खाक झाला. महावितरणने याकडे विशेष लक्ष देऊन लोम्बकळणाऱ्या तारांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## पाथरवाडीत मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१८ डिसेंबर -**

रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथील श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ आणि लातूरच्या विवेकानंद रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने येत्या दि.२५ डिसेंबर रोजी डोळ्यांच्या आजारासंबंधी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिरामध्ये तिरळेपणा, काचबिंदू, मोतीबिंदू, डोळ्यावर पडदा येणे, कमी दिसणे आदी नेत्र विकारांबाबत मोफत तपासणी केली जाणार आहे. या नेत्र तपासणी शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

रुग्णांनी आपली नाव नोंदणी रमेश तुकाराम मद्दे यांच्याकडे दि.२३ डिसेंबर पर्यंत करावी. हे शिबीर पाथरवाडी येथील श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ या ठिकाणी सकाळी ९ ते १२ या वेळेत होणार आहे.

या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ आणि विवेकानंद रुग्णालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अंबुलगा येथील ओंकार साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांना २७५० रुपयांप्रमाणे ऊस बिलाचा हप्ता

#### चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१८ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार साखर कारखाना युनिट नं.२ कारखान्याच्या वतीने गळीत हंगाम सन २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास एफआरपीपोटी पहिला हप्ता प्रती मेट्रिक टन २ हजार ७५० रुपया प्रमाणे ऊस बिल हप्ता देण्याचे ठरले असल्याची माहिती कारखान्याच्या वतीने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे.

कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंबुलगा (बु) येथील ओंकार साखर कारखाना युनिट नं.२ या कारखान्याचा सन २०२४-२५ गळीत हंगाम यशस्वीपणे सुरु आहे. दि.१५ डिसेंबर अखेर कारखान्याचे गाळप ६२ हजार ३५४ मेट्रिक टन इतके झाले आहे. दि.१६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपीपोटी प्रती मे. टन २ हजार ७५० रुपये प्रमाणे ऊस पूरवठादार शेतकरी यांना अदा करण्यात येणार आहे व १ मार्च २०२५ पासून गाळपास येणाऱ्या ऊसास प्रती मे.टन रु.१०० प्रमाणे वाढीव रक्कम देण्याचे निश्चित केले आहे.



तसेच मागील वर्षानुसार याही वर्षी गळीतास आलेल्या ऊसास कारखाना धोरनानुसार दिपावली सनानिमीत्त मोफत साखर वाटप करण्याचे कारखाना व्यवस्थापनाने ठरवले आहे. चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून कारखाना व्यवस्थापण प्रयत्नशिल आहे.

## आ. संभाजी पाटलांना मंत्रीपद न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१८ डिसेंबर -**

निलंगा विधानसभा मतदारसंघातून चौथ्यांदा आमदार झालेले माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांना मंत्रिमंडळ विस्तारात संधी मिळाली नसल्यामुळे मतदारसंघातील कार्यकर्त्यात प्रचंड नाराजी पसरली आहे. निवडणूक काळात राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनी संभाजीराव पाटील निलंगेकर यांना निवडून द्या, त्यांना मंत्री करतो म्हणून मतदारांना दिलेले आश्वासन हवेतच विरले आहे.

निवडणूक प्रचारात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले, भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जाहीर सभा झाल्या होत्या. त्यावेळी त्यांनी उपस्थित मतदारांना तुम्ही निवडून द्या संभाजीरावांना मंत्री करतो अशी आश्वासन मतदारसंघातील जनतेला दिले होते. लातूर जिल्ह्यामध्ये भाजप महायुतीला भरघोस यश मिळूनही भाजपला मंत्रीपद न दिल्यामुळे संभाव्य स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर मोठा परिणाम होणार असून याबाबतचे नेतृत्व नेमके कोणाकडे द्यायची हे पक्षश्रेष्ठ समोर आव्हान असणार आहे. निलंगा मतदार संघ हा राजकीयदृष्या संवेदनशील मतदार संघ आहे. या मतदार संघाला काँग्रेस पक्षाकडून व भाजपाकडून सतत राज्याच्या सत्तेमध्ये नेतृत्वाची संधी मिळाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री कै.डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी अनेक वर्षी या भागाचे नेतृत्व मंत्रिमंडळात केले आहे. शिवाय त्यांनी विविध खात्याचा पदभार सांभाळून या भागाचा मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. त्यानंतर संभाजीराव पाटील यांनीही नुकत्याच झालेल्या निवडणुकीत चौथ्यांदा विजय प्राप्त केला आहे. राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीला मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारात संभाजी पाटील निलंगेकर यांचे नाव निश्चित मानले जात होते.



यापूर्वी अडीच वर्षांपूर्वी झालेल्या राजकीय घडामोडी नंतर एकनाथ शिंदे सरकारच्या विस्तारामध्ये सुद्धा त्यांना संधी देण्यात आली नव्हती. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत लातूर जिल्ह्यातील सहापैकी लातूर शहर मतदारसंघ वगळता पाच विधानसभा मतदारसंघात महायुतीला यश मिळाले आहे. शिवाय मागील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यामध्ये भाजपला सत्ता मिळवण्यात संभाजी पाटील यांचा मोठा वाटा होता. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांना थेट कॅबिनेट मंत्री पद देण्यात आले होते. परंतु राज्यांमध्ये मिळालेल्या भरघोस यशामुळे व लातूर जिल्ह्यातील भाजपला बळकट करण्यासाठी संभाजी पाटील-निलंगेकर यांना निश्चित कॅबिनेट मंत्री म्हणून संधी मिळेल असे अपेक्षा होती. शिवाय जेष्ठ आमदार असल्यामुळे नव्याने होणाऱ्या विस्तारात संभाजी पाटील यांनी निलंगेकर यांची वर्णी लागणार म्हणून शेकडो कार्यकर्ते नागपूर येथे आपले नाव पक्के आहे म्हणून उपस्थित होते. परंतु मंत्रिमंडळात संधी मिळाली नसल्यामुळे मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. लातूर जिल्ह्यात भाजप मोठा पक्ष असताना या पक्षाला संधी न मिळाल्यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची भविष्यात मोठी गोची होणार आहे. भाजपा पक्षश्रेष्ठी हा प्रश्न कसा हताळणार याकडे लक्ष लागले.

शिवाय राष्ट्रीय नेते व राज्यपातळीवरील नेत्यांनी निवडणुकी दरम्यान मंत्री करतो म्हणून दिलेले आश्वासन हवेतच विरले असून अशी आश्वासन केवळ निवडणुकीत निवडून येण्यापूरते दिली जातात. त्यानंतर फारसे गांभीर्य घेतले जात नाहीत याची प्रचिती मतदारसंघातील जनतेला मात्र यानिमित्ताने आली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संदीप पालके यांचे शैक्षणिक साहित्य जिल्हास्तरासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.१८ डिसेंबर -**
धाराशिव येथील शम्स उल उलुम उर्दू हायस्कुल येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जयहिंद

विद्यालय, कसबे तडवळे येथील उपक्रम शील शिक्षक पालके एस.टी.

यांनी बेस्ट फ्रॉम वेस्ट हे शैक्षणिक साहित्य सादर केले होते.

त्यांचा तालुक्यातून प्राथमिक शिक्षक गटात प्रथम क्रमांक आला असून, त्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

पालके एस.टी.यांनी विज्ञान प्रदर्शनातील यशाची परंपरा कायम राखत शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल केले.

त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



त्यांच्या या यशाबद्दल श्री.शि.शि. प्रसारक मंडळ, बार्शीचे सर्व पदाधिकारी, शा.व्य. समितीचे अध्यक्ष,

सर्व सदस्य, शिक्षण विस्ताराधिकारी किशोरी जोशी, केंद्रप्रमुख जगदीश जाकते, मुख्याध्यापक आर.डी. गाढवे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी कौतुक केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकीत एक दिवशीय मार्गदर्शन सत्र संपन्न

**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**
श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात मधील संगणक विभागातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिप कशी करावी. तसेच संगणक क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधी यासाठी विभाग प्रमुख प्रा.डी.जे. वाघमारे यांनी एक दिवसाचे मार्गदर्शन सत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमाला मार्गदर्शिका म्हणून वैभवी अशोक पोळ (मास्टर कार्ड पुणे) हे उपस्थित होत्या. त्यांनी इंटर्नशिपचे महत्व, तसेच संगणक क्षेत्रामध्ये नोकरीच्या संधी यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा चव्हाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नितीन कुलकर्णी, महेश नवगिरे, प्रा.डी.डी. रणखांब यांनी काम पाहिले.



### ईव्हीएम विरोधात काँग्रेसची जळकोट येथे स्वाक्षरी मोहीम

**जळकोट, दि.१७ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे काँग्रेस (आय) पक्षाच्यावतीने ग्राम पंचायतसमोर ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्यावतीने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या इव्हीएम हटवा, देश वाचवा, इव्हीएम हटवा, लोकशाही वाचवा या मागणीसाठी दि.१७ रोजी जळकोट येथे ही मोहीम राबवून यापुढे देशातील सर्व निवडणुका मतपत्रिकेवर शिक्का मारून घेण्यात याव्यात. यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रकाश चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोकराव पाटील, सरपंच गजेंद्र पाटील, युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास पाटील, शंकर वाडीकर, ग्रामपंचायत सदस्य कल्याणी साखरे, जीवन कुंभार, दत्तात्रय चुंगे, यशवंत सुरवसे, अमोल आलुरे, विश्वनाथ कार्ले, विश्वास भोगे, सागर करंडे, सलीम तांबोळी, विश्वनाथ सुरवसे, पांडुरंग गिरी, यशवंत पाटील, समाधान पाटील, उमाकांत माळी, गिरीश नवगिरे, सोसायटीचे माजी चेअरमन राजकुमार पाटील यांच्यासह नागरिकांनी उपस्थित राहुन स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदवला.



### संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ बोंबमारो आंदोलन

**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**
बीड जिल्ह्यातील मस्सा जोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली. याच्या निषेधार्थ राज्य सरकारला जाग येण्यासाठी तहसील कार्यालय समोर सकल मराठा समाजाच्यावतीने सोमवारी बोंब मारो आंदोलन करण्यात आले. मयत संतोष देशमुख यांच्या मुख्य आरोपीला अद्यापही अटक केली नाही आरोपी सध्या फार आहे शासन याची कुठली दखल घेत नाही याचा निषेध करून मराठा सकाळ समाजाच्या वतीने बोंब मारू आंदोलन करण्यात आले. यावेळी मराठा सकल समाजाचे अड. धीरज पाटील, महेश गवळी, आण्णासाहेब क्षीरसागर, अमोल कुतवळ, आबासाहेब कापसे, अजय साळुंके, अमोल जाधव, राहुल खपले, प्रशांत सोंजी, शरद जगदाळे, सुदर्शन वाघमारे, बाळासाहेब कदम, कुमार टोले, आनंद जगताप, अमर चोपदार इत्यादी जनासह मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### मराठी पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी अरूण लोखंडे

**जळकोट, दि.१७ डिसेंबर -**
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तुळजापूर तालुका अध्यक्षपदी अरुण लोखंडे यांची फेरनिवड करण्यात आली



तर तालुका उपाध्यक्षपदी इरफान काझी यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत पत्रकार संघाच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत पत्रकार कार्यकारिणीची निवड करण्यात आली. तालुकाध्यक्ष म्हणून जळकोट येथील अरुण लोखंडे यांची फेरनिवड करण्यात आली तर तालुका उपाध्यक्षपदी नळदुर्ग येथील इरफान काझी यांची निवड करण्यात आली. निवडण्यात आलेली कार्यकारिणी अशी सचिव एस.के. गायकवाड, सहसचिव संजय पिसे, कार्याध्यक्ष विजय पिसे, सल्लागार मारुती बनसोडे, किशोर धुमाळ, संघटक शामकांत नागीले आदींची निवड करण्यात आली. मंत्रालयीन प्रतिनिधी म्हणून अहमद शेख यांची निवड करण्यात यावी, असा ठराव घेण्यात आला.

# नागपूर एम्सच्या धर्तीवर होणार वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकीरण

**आमदार पाटील यांनी केली पाहणी...**

**२० डिसेंबरला एम्सच्या संचालकांसोबत अधिष्ठाता व बांधकामचे अधिकारी यांची बैठक...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**
जिल्ह्यातील रुग्णांना चांगल्याप्रकारे अत्याधुनिक वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्या याकरिता नागपूर एम्सच्या धर्तीवर धाराशिवच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकरण केले जाणार आहे. एम्सची कार्यपद्धती, सोयी सुविधा, इमारत आणि अनुषंगिक बाबींची पाहणी करून त्यासंबंधी माहिती जाणून घेतली. आपल्याकडे त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता, बांधकाम विभागाचे अधिकारी आणि वास्तुरचनाकार यांची २० डिसेंबर रोजी नागपूर येथे एम्सच्या संचालकांसह बैठक आयोजित केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मंगळवारी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नागपूर येथील एम्सच्या कार्यपद्धती आणि एकूण कामकाजाबाबत एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. रमेश जोशी यांच्याकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच धाराशिवमध्ये नागपूर एम्सच्या धर्तीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा केली. एम्समध्ये दररोज बहारुग्ण विभागात सुमारे तीन हजाराहून अधिक तर अंतररुग्ण विभागात आठशे रुग्णांची अद्ययावत पद्धतीने तपासणी आणि उपचार केले जातात. अगदी त्याच पद्धतीने आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अत्याधुनिक पायाभूत



सोयीसुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करीत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. त्यासाठी २० डिसेंबरला नागपूर येथील एम्स रुग्णालयात कार्यकारी संचालक डॉ.डॉ. रमेश जोशी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

नागपूर एम्सच्या धर्तीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकरण करून संपूर्ण महाविद्यालय आणि वैद्यकीय संकुल अद्यावत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

त्यासाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता, बांधकाम विभागाचे अधिकारी, वास्तुविशारद तसेच आयडिया कॉम्पिटिशन स्पर्धेतील सहभागी विजेते या सर्वांची एकत्रित बैठक बोलाविण्यात आली आहे. या बैठकीत वैद्यकीय संकुलाची इमारत, अत्याधुनिक सोयी सुविधा, अंतर्गत व्यवस्था, विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग यांच्यासाठी अत्यावश्यक असलेल्या बाबी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे रुग्णांवरील दर्जेदार उपचार यासाठी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. जोशी महत्वपूर्ण मार्गदर्शन आणि माहिती उपलब्ध करून देणार आहेत. नागपूर एम्सच्या धर्तीवर आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकरण करण्यासाठी या बैठकीची मौलिक मदत होईल.

महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने लवकरच त्याअनुषंगाने प्रत्यक्ष काम सुरू केले जाईल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या अधिकाऱ्यांची अनाथ विद्यार्थ्यांचे खाते काढण्यास चालढकल?

**अनाथासाठी मिळणाऱ्या मदतीपासून वंचित राहणार...**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.१८ डिसेंबर -**
राज्य शासनाकडून अनाथ मुलांना मदत म्हणून दरमहा आर्थिक मदत देण्यात येते. मात्र ही मदत जमा होण्यासाठी लागणारे बँक उघडण्यासाठी मंगरुळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून चालढकल होत असल्याचा दुर्देवी प्रकार घडला आहे. या मदतीपासून हे अनाथ बालक वंचित राहण्याची शक्यता असून याप्रकरणी संबंधित विभागाने लक्ष देवून अनाथास मदत करण्याची मागणी मंगरुळ ग्रामस्थांतून होत आहे.

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील कृष्णाथ गजेंद्र मगर व त्यांच्या पत्नीचे गेल्या चार ते पाच वर्षांपूर्वी कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने निधन झाले असून त्यांच्या पाल्यास अभिषेक कृष्णाथ मगर यास जिल्हा परिषद व बालकल्याण विकास समिती यांच्याकडून मानधन मंजूर झाले आहे.

मंगरूळ हे गाव महाराष्ट्र ग्रामीण बँकेस दत्तक असल्याने त्यांचे संबंधित नातेवाईक बँकेत खाते काढण्यास गेले असता त्यांना विविध कारणे सांगून (आधार शिडिंग नाही, विद्यार्थ्यांचे खाते आम्ही चालू करत नाही, नातेवाईक किंवा आजी आजोबा यांचे आधार द्या, बँकेच्या नियमानुसार काम करू वरून अँप्रोल आल्यानंतर खाते चालू करू)अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन चालढकल करण्यात येत असल्याचा आरोप बँकेशी संपर्क साधलेल्या पालक व नातेवाईक यांनी केला आहे.

याबाबत जिल्हा बालविकास अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांनी अनाथास न्याय द्यावा, अशी मागणी मंगरूळ येथील ग्रामस्थांतुन जोर धरू लागली आहे

## तुळजापूरात गुणरत्न सदावर्ते यांच्यावर बुक्का उधळून सकल मराठा समाजाचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ डिसेंबर -**
विधिज्ञ गुणरत्न सदावर्ते हे दि.१८ डिसेंबर रोजी तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले असता सकल मराठा समाजाच्यावतीने घोषणाबाजी आणि बुक्का उधळत मराठा आरक्षणाचा विरोधकाचा जाहीर निषेध एक मराठा लाख मराठाच्या घोषणा दिल्या.

भवानी रोडवरील असलेल्या गेट पासून कुठल्याही व्हीआयपीच्या गाड्यांना मंदिराकडे एन्ट्री नसल्याने अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते हे त्यांच्या पत्नीसोबत सुरक्षारक्षकांसह आणि कार्यकर्त्यांसोबत तुळजाभवानी मंदिराकडे दर्शनास जात असताना सुवर्णेश्वर मंदिराच्या पुढे सकल मराठा समाजाच्या पदाधिकारी सदस्यांनी बुक्क्याची उधळण करत घोषणाबाजी करून निषेध नोंदवला. मराठ्यांना दिलेले आरक्षण हे असंवैधानिक



असल्याची याचिका सर्वोच्च न्यायालयात लढवून मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे काम सदावर्ते यांनी केले असून आरक्षणासाठी ३५० विद्यार्थी, शेतकरी आणि युवकांच्या आत्महत्येसाठी जबाबदार हा गुणरत्न सदावर्तेच आहे. त्यामुळे निषेध करण्यासाठी सकल मराठा समाजानी सदावर्तेला बुक्का लावण्याचे काम केले आहे.

यावेळी सकल मराठा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. पोलिसांच्या समयसूचकतेमुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

## शिक्षकांना वाढीव महागाई भत्ता लागू करण्याची शिक्षक परिषदेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**
केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना जुलै-२०२४ पासून वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. त्या धर्तीवर राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जुलै-२०२४ पासून वाढीव महागाई भत्ता त्वरीत लागू करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा धाराशिव यांच्या वतीने शिक्षण सचिवांकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात बुधवारी (ता.१८) संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने त्यांच्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे.

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने एकमताने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचारी आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दि. १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याबाबत राज्य सरकारने त्वरित शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे.

तरी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करुन शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्यांचा हक्काचा आर्थिक लाभ मिळवून देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आल्याची माहिती परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

याबाबत जिल्हा बालविकास अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांनी अनाथास न्याय द्यावा, अशी मागणी मंगरूळ येथील ग्रामस्थांतुन जोर धरू लागली आहे.

## प्रबोधन युवाशक्ती फाउंडेशन पुणे यांच्या वतीने कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी अनिल जगताप यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**
प्रबोधन युवाशक्ती फाउंडेशन पुणे यांच्या वतीने राज्यातील क्रीडा, संस्कृती, कला, साहित्य, कृषी, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या राज्यातील नामांकित व्यक्तींना दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यावर्षी हा कार्यक्रम १५ डिसेंबर रोजी एसपी महाविद्यालय पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी केलेल्या शेतकऱ्यांसाठीच्या पिक विमा आणि दुष्काळ अनुदान इत्यादी बाबींचा विचार करून त्यांचा गौरव करण्यात आला.



यावर्षी हा पुरस्कार राज्यातील २१ नामांकित व्यक्तींना देण्यात आलेला आहे. कामगार पुरस्कार नेते डॉ. रघुनाथराव कुचिक व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार प्राप्त व्यक्तीमध्ये स्त्रीभ्रूणहत्येविषयी काम करणाऱ्या पुण्यातील प्रसिद्ध डॉ. तृप्ती राख, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे व्हॉलीबॉल मध्ये प्रति प्रतिनिधित्व करणारे तुषार पाटील, सलग १२४ तास कथक नृत्य करून वर्ल्ड बुक मध्ये रेकॉर्ड करणारी सृष्टी जगताप, महिला बचत गट व वंचित घटकासाठी काम करणाऱ्या मुंबई येथील डॉ. ज्योती साठे कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी उल्लेखनीय काम केलेले अनिल जगताप इत्यादींचा समावेश आहे.



प्रबोधन फाउंडेशन पुणे यांच्या वतीने पुणे येथे माझा सत्कार केला त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. हा पुरस्कार मला आणखी काम करण्याचा बळ व ऊर्जा देणारा आहे. यापुढील कालखंडात देखील बळीराजासाठी ताकतीने सेवा करू. मिळालेला पुरस्कार राज्यातील बळीराजाला समर्पित करतो.
**- अनिल जगताप. सामाजिक कार्यकर्ते**

## पवनचक्की कंपनीकडुन बळाचा वापर करुन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणुक

**✻ पवनचक्की कंपनीवर कारवाई करुन त्यांचा परवाना रद्द करा करण्याची स्वराज्य पक्षाची जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ डिसेंबर -**
पवनचक्की कंपनीकडून बडाचा वापर करून तसेच भाडोत्री गुंडाकडून शेतकऱ्यांना दमदाटी करून त्यांच्या जमिनी बळकावण्याचे काम चालू असून अशा पवनचक्की कंपनीवर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी करत स्वराज्य पक्षाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, धाराशिव जिल्हयामध्ये अनेक कंपन्यांचे पवनचक्की बसविण्याचे काम चालु आहे.

सदर पवनचक्की कंपनीकडुन त्यांनी कामावर ठेवलेल्या भाडोत्री



गुंडाकडुन शेतकऱ्यांना दमदाटी, मारहाण व मानसिक त्रास देवुन त्यांच्या जमीनी त्यांना विश्वासात न घेता त्यांची फसवणुक करुन व योग्य मोबदला न देता, कोऱ्या स्टॅम्पवर सह्या घेवुन जबरदस्तीने जमीनी बळकावुन शेतकऱ्यांची फसवणुक होत आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांना या कंपन्याचा त्रास होत असताना सुध्दा गावातील प्रमुख लोकांकडुन दबाव तंत्राचा वापरुन शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण करण्याचे काम या कंपन्या करत असुन साम, दाम, दंड, भेद याचा वापर करुन या कंपन्या शेतकऱ्यांच्या जमिनी अल्प मोबदला देवुन गिळंकृत करीत आहेत.

पवनचक्की कंपनीवर कारवाई करुन त्यांचा परवाना रद्द करण्यात यावा.

अन्यथा स्वराज्य पक्ष रस्त्यावर उतरुन या कंपनीच्या विरोधात अंदोलन करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम करेल हे करत असताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशारा सदरील निवेदनात दिला आहे.

निवेदनावर स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश गवळी, जीवन इंगळे, कुमार टोले, सत्यजित साठे, पांडुरंग ढेरे, प्रमोद शिंदे, बाळासाहेब खांडेकर, कल्याण बंडगर, बाबासाहेब बंडगर, लिंबराज पाटील, बाळासाहेब कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मराठवाडा शिक्षक संघाचे आज लक्षवेधी धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**
मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने मराठवाड्यातील सर्व शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालयासमोर शैक्षणिक क्षेत्राच्या विविध मागण्यासाठी दि.१९ गुरुवार रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आलेले आहे.

त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्य.) धाराशिव कार्यालयासमोर मराठवाडा शिक्षक संघ धाराशिवच्यावतीने निदर्शने, लक्षवेधी आंदोलन आयोजित केले आहे. सध्या हिवाळी अधिवेशन सुरु असल्यामुळे आपल्या सर्वांना जुनी पेन्शन मिळाली पाहिजे, २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर शंभर टक्के अनुदानित शाळा कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, आशा एकूण २६ मागण्या मान्य करण्यासाठी सदर आंदोलन, लक्षवेधी निदर्शने धाराशिव येथे करण्यात येणार आहे.

शिक्षकांनी आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने, केंद्र कोषाध्यक्ष अवताडे. ए.बी, सुशीलकुमार तीर्थकर व जमादार एफ.जी, विक्रम मायाचारी, डी.के भोसले, रमण जाधव व संतोष सोलंकर, गीते जे.पी व बलसुरे यांच्यासह आदिंनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शहरात ऑटो तपासणी मोहिम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ डिसेंबर**

शहरात वाहतुकीचा बोजवारा उडाला असून, प्रत्येक चौकात वाहतुकीची होत असलेली कोंडी सोडविण्याचा प्रयत्न म्हणून वाहतूक शाखेच्या वतीने शहरात ठिकठिकाणी वाहन तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. विशेष करुन या मोहिमेत ऑटोची कसून तपासणी करण्यात येत आहे.

शहरातील श्रीनगर, शिवाजीनगर, कलामंदिर, वजिराबाद, जुनामोंढा, नविन मोंढा, आनंदनगर आदीसह अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यातच बेशिस्त वाहन धारक यामुळे देखील वाहनधारकांसह पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. विशेष करुन



बेशिस्त ऑटो चालकामुळे वाहतुकीची कोंडी होण्याचे प्रमाण वाढले असल्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या सुचनेवरुन आजपासून शहरातील वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. विशेष करुन यात ऑटो तपासणीवर भर देण्यात आला असून, आज सकाळपासूनच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा गांधी पुतळा, नविन मोंढा आदीसह काही ठिकाणी ऑटो तपासणी मोहिम राबविण्यात आली. या मोहिमे दरम्यान चालक परवाना तसेच वाहनांची कागदपत्रे नसलेली वाहने जप्त करण्यात आली आहेत. या ऑटो तपासणी मोहिमेत ग्रामीण पोलिसांनी पहिल्याच दिवशी तब्बल ७० ऑटो जप्त केले आहेत. ऑटो तपासणी मोहिम सुरुच राहणार असून, वाहन धारकांनी वाहना संबंधीचे कागदपत्रे सोबत बाळगावेत तसेच ऑटो चालकांनी गणवेश परिधान करुनच प्रवाशांना सेवा द्यावी, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान अनेकवेळा पोलिसांच्या वतीने वाहन तपासणी मोहिम राबविण्यात येते. परंतु हि मोहिम केवळ एक ते दोन दिवसापुरती मर्यादित असल्याने शहरात पुन्हा वाहतुकीची समस्या जैसे थे होत असल्याने पोलिसांनी या तपासणी मोहिमेत सातत्य ठेवावे, अशी मागणी शहरातील नागरिकांतून होत आहे.

# भावी नगरसेवकांना लागले निवडणुकीचे डोहाळे

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. १८ डिसेंबर**

जिल्ह्यातील अनेक नगरपालिका निवडणूक काही दिवसात लागणार असून त्यापैकी एक म्हणजे देगलूर नगरपालिका निवडणूक अधिकृतपणे जाहीर झालेली नाही. मात्र, इच्छुक उमेदवारांना आतापासूनच या निवडणुकीचे वेध लागले आहेत.

देगलूर नगरपालिकेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. अद्याप निवडणुकीचा कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर झालेला नाही. मात्र, इच्छुक उमेदवारांचा खर्च मात्र सुरू झाल्याची चर्चा ठिकठिकाणी ऐकायला मिळत आहे. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने जेवणावळी सुरू असतानाच हॉटेल,खानावळ,धाब्यांवरही वर्दळ वाढत आहे. विविध सामाजिक कार्यक्रमांबरोबरच



प्रत्यक्ष भेटीगाठी घेऊन वैयक्तिक चर्चा करून मत आजमावले जात आहे. यंदा शहरामध्ये नगरपालिकेची निवडणूक होणार आहे. मतदारांची वाढलेली संख्या त्याचबरोबर क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठे असलेले प्रभाग 'कव्हर' करताना इच्छुक उमेदवारांना कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन इच्छुक उमेदवारांनी आधीपासूनच कामाला सुरुवात केली आहे. प्रभागातील कार्यकर्ते आपल्या 'रेंज' मध्ये आणण्यासाठी खर्च तर करावाच लागणार, अशी आशा ठेऊन काम केले जात आहे.

शहरात राजकिय चर्चा सोबतच, भावी नगर सेवकास नगर परिषद निवडणुकीचे आतापासुन वेध लागले आहे. अशा प्रकारे प्रत्येक राजकारणी, दिग्गज कार्यकर्ते व स्वयघोषीत पुढारी आपआपल्या परीने निवडणुक प्रक्रिया घोषीत होण्याची. चातकासारखी वाट पाहत असुन लहान मोठे कार्यक्रम घेऊन मीच उमेदवारीस योग्य असल्याचा आव आणताना दिसत आहे काही तर वार्डातील प्रमुख तरुणाना हाताशी धरून अधुनमधुन हॉटेलच्या ओल्या जेवणाचा आस्वाद देत आहे काही असो येणार नगर परिषदेची निवडणुक ही अत्यंत चुरशीची होईल असे चित्र दृष्टीस पडत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या

**नांदेड**-बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच पती संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली, त्यामुळे या घटनेतील मारेकऱ्यांवर कठोरातील कठोर शासन करावे. आरोपींना फासावर लटकवावे, अशी मागणी सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. पवनचक्की उभारण्यासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या त्या शेतकऱ्यांना शासन नियमाप्रमाणे मावेजा देण्यात आला नव्हता. तो मावेजा मिळावा यासाठी मस्साजोगचे सरपंच पती संतोष देशमुख यांनी शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला होता. नेमकी हीच बाब पवनचक्की उभारणाऱ्या कंत्राटदार संबंधितांना खटकली. त्यामुळे त्यांनी संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या केली. हत्येपूर्वी देशमुख यांचे अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर त्यांचा जीव घेण्यात आला. संतोष देशमुख हे समाजसेवेसाठी स्वतःला वाहून घेतलेले एक युवक होते. केज तालुक्यातील प्रत्येक गावात आणि त्या भागाच्या विकासासाठी संतोष देशमुख यांनी दिलेले योगदान अतुलनी असे राहिले आहे. समाजसेवेसाठी ध्येयवेड्या असलेल्या एका तरुण उमद्या कार्यकर्त्याची अशी निर्दयी हत्या करणे म्हणजे आगामी काळात कोणतेही कार्यकर्ते निर्माण होऊ नयेत यासाठीची निर्माण केलेली दहशत होय, असे सांगून नारायण कदम म्हणाले की, सरपंचावर होणारे हल्ले थांबविण्याचे अनुषंगाने राज्य सरकारने सरपंच संरक्षण कायदा अस्तित्वात आणावा. त्यासाठी विशेष अधिवेशन बोलवावे, अशी मागणी ही त्यांनी केली. दरम्यान संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना अटक करण्यात आली असली तरी या प्रकरणाचा संपूर्ण छडा लावून न्यायालयीन चौकशी करावी, हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना फासावर लटकवावे, अशी मागणीही सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम यांनी केली आहे.

### अर्धा रब्बी हंगाम गेला तरी डेरला लिफ्टला पाणी पाळ्यांचे नियोजन नाही?

**नांदेड-** डेरला लिफ्ट विष्णुपुरी प्रकल्प प्रशासनाच्या दुरुस्तीच्या नावाखाली उदासीन भूमिकेमुळे अर्धा रब्बी हंगाम गेला तरी पाणी पाळ्यांचे नियोजन नाही तरी तात्काळ ७ पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे. आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प म्हणून विष्णुपुरी जलसिंचन प्रकल्पाला ओळखले जाते. विष्णुपुरी जलसिंचन प्रकल्पातील मुख्य कालवा पांगरा शाखा व डेरला लिफ्ट ही पहिली लिफ्ट योजना आहे. या दोन्हीही शाखेला आज अर्धा हंगाम रब्बी होऊन गेला तरी पाणी पाळ्यांचे नियोजन प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे सचिव अधीक्षक अभियंता जलसंपदा सर्कल नांदेड यांनी केले नाही. दुरुस्तीच्या नावाखाली वेळकाढूपणा केला जात आहे व एकीकडे पाणी पाळ्यांचे नियोजन न करता दुसरीकडे माती काम करण्याकडे जास्त भर दिला जात आहे आणि यांत्रिकी कामाला तसेच मेकॅनिकल कामांना व हायड्रोलिक कामांना दुर्लक्षित केले जात आहे. त्यांच्या या अनियमिततेमुळे शेतकरी वर्गामध्ये संतापाची लाट आहे. खरीप हंगामामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे खरीप हंगाम हातचा गेला आहे. आता रब्बी हंगामावर शेतकऱ्यांची आशा असताना जलसंपदा प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे व सिविल आणि मेकॅनिक हायड्रॉलिक विभागातील असमन्वयामुळे आजपर्यंत डेरला लिफ्टला पाणी पाळ्यांचे नियोजन केले गेले नाही. तसेच अधीक्षक अभियंता सिविल यांच्या उदासीन भूमिकेतून मेकॅनिक विभागाला निधी देत नाहीत व विष्णूपुरीच्या मुख्य शाखा कालवा पांगरा शाखेलासुद्धा पाणी पाळ्यांचे नियोजन केले नाही. एकीकडे अधीक्षक अभियंता हे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालवा सल्लागारची बैठक झाली असं सांगतात व त्यामध्ये सात पाणी पाळ्या देणार असल्याचे तोंडी बोलतात, परंतु प्रत्यक्षात कृती काही करत नाही. तरी मुख्यमंत्र्यांनी विष्णुपुरी प्रकल्पाच्या मुख्य शाखा कालवा पांगरा तसेच डेरला लिफ्टला पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश देऊन सुशासनाचा प्रत्यय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, माधवराव देसाई, गोविंदराव मुकदम, बालाजीराव जाधव पिंपळवाडीकर, लिंगोजीराव पाटील हरबळकर, शिवाजीराव पाटील शिंदे यांनी केली आहे.

# तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची राज्यस्तरीय बैठक

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १८ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य कृषि पदवीधर तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची राज्य कार्यकारिणीची बैठक दि. २२ डिसेंबर ,रोजी श्री क्षेत्र सप्तशृंगी गड ता.कळवण जिल्हा नाशिक येथे राज्याध्यक्ष नितीन धामणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस राज्यसचिव हरिश्चंद्र काळे (अहिल्यानगर) मधुकर मुंगल (नांदेड) महेंद्र निकम (छत्रपती संभाजी नगर) नारायण पवार (सातारा) यासह राज्य पदाधिकारी सभेस मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी राज्य कार्यकारिणी पदाधिकारी विभागीय अध्यक्ष सचिव व पदाधिकारी जिल्हाध्यक्ष जिल्हा सचिव व पदाधिकारी तसेच राज्यातील सक्रिय सभासद बांधव सभेस उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेणार आहेत.

या बैठकीत राज्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या मंत्रालयीन स्तरावर प्रलंबीत विविध मागण्यांचा पाठपुरावा करणे नुकतेच शासनाने दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी ही दोन्ही पदे एकत्र करुन या पदाचे नामाभिधान ग्रामपंचायत अधिकारी करण्यात आले आहे. या निर्णयामुळे संवर्गाच्या वेतनत्रुटी दूर करण्याच्या मार्गातील एक टप्पा सोडविल्याबद्दल राज्य शासनाच्या अभिनंदनचा ठराव करण्यात येणार आहे. तसेच ग्रामपंचायत अधिकारी संवर्गास सातव्या वेतन आयोगानुसार दि. १ जानेवारी,२०१६ पासून काल्पनिक वेतन लागू करून वेतन निश्चितीत एकसमानता येण्याकरिता करिता शुद्धिपत्रक निर्गमित करण्याबाबतच्या मागणीचा पाठपुरावा करणे संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेऊन नवीन पदनामाप्रमाणे संघटनेच्या नावात बदल करून संघटणेची घटना दुरुस्ती करणे, ग्रामपंचायत अधिकारी संवर्गावरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करणे,पुढील वर्षी होणाऱ्या संघटना कार्यकारिणी सन २०२५-२०३० पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिये बाबत चर्चा करणे,तसेच संवर्गात १ नोव्हेंबर २००५ नंतर रुजु झालेल्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी पाठपुरावा करणे,संघटनेची घटना व ध्येय धोरणे यांचा आढावा घेऊन सभासद नोंदणी व व्याप्ती वाढविणे,राज्य व विभागीय कार्यकारिणीतील रिक्त पदे भरणे व हंगामी जिल्हा कार्यकारणीस मान्यता देणे,नवीन निवड झालेल्या पदाधिकारी यांचा सन्मान करून जबाबदारी देणेसंवर्गातील पदोन्नती व विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करणे,यावेळी संघटनेचे पुढील ध्येय धोरणे, गतिमानता व्याप्ती व कामाची दिशा या विषयावर बैठकित चर्चा करुन निर्णय घेणार आहेत अशी माहिती नांदेड जिल्हाध्यक्ष गुलाब वडजे व जिल्हा सचिव संजय देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. या बैठकिसाठी संघटना पदाधिकारी व सक्रिय सभासद बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे जेष्ठ मार्गदर्शक अनुप श्रीवास्तव, विभागीय उपाध्यक्ष सुनील पारडे, विठ्ठल सुर्यवंशी, के. डी.सुर्यवंशी, तसेच नांदेड जिल्हा कार्याध्यक्ष संदिप कच्छवे, कोषाध्यक्ष बालाजी पंतोजी, उपाध्यक्ष मोहन राहुलवाड, प्रशांत कोकाटे, प्रभाकर सोगे, श्रीमती. शोभा पारसेवार ,अरुण चौधरी, माधव ढगे, भास्कर कापसे, जगन्नाथ लकडे, बालाजी कनोजवार, नारायण काळे, शिंदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# जल साक्षरता विषयक प्रशिक्षण उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ डिसेंबर**

जल जिवन मिशन कार्यक्रम अंतर्गत जल साक्षरता विषयक दोन दिवसीय अनिवासी कार्यशाळा ता.२९,३० व ता.०२,०३ रोजी सुमन लॉन्स येथे संपन्न झाली. सदरील कार्यशाळे मधे तालुक्यातील विविध ग्रामपंचायत मधील ग्राम पेयजल स्वछता समिती सरपंच, उपसरपंच,जल सुरक्षक,सदस्य यांनी सहभाग नोंदवीला होता.या कार्यशाळे मधे जल जिवन मिशन अंतर्गत जलसाक्षरता विषयाचे महत्त्व,योजनेची नियमित संचालन देखभाल व दुरुस्ती, जल जिवन मिशन योजना,पाणि पुरवठा योजने



मधील भविष्यतील आव्हाने, उपाययोजना,जल जिवन मिशन योजना मालकी,गावाचे पेयजल अंदाज पत्रक पेयजल संहिता, पाणि पट्टीचे महत्त्व,नळ पाणि पुरवठा योजना हस्तांतरण, जल व्यवस्थापन कृतिआराखडा तयार करने आदि विषयांवर चित्रफितीद्वारे, वेगवेगळ्या खेळाद्वारे,सत्राच्या माध्यमातुन विस्तृत माहिती देण्यात आली. प्रशिक्षणाचे नियोजन गटविकास अधिकारी पंचायत समिती.के. व्हि. बळवंत यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले.याकार्यक्रमास विस्तार अधिकारी आनंद सावंत,गुणवंत चव्हाण ओ.एस. ,आकाश कुवाळ इंजीनियर,गट समन्वयक सचिन डुरे यांनी पाहनी केली. सदरील प्रशिक्षण के. आर.सी. टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठान परभणी संस्थेचे तज्ञ प्रशिक्षक मनोज मोहरील, रामचंद्र खिल्लारे,राजु गुट्टे विलास भालेराव इ.प्रशिक्षक यांच्या वतीने प्रशिक्षण देण्यात आले.संस्थेचे सचिव शैलेश सिसोदिया यांनी कार्यशाळा यशस्वी करण्याची भुमिका बजावली तर नियोजन हे राज्य प्रशिक्षण समन्वय क किशोरकुमार वागदरीकर जिल्हा समन्वयक,पांडुरंग हुलेकर, लक्ष्मीकांत पंडित, आकाश काशीदे, आकाश कुरे अ, सुधाकर माने, ज्ञानेश्वर मोहिते, आदेश धुळे आदिनी कार्यक्रम यशस्वी करण्या करीता प्रयत्न केले.

# शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी वैष्णवी पांचाळची निवड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ डिसेंबर**

पुणे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने वर्धा येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय थांग - ता मार्शल आर्ट स्पर्धेत , जिजाऊ सृष्टी प्रशिक्षण केंद्रातील खेळाडू वैष्णवी पांचाळ या खेळाडूने १७ वर्षे वयोगटात लातूर विभागाचे नेतृत्व करत राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले व महाराष्ट्र संघात आपले स्थान निश्चित केले. दिल्ली येथे दिनांक १० ते १४ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या स्पर्धेत ती महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणार आहे. या स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार ठोंबरे, क्रीडा अधिकारी विपुल दाबके, संघटनेचे अध्यक्ष महारुद्र खराणे, श्रीरामवार, संजय बेतेवार ,संजय चव्हाण, संतोष कनकावार यांच्या शुभहस्ते जिल्हा क्रीडा अधिकायरी कार्यालय येथे सत्कार करण्यात आला व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या . खेळाडूला एकनाथ पाटील, अनुराधा पाटील ,विशाल कंदुलवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हिमायतनगर येथील पीडितांचे उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. १८ डिसेंबर**

हिमायतनगर तालुक्यातील मागील ७० वर्षांपासून रहिवास आहेत.लाईट बील,नळ पट्टी आणि सर्व कर वसूल केला जातो परंतु घरटॅक्स पावती मिळेना हे प्रकरण गंभीर असून मंगळवार ता.१७ डिसेंबर पासून सीटू आणि लोकविकास संघर्ष समितीच्या नेतृत्त्वाखाली १५६ पीडितांनी आमरण उपोषणास सुरवात केली आहे.

हिमायतनगर ग्रामपंचायत असताना ७० वर्षांपूर्वी तेथील अनेक नागरिकांना घरभाडे तत्वावर राहण्यासाठी जमीन देण्यात आली आहे. आताची नगर पंचायत




घरभाडे, नळपट्टी आणि इतर कर नित्यनियमाने वसूल करीत आहे. सर्वांना विद्युत मीटर देखील मिळाले आहेत परंतु मालकी हक्क प्रमाणपत्र अद्याप मिळाले नाही. ही खुपच गंभीर बाब आहे. हिमायतनगर वाशीय मागील सात दशकापासून राहतो ते घर नावावर व्हावे म्हणून झगडत आहेत. ही स्वतंत्र भारतातील शोकांतिकाच म्हणावी लागेल.स्वातंत्र्याचा ७७ वर्धापन दिवस आपण साजरा केलाय आणि पीडिताना लहान लेकरा बाळासह आमरण उपोषणास बसावे लागत आहे.

एकीकडे शासकीय जमीन आणि मोकळे भूकंड लाटण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु असून हिमायतनगर येथील पीडित मात्र घर नावावर व्हावे अर्थातच नमुना नंबर ४३प्रमाणे मालकी हक्क प्रमाणपत्र मिळावे म्हणून संघर्षशील लढा देतांना दिसत आहे. यापूर्वी तहसील आणि नगर पंचायत वर अनेक लक्षवेधी आंदोलने करण्यात आली आहेत. लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अनेक आश्वासने देऊन वेळ मारून नेली आहे. मागील काही वर्षांपासून सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीटू) आणि लोकविकास संघर्ष समितीच्या संयुक्त नेतृत्वाखाली शासनाच्या विविध कार्यालयावर उपोषणे मोर्चे काढून सनदशीर मार्गाने लढा देने सुरु आहे. रास्त मागण्या असूनही सरकार आणि शासनाच्या वतीने दखल घेण्यात येत नसल्याने निर्वांनीचा इशारा म्हणून १७ डिसेंबर रोज मंगळवार पासून पीडितांचे जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर पालिका विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री गंगाधर इरलोड यांना शिष्टमंडळ भेटले असून त्यांनी लवकरात लवकर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

या भव्य आमरण उपोषणाचे नेतृत्व कॉ.दिगंबर काळे,जयश्री बीजेवार, नवीन कुमार मादसवार, गंगाधर गायके, परमेश्वर सूर्यवंशी, कांताबाई बनसोडे आदिजन करीत आहेत. हे आंदोलन लोकविकास संघर्ष समितीचे मुख्य प्रवर्तक कॉ. विजय गाभने, सीटू राज्य सचिव कॉ. उज्वला पडलवार, सीटूचे जिल्हा सरचिटणीस कॉ.गंगाधर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाले असून वरिष्ठानी तसेच जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी तातडीने मागण्या सोडवाव्यात असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

# रब्बी हंगाम पिक स्पर्धेत सहभागी व्हा : दिलीप जाधव

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १८ डिसेंबर**

पिकांच्या उत्पादनात वाढ व्हावी या कामी शेतकऱ्यांचे योगदान मिळावे या उद्येशाने कृषि विभागाकडून नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम पिक स्पर्धा योजना राबविण्यात येत असून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अंतिम तारीख ३१ डिसेंबर असून या स्पर्धेत शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन तालूका कृषि अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे,रब्बी हंगाम २०२४ मध्ये मागील वर्षी प्रमाणे याहीवर्षी पिक स्पर्धा तालूका जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येणार असून त्यानूसार कृषि विभागामार्फत रब्बी हंगाम २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी गहू ज्वारी हरभरा करडई व जवस या पाच पिकांसाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतःच्या नावे जमिन असणे आवश्यक आहे या स्पर्धेत भाग घेवू ईच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धे त भाग घेता येईल सहभागी लाभार्थी स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४०आर क्षेत्रात लागवड आवश्यक आहे तालूका पातळीसाठी पहिले बक्षिस पाच हजार दूसरे तीन हजार तीसरे दोन हजार रुपये आहे.

जिल्हा पातळीसाठी पहिले बक्षिस दहा हजार दूसरे सात हजार तिसरे पाच हजार रुपये तर राज्य पातळीसाठी पहिले बक्षिस पन्नास हजार दूसरे चाळीस हजार तिसरे तीस हजार रुपये याप्रमाणे आहे असे तालूका कृषि कार्यालयातर्फे सांगण्यात आले.पिक स्पर्धा निकाल प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाचे विजेते निवडण्यात येणार आहेत सर्वसाधारण गटासाठी रक्कम तीनशे व आदिवासी गटासाठी दिडशे रुपये प्रवेश शूल्क राहणार आहे. भोकर तालूक्यातील शेतकऱ्यांनी या स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन तालूका कृषि अधिकारी जाधव यांनी केले आहे.

# नरसीतील महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १८ डिसेंबर**

नरसी येथील राणी लक्ष्मीबाई हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालयात, पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका स्तरीय ५२ वा विज्ञान प्रदर्शन सोहळा संपन्न झाला. नायगांव तालुक्यातील पंचायत समिती शिक्षण विभाग नरसी येथील राणी लक्ष्मीबाई मुलींचे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७/१२/२०२४ रोजी रोज मंगळवार सकाळी येथील भव्य प्रांगणात आजच्या स्पर्धे च्या युगात विद्यार्थ्यांच्या शाश्वत भविष्या साठी पाठ्य पुस्तकांच्या पलीकडे विज्ञानाचे सखोल ज्ञान वाढवण्या साठी.व व्यावहारिक प्रयोग आणि प्रकल्पांद्वारे विविध वैज्ञानिक संकल्पना आणि तत्त्वे शोधण्यासाठी विज्ञानाचे सखोल ज्ञान वाढवण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा ५२ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

विज्ञान प्रदर्शन सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संग्राम कांबळे तर प्रमुख पाहुणे नायब तहसीलदार येरावार साहेब, राणीलक्ष्मीबाई हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या



सौ.अनिता ताई गोपछडे, आनंद रेनगुंटवार आदि मान्यवर मंडळी उपस्थित होती. या विज्ञान प्रदर्शनाला प्राथमिक गटातून ३३ विद्यार्थांनी सहभाग नोंदविला तर माध्यमिक गटातून २३ विद्यार्थांचा संच सहभाग नोंदविला होता तर येथील विज्ञान प्रदर्शनाला तालुक्यातील विस्तार अधिकारी, सर्व केंद्र प्रमुख उपस्थिती होते तर तालुक्यातील ४० शाळेनी या वेळी भेट दिली होती. ५२ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये प्राथमिक गटातून मिलेनियम ईंग्लिश स्कूल नायगांव प्रथम क्रमांक जि.प.प्रा शाळा इज्जतगांवने व्दितीय क्रमांक जि.प. प्रा. शाळा बेटकबिलोलीने तृतीय क्रमांक येण्याचा बहुमान मिळविला आहे तर माध्यमिक गटातून ओआसिस ईंग्लिश स्कूल कुंटूर या शाळेने प्रथम,शंकर हायस्कूल ने द्वितीय तर जि. प.हायस्कूल घुंगराळा शाळेने तृतीय क्रमांक पटकावला आहे. प्राथमिक गटाचे परिक्षक म्हणून पारदर्शकपणे काम एस. जी. तळेगांवे, वकील धनंजय, तर माध्यमिक गटाचे परिक्षक एस. जी.देगलूरकर, के.पी कुसुम, ए.सी बोधनकर यांनी उत्कृष्ट रीत्या परिक्षण केले आहे.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस व सबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, ज्ञानेश्वर पि. नागोराव शेंबोले रा. विष्णुपूरी ता.जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील नांदेड मौजे विष्णुपूरी येथिल शेत गट नं. ३१ पैकी पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर नगर मधील प्लॉट नं ०६ व ०७ ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस - प्लॉट नं ८ आहे, पश्चिमेस -पांदन रोड आहे, दक्षिणेस-प्लॉट नं ५ आहे, उत्तरेस - १२.०० मीटर रूंद रोड आहे. या चतु:सिमेच्या आतील प्लॉट मी उध्दवराव संभाजी चव्हाण रा. असर्जन ता. जि. नांदेड यांनी खरेदी करण्याचा सौदा केला आहे. बयाणा पोटी काही रक्कम दिली आहे. तरी सदरील प्लॉटबाबत कोणास काही, उजर, आक्षेप मालकी हक्क असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत लेखी कागदपत्रासह आक्षेप दाखल करावा मुदत संपल्यानंतर कोणाचाही उजर, आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**जाहीर प्रगट देणार**
**उध्दवराव संभाजी चव्हाण**
**रा. असर्जन, ता. जि. नांदेड**
**मो. नं. ९१३०४९६६३४**



बीड येथील पालवण चौकाजवळ रेल्वे स्टेशनचे काम अंतिम टप्प्यात आले असून अहिल्यानगर ते बीड रेल्वे पुढच्या वर्षात बीडपर्यंत धावणार आहे. (छाया-कृष्णा शिंदे)

# तीस दिवसात येडेश्वरी युनिट नं.एक चे दोन लाख गाळप पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१८ डिसेंबर**

आनंदगांव(सा) येथील येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१ ने दि. १६. नोव्हेंबर २०२४ रोजी ११ व्या गळीत हंगामाची सुरुवात केली. आणि आज १६ डिसेंबर २०२४ रोजी कारखान्याने दोन लाख टन गाळप करून ठरवलेल्या उद्दिष्टाकडे योग्य रीतीने वाटचाल चालू आहे.



कर्मचाऱ्यांनी एकमेकांचे अभिनंदन करून आनंद साजरा केला.येडेश्वरीची प्रत्यक्ष गाळपाला सुरुवात १६ नाव्हेंबर २०२४ झाली होती. आज रोजी ३० दिवसांमध्ये कारखान्याने २ लाख टन गाळप करून साखरेचे उत्पादन ८७हजार २५० क्विंटल घेतले. कारखाना प्रतिदिवस ७००० मे टन सरासरी प्रमाणे गाळप करीत आहे. तसेच कारखान्याच्या आसवानी प्रकल्पात इथेनॉल १९ लाख ३७ हजार ३७४ लिटर व रेक्टीफाईड स्पिरीट ४६ लाख ७५ हजार ३४० लिटर उत्पादन झाले असुन सहवीजनिर्मिती प्रकल्प सुद्धा चांगल्या पध्दतीने सुरळीत सुरु असून दररोज ताशी १० मेगावॅट वीजनिर्मिती केली जाते. त्यात आजअखेर ९९ लाख ९७ हजार वीज युनिट निर्मिती झाली असून त्यापैकी ३९ लाख ७२ हजार ६०० युनिट महावितरण कंपनीला विक्री केली. ११ वा गळीत यशस्वीरीत्या चालवला जात आहे. या यशाबद्दल कारखान्याचे सर्वेसर्वा बजरंग सोनवणे यांनी सर्व ऊस उत्पादक शेतकरी, संचालक, सभासद, बिगर सभासद, तोडणी वाहतूक ठेकेदार व सर्व कारखान्याचे अधिकारी वर्ग व कर्मचारी यांचे २ लाख मे.टन गाळप केल्याबद्दल अभिनंदन केले. व तसेच पुढील गाळप उद्धिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले.

# माजलगावमध्ये परमनंट सुरक्षा रक्षक भरती

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ डिसेंबर**

सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा.लि.आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८डिसेंबर २०२४ ते २२डिसेंबर २०२४ पर्यंत एकूण ५ दिवस सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

भरती होणाऱ्या युवकांना परमनंट नोकरी दिली जाणार आहे. त्याचबरोबर सर्व सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा, मेडिकल, ग्रॅजुटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन, व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड नियमाप्रमाणे मिळेल.१५ हजार ते २३ हजार पर्यंत मिळेल.

भरती प्रक्रिया दि. १८ डिसेंबर २०२४ ते २२ डिसेंबर २०२४ पर्यंत सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव जिल्हा बीड येथे सुरू राहणार आहे. तरी या भरतीचा जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहन भरती अधिकारी महेश सरतापे, सत्यनारायण यादव यांनी केले आहे.. अधिक माहिती करिता संपर्क :९५५२२३८०५७, ९३२५६६१८९७.



गेवराई विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचीत आमदार विजयसिंह पंडित यांचा सत्कार करताना बाजार समिती संचालक शरद झोडगे पाटील, संचालक उध्दवराव पैठणे,प्रताप झोडगे आदी.

# संपूर्ण राज्यासह बीड तालुक्यात शेतकऱ्यांना मिळणार विशिष्ट ओळख क्रमांक (फार्मर आयडी)-तहसीलदार चंद्रकांत शेळके

**अनुदान मिळविणे, पिकविमा,कर्जप्रक्रिया यासाठीचे शेतकऱ्यांचे हेलपाटे वाचतील**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

केंद्र सरकारने देशातील सर्व शेतकऱ्यांना आधार कार्डच्या धर्तीवर ग्रीस्टॅक म्हणजे शेती असल्याचा युनिक फार्मर आयडी नंबर देण्याचा निर्णय घेतला आहे . या प्रकल्पाची १६ डिसेंबरपासून गावागावात कॅम्प लावून अंमलबजावणी करण्यात येत आहे . त्याचाच भाग म्हणून बीडचे प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यात बहादरपूर येथे १८ डिसेंबर बुधवार रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते .



जिल्हाभरात ग्री स्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी तयार करण्याचे काम कशा पद्धतीने करावे यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले . या प्रशिक्षणात कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी , तालुका कृषी अधिकारी , गटविकास अधिकारी , जिल्ह्यातील सर्व तहसीलदार , संबंधित नायब तहसीलदार , मास्टर ट्रेनर व निवडक ग्राम महसूल अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले होते.

बहादरपूर येथील कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप , कृषी सहायक संजय गावडे , ग्रामपंचायत अधिकारी सविता मिसाळ , सरपंच दत्तात्रय कल्याण कोळेकर , श्रीरंग विठ्ठल कोळेकर , सोसायटी चेरमन कल्याण विश्वनाथ कोळेकर , ग्राम पंचायत सदस्य जालिंदर कोळेकर , डिगंबर कोळेकर , वचिष्ट माने , यशवंत कोळेकर , शेतकरी शिवाजी वाघमोडे , संदिपान माने , राधाकिसन कोळेकर इ उपस्थित होते.या वेळी ज्यांच्या नावे सात-बारा नोंद आहे , अशा सर्व शेतकऱ्यांना अग्रिस्टॅक क्रमांक काढणे अनिवार्य आहे . त्यासाठी आधार लिंक असलेला मोबाईल सोबत असावा. ३१ डिसेंबरपर्यंत सर्व शेतकऱ्यांनी हे क्रमांक काढून घ्यावेत असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.ग्रीस्टॅक प्रकल्पात प्रत्येक सात बारा ( ७/१२ ) धारक शेतकऱ्यांना युनिक फार्मर आयडी (अव्दितीय शेतकरी ओळख क्रमांक) देण्यात येणार आहे. शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्यासाठी कँपमध्ये शेतकऱ्यांचा आधार क्रमांक त्यांच्या खाते उताराला जोडण्यात येणार आहे.त्यासाठी शेतकऱ्यांचा मोबाईल क्रमांक आधारशी सलंग्न असणे आवश्यक आहे.राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची अग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन अग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यास महाराष्ट्र शासनाने १४ सप्टेंबर रोजी मान्यता दिली आहे.

# विद्यार्थी विज्ञान मंथन स्पर्धा परीक्षेत श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळविले यश

**०५ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१८ डिसेंबर**

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विज्ञान मंथन स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात शालेय शिक्षणात स्पर्धा परीक्षांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.अगदी बालवयापासूनच प्रज्ञावान विद्यार्थी शोधणे,त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यातील गुणात्मक क्षमतेचा विकास करण्याचे काम शाळेच्या माध्यमातून होते, तसे करणेही काळाची गरज आहे.विद्यार्थी विज्ञान मंथन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.यामध्ये विद्यालयातील इ.९ वी चे २९ विद्यार्थी बसले होते.पैकी तनिष्क ननवरे, कौस्तुभ मातेकर,अंजली शेप,समृध्दी पवार,अक्षद लोकरे या विद्यार्थ्यांना विज्ञान मंथन परीक्षा प्रमुख किरण नरसिंगे, नंदिनी कोदरकर व विज्ञान विषय प्रमुख मोरेश्वर देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे,मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,सर्व शालेय समितीचे सदस्य, उपमुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी कारवाई; कट रचणारा आरोपी विष्णू चाटेला अटक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा माजी तालुकाध्यक्ष विष्णू चाटे याला बेड्या ठोकल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर येथून बीडकडे येत असताना बीड शहराजवळील बायपासजवळील महालक्ष्मी चौक येथून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पाठलाग करून चाटे याला अटक केली.आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या चारवर पोहचली आहे. अजूनही तीन आरोपी फरार आहेत. विष्णू चाटे याच्यावर सरपंच देशमुख यांच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे. तसंच पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्याप्रकरणीही चाटे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर पोलिसांनी विष्णू चाटे याच्यासह इतर सहा जणांवर हत्येचा गुन्हा नोंदवला होता. तसंच पवनचक्की कंपनीच्या तक्रारीनंतर वाल्मिक कराड, विष्णू चाटे आणि अन्य एका आरोपीविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल केला होता.पवनचक्की कंपनीच्या कार्यालयाबाहेर झालेल्या वादातून संतोष देशमुख यांची सोमवारी दुपारी निर्घृण हत्या करण्यात आली होती. पवनचक्की कंपनीबाहेर झालेल्या मारहाणीचा राग मनात ठेवून आरोपींनी सरपंच देशमुख यांचे अपहरण करून खून केल्याचे सांगितले जाते.



# अंबाजोगाई शहरात बनावट दारूचा कारखाना, ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त

**अंबाजोगाई शहरात बनावट दारूचा कारखाना सापडला**

**राज्य उत्पादन शुल्क च्या पथकाच्या धाडीत ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त शहरात खळबळ**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१८ डिसेंबर**

राज्य उत्पादन शुल्क च्या पथकाने अंबाजोगाई शहरातील बुट्टेनाथ दरी मध्ये असलेल्या बनावट दारू च्या कारखान्यावर धाड टाकून ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केल्या मुळे खळबळ उडाली आहे.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड विश्वजीत ए. देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १६.१२.२०२४ रोजी गुप्त माहितीच्या आधारे मौ. बुट्टेनाथ दरी येथे काटवन झाडीत असलेल्या गोडावून शेडमध्ये ता. अंबाजोगाई जि. बीड येथे कार्यालय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अंबाजोगाई, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क माजलगाव, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क बीड यांच्या पथकाने कारवाई करत छापा टाकला असता सदरील गोडावून पत्री शेडमध्ये खालील प्रमाणे मुद्येमाल जप्त करण्यात आला.



या मध्ये १) बनावट देशी दारु रॉकेट मद्याच्या १०५०० बॉटल (१०५ बॉक्स) त्याची अं.कि. रु. ३६७५००/- २) एक जेएसएल जिंदाल स्टेनलेस कंपनीचे स्वयंचलित सिलींग, फिलींग व बॉटलींग मशीन अं.किं. रु. १५००००/- ३) २०० लि. मापाचे स्पीरीटने भरलेले प्लास्टीक बॅरल अं.किं. रु. २५०००/- ४) २०० लि. मापाचे १२ रिकामे प्लास्टीक बॅरल अं.किं. रु. ६०००/- ५) ९० मिली क्षमतेच्या १००८०० प्लास्टीकच्या रिकाम्या बाटल्या अं.किं. रु. १००८००/- ६) देशी दारु रॉकेटचे ३०००० बुचे अं.किं. रु. ३००००/- ७) देशी दारु रॉकेटचे ८००० लेबल अं.किं. रु. १६०००/- ८) २००० लि. व ५०० लि. चे एकुण ३ पाण्याचे बॅरल अं.किं. रु. ९०००/- ९) पाण्याची मोटार २ नगर अं.किं. रु. १००००/- १०) प्रवरा प्रिंट चे ६० टेप रोल अं.किं. रु. ३०००/- ११) देशी दारु रॉकेट बॉक्स चे पुठ्ठे १००० नग अं.किं. रु. २०००/- १२) ५ अल्कोहोल मीटर अं.किं. रु. २५००/- १३) विविध कंपनीचे ४ भ्रमणध्वनी अं.किं. रु. ७५०००/- १५) एक किया कंपनीचे सेलटॉस चारचाकी कार जिचा नोंदणी क्रं. एमएच-१२ आरवाय- ४४०६ अं.किं. रु. १००००००/- १६) एक अशोक लेलँड कंपनीचे आयशर टेम्पो ज्याचा नोंदणी क्रं. एमएच-४० सीडी ३४२१ अं.किं. रु. १७०००००/- १७) १० लिटर क्षमतेचे इसेंस ने भरलेले प्लास्टीक कॅन अं.किं. रु. ७५००/- १८) पाण्याचे प्लास्टीकचे पाईप- ५ नग अं.किं. रु. २५००/- १९) एक आर.ओ. पाणी फिल्टर मशीन अं.किं. रु. ५००००/- असा एकुण रु. ३५५६८००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या गुन्ह्यातील आरोपी १) आकाश गोवर्धन नेहरकर, वय : २९ वर्षे, रा. गांधीनगर, अंबाजोगाई जि. बीड २) दिलीप शांतीलाल पावर, वय : १७ वर्षे, रा. भोईटी ता. शिरपूर जि. धुळे ३) विकेश रघु ब्राम्हणे, वय : १७ वर्षे, रा. भोईटी ता. शिरपूर जि. धुळे ४) जयम लालू पावरा, वय : १७ वर्षे, रा. महादेव दोंडवाडा ता. शिरपूर जि. धुळे ५) किरण दिलीप पावरा, वय : १५ वर्षे, रा. भोईटी ता. शिरपूर जि. धुळे ६) ईश्वर भाया पावरा, वय : १७ वर्षे, रा. महादेव दोंडवाडा ता. शिरपूर जि. धुळे यांना अटक करण्यात आली असुन पप्पू कदम व दिनेश गायकवाड हे फरार झाले असुन त्याचा शोध सुरु आहे. या आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई ही मा. श्री. विश्वजीत ए. देशमुख, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री. डी.डी. चौरे, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड, श्री. आर.बी. राठोड, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड, श्री. डी.आर. ठोकळ दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अंबाजोगाई, श्री. ए.एल. कारभारी, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भ.प. क्रं. ०२ बीड, तसेच श्री. आर.बी. कदम स.दु.नि., जवान- एस.व्ही. धस, आर.ए. जारवाल, बी.के. पाटील, आर.एम. गोणारे, के.एन. डुकरे, एस.व्ही. लोमटे, डी.एस. वायबट, ए.पी. कदम, श्रीमती एस.एस. ढवळे, आर.जी. मुंडे, एस.एस. ढोले, यांनी सदरील कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास श्री. डी.डी. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड हे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## पगारासाठी घाटीतील परिचारिकांनी केले आंदोलन

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शासकीय - परिचारिकांचे नोव्हेंबर महिन्याचे वेतन थकले आहे. त्यासाठी आज सकाळी घाटी रुग्णालयात शासकीय परिचारिका संघटनेच्या वतीने आंदोलन केले.

घाटीतील परिचारिकांचे पगार झालेले नाहीत. वेतन द्या म्हणून शासकीय परिचारिका संघटनेच्या वतीने मागणी देखील केली होती. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन करू असा इशाराही देण्यात आला होता. मात्र तरीही पगार झाला नाही. त्यामुळे आज सकाळी परीचारिका संघटनेच्या वतीने आंदोलनाचा पवित्रा घेत आंदोलन केले. यावेळी आमचा पगार मिळालाच पाहिजे, कोण म्हणतं देत नाही घेतल्याशिवाय रहात नाही, हंम सब एक है. अशा घोषणांनी घाटी परिसर दणाणून गेला. यावेळी संघटनेच्या अध्यक्षा शुभमंगल भक्त, सचिव इंदुमती थोरात, द्रौपदी कर्डीले, प्रवीण व्यवहारे, कालिंदी इधाते, वंदना कोळनोरकर, मकरंद उदयकार, शेख नवाज सह आदींनी आंदोलन करून वेतन देण्याची मागणी केली.

आश्वसन मिळताच आंदोलन थांबवून काम केले सुरू

परीचारिका आंदोलकांच्या भावना लक्षात घेत घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी आंदोलकांची भेट घेतली. आणि परिचारिकांचा पगार दोन दिवसात जमा करू असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन थांबवून सर्व परिचारिका कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला.

## सोयगाव परिसरात भरिताच्या वांग्याची यंदा आवक; भरीत पाटर्यांना ऊत : वांग्याचे दर कायम

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१८ डिसेंबर

सोयगाव परिसरात लागवड कमी असल्याने भरिताच्या वांग्याची आवक घटली आहे.यंदा यामुळे भरिताच्या वांग्याचे दर अद्यापही कायम आहे.बाजारात भरिताची वांगी ६० ते ७० रुपये प्रतिकिलो याप्रमाणे मिळत आहेत.दरवर्षी भरिताची वांग्यांची लागवड करणारे उत्पादकांनी सांगितले की,यावर्षी परिसरात लागवड कमी आहे.तसेच वातावरण बदलामुळे वांग्यांचे उत्पादन घटले आहे.दरवर्षी बाहेरगावी स्थायिक झालेली मंडळी दिवाळीच्या सुटीत येतात. ही मंडळी दिवाळीच्या सुट्यांमध्ये



भरितचा आस्वाद घेतात व सोबत घेऊन जातात.यंदा मात्र आवक उशिराने सुरू झाली.सध्या सोयगाव परिसरात थंडी वाढत असल्याने भरिताच्या वांग्यांच्या उत्पादनात काही अंशी वाढ होत आहे. यंदा लागवड कमी असल्याने दर कायम राहतील, असे मत लागवड शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

### काट्यावर भाजलेल्या वाग्यांची चव वेगळीच

सोयगाव सह परिसरातील वांग्यांना मोठी मागणी असते. त्यात काट्यांवर भाजलेल्या वांग्यांची चवच वेगळी असते. यामुळे अनेकजण भाजलेल्या वांग्यांचे कच्चे भरीत सोबत नेतात.या भागातील वांग्यांना परराज्यांतही मोठी मागणी आहे.यंदा लागवड कमी असली तरी थंडीमुळे उत्पादन वाढेल,असे सोयगाव-आमखेडा वांगे उत्पादक शेतकरी विनोद लक्ष्मण पगारे यांनी सांगितले.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२५ मध्ये होणाऱ्या स्पर्धा परिक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर

छत्रपती संभाजीनगर :-महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एम.पी.एस.सी) सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या ुु.ीिलि.सीें.ळप या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र. प्र.ओतारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. आयोगामार्फत जाहिरात प्रसिद्ध केलेल्या या अंदाजित वेळापत्रकामध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षांमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ सर्व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा, व मुख्य परीक्षा, महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त परीक्षामध्ये महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र अराजपत्रित गट -ब सेवा मुख्य परीक्षा, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा, महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षामध्ये महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी, अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, निरीक्षक वैधमापक शास्त्र मुख्य परीक्षा, राज्यसेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षांचा समावेश आहे. हे वेळापत्रक अंदाजित असून त्यामध्ये बदल होऊ शकतो. काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव ओतारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## जटवाडा जैन मंदिराचा वार्षिक यात्रा महोत्सवाच्या पंचरंगी पत्रिकेचे विमोचन संपन्न

औरंगाबाद प्रतिनिधी - लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.१००८ संकटहर पार्श्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २६ डिसेंबर रोजी वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची संपुर्ण माहिती व रुपरेषा असलेली पंचरंगी पत्रिकेचे नुकतेच आचार्य कुशाग्रहनंदीजी महाराज,मुनिश्री अजयऋषी महाराज,स्वस्तीश्री देवेंद्रकिर्तीजी स्वामी यांच्या उपस्थितीत व पत्रिका दाता सौ.रुपाली ललीत,सौ.रिचा विनीत,सौ. श्रध्दा अमीत लोहाडे परिवार महालगांववाला देशमुखनगर यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी अध्यक्ष विनीत लोहाडे महामंत्री प्रमोद पांडे कोषाध्यक्ष प्रकाश कासलीवाल,सहकोषाध्यक्ष विजयकुमार पहाडे, विश्वस्त अशोक गंगवाल,जयचंद ठोले, दिलीप सेठी,मनोज चांदीवाल,संजय पाटणी, वैभव साहुजी,पुनमचंद अग्रवाल,मनोज गंगवाल, महावीर पाटणी, प्रकाश अजमेरा, सुधीर साहुजी, संजय साहुजी, राजेंद्र साहुजी, विजय सुगंधी, संजयकुमार पाटणी, यांच्यासह जितेंद्र पाटणी, चंदा कासलीवाल, विनोद सेठी, डॉ.शैलेश चांदीवाल, रमन साहुजी, जितेंद्र पाटणी, अरुण पाटणी, राजेंद्र कासलीवाल, समाज बांधव उपस्थित होते.

महोत्सवासाठी संगीतकार म्हणुन नमोकार भक्ती मंडळ उपस्थित राहणार आहे. तसेच कार्यकमासाठी छत्रपतीसंभाजीनगर,नाशिक,पैठण बीड,वेरूळ, कन्नड वैजापुर ,कचनेर ठिकाणाहुन शेकडो भक्तगण यात्रेला उपस्थित राहणार आहे.

## सिल्लोड येथे आज आ.अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेचा आभार मेळावा

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१८, नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लोकनेते आमदार अब्दुल सत्तार यांना सलग चौथ्यांदा विजयी केल्याबद्दल सिल्लोड - सोयगाव विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनी, शिवसेना, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते , हितचिंतक या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिवसेना नेते आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत सिल्लोड येथे आज गुरुवार ( दि.१९ ) रोजी आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तालुका शिवसेना, युवासेना, महिला आघाडीच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील शिवसेना भवन मैदान येथे सकाळी ११ वाजता या आभार मेळाव्याला सुरुवात होणार असून या मेळाव्यास पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुका शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम; जोखमीतील ३७ हजार व्यक्तिंच्या प्रत्यक्ष तपासणीचे नियोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१७(जिमाका):- राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र मोहिम (कुसुम)अंतर्गत कुष्ठरुग्ण शोध मोहिम दि.१६ ते २० डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. जोखमीतील ३७ हजार व्यक्तिंची प्रत्यक्ष तपासणीचे नियोजन करण्यात आल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी कळविले आहे.

या मोहिमेचा प्रारंभ नागरी आरोग्य केंद्र पीरबाजार येथे सोमवारी (दि.१६) करण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ.पारस मंडलेच्या,सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग डॉ. शिवकुमार हलकुडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेरणा संकलेच्या, डॉ. तनवीर सिद्धकी , डॉ. अर्चना राणे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती विद्या सानप आदी उपस्थित होते.

३७ हजार व्यक्तिंच्या तपासणीचे नियोजन

सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे ध्येय्य साध्य करण्यासाठी समाजातील व्यक्तिंची प्रत्यक्ष शारिरीक तपासणी करुन कुष्ठरुग्ण शोध मोहिम दि.१६ ते २० डिसेंबर या कालावधीत होणार आहे. शास्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यासाठी समाजातील नविन कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणणे आवश्यक आहे.

या कालावधीत जिल्ह्यात विटभट्टी कामगार,खाण कामगार,स्थलांतरीत व्यक्ती, बांधकाम मजूर, आश्रमशाळा, वस्तीगृहात राहणारे विद्यार्थी तसेच कारागृहातील कैदी यांची प्रत्यक्ष शारीरीक तपासणी करण्यात येणार आहे. आशा कार्यकर्ती व पुरुष स्वयंसेवक यांचे मदतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत ३७ हजार व्यक्तिंची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. धानोरकर यांनी सांगितले.

सूत्रसंचालन डॉ. नाथराव फड यांनी केले. नागरिकांनी आपली तपासणी करुन घ्यावी असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

लक्षणे दिसताच करा तपासणी

नागरिकांनी फिक्कट लालसर बधीर चट्टा. तेलकट गुळगुळीत चमकदार त्वचा, कानाच्या जाड पाळ्या, दुखऱ्या मज्जातंतु, हातापायाला मुंग्या येणे व अशक्तपणा येणे इ. लक्षणे दिसल्यास शासकीय रुग्णालयात तपासणी करुन घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

## बिडकीन येथील गाडीवाट रस्याची जमीन विकल्याने भोवली


### आदित्य बिल्डर्स कैलास पवार यांची जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १८ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील जमीन गट नंबर ८२३ मध्ये भूमी अभिलेख प्रमाणे सरकारी गाडी वहीवाट रस्त्यात येणारी जमीन शेतकऱ्यांला विक्री करुन त्याची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात आरोपी आदित्य बिल्डर्स अॅण्ड डेव्हलर्सचा मालक कैलास नानासाहेब पवार रा छत्रपती संभाजीनगर याचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एन, एम मोमीन यांनी नामंजूर केला, गुन्ह्यात अटक होऊ नये यासाठी कैलास पवार याने जामीन अर्ज सादर केला असता अतिरिक्त सरकारी वकील डी ए वाकनकर यांनी युक्तिवाद करुन जामीन अर्जाला विरोध केला होता, बिडकीन येथील ओमप्रकाश नथुप्रसाद जैस्वाल रा बिडकीन ता पैठण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आदित्य बिल्डर्स अॅण्ड डेव्हलर्सचा मालक कैलास पवार हे ओळखोचे आहेत,२०१२ मध्ये कैलास पवार याने सांगितले की बिडकीन येथील गट क्रमांक ८२३ श्रद्धानगर येथील एन ए ४४ प्लॉटिंग पाडलेली असून तुम्ही धंद्यासाठी रोडलगतचे चार पाच प्लॉट घेऊन टाका, कैलास पवार यांने जिल्हाधिकारी कार्यालयात केलेला एन ए ले - आऊट, ग्रामपंचायत बिडकीन यांचा ८ अ चा उतारा, प्लॉटिंगचा नकाशा आणि आदित्य बिल्डर्स अॅण्ड डेव्हलर्स तर्फे कैलास पवार या नावाचा सातबारा दाखवलं त्यावर विसंबून ओमप्रकाश जैस्वाल यांनी प्लॉट क्रमांक २९,२७,२८,ची रजिस्ट्री केली,मात्र यानंतर जैस्वाल यांना पैठणच्या तहसीलदारांनी नोटीस पाठवली की सदर प्लॉट हे भूमी अभिलेख प्रमाणे सरकारी गाडी वहीवाटेच्या रस्त्यावर असून हा रस्ता मोकळा करायचा आहे, यावरून कैलास पवार याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात घेऊन जैस्वाल यांनी बिडकीन पोलीस ठाण्यात पवार विरोधात.गुन्हा दाखल केला, पवार याने न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला असता न्यायालयाने तो फेटाळल, जैस्वाल यांच्या वतीने वकील अखिलेश जैस्वाल, वकील आशुतोष सिसोदिया यांनी युक्तीवाद केला.

## धार्मिक विधीने होणार भगवती कालिका मातेची प्राणप्रतिष्ठा

तभा वृत्तसेवा



पैठण दि १८ :- दक्षिण काशीतील जुन्या पैठण मधील रंगारहट्टी गल्लीतील प्राचीन भगवती कालिका मंदिरातील मुर्तीची प्राणप्रतिष्ठा प्रसिद्ध संत संत,ह भ प श्री प्रसाद महाराज अमळनेर मठाधिपती अमळनेर पंढरपूर यांच्या शुभ हस्ते दि.२३ डिसेंबर सोमवारी होत असुन यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा खासदार संदिपान पाटील भुमरे, आमदार विलास भुमरे,व अन्य मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

भगवती कालिका मातेच्या प्राणप्रतिष्ठा निमित्ताने दि.२० वार शुक्रवार पासुन विविध धार्मिक कार्यक्रम होणार असुन या उत्सवाची सांगता दि.२४ मंगळवारी महाप्रसादाने होणार आहे. या उत्सवासाठी भगवती कालिका देवीचे भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असुन या भव्यदिव्य कार्यक्रमाचे नियोजन कालिका देवी भक्त महिला मंडळ,छत्रपती शिवाजी संघ व शिवयोद्धा वाजंत्री पथक करीत आहेत. या उत्सवात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक समितीने केले आहे. शहरातील खंडोबा चौकातून दि.२०, शुक्रवारी सकाळी ९:०० वाजता मिरवणूक ही निघणार आहे.

## लोंढे दवाखान्यासमोरील रस्ता ठरतोय अपघाती

तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ :- छोट्या कामासाठी तीन महिन्यांपासून रस्त्यावर रॉ मटेरियल टाकून अपघाताला निमंत्रण देणाऱ्या ठेकेदाराच्या कृपेने डॉ लोंढे यांच्या माऊली हॉस्पिटल समोरील रस्ता. हा अपघाती रस्ता ठरत असून याठिकाणी वेगवेगळ्या वाहनांच्या धडकेत आतापर्यंत चार विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी जखमी झाले आहेत. शाळेत तसेच कोचिंगला जाणारे विद्यार्थी या रस्त्यावरून जीव मुठीत ठेवून ये जा करत आहेत.याप्रकरणी प्रशासनाने ठेकेदावर दंडात्मक कारवाई करून रस्ता मोकळा करावा अशी मागणी पालकांच्या वतीने होत आहे.



माँसाहेब जिजाऊ चौक ते तहसील कार्यालय या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते. शाळा तसेच कोचिंग क्लासेसचा परिसर असल्याने रस्त्यावरून मोठया प्रमाणात विद्यार्थी ये जा करतात. रस्ता उतारावर बांधकाम साहित्य वाळू, खडी, डष्ट आदी जमा झाल्याने याठिकाणी वाहने नागरिकांच्या अंगावर जात आहे. काही दिवसांपासून याठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढले. वेगवेगळ्या वाहनांच्या धडकेत आतापर्यंत चार विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी गंभीर जखमी झाले आहेत. जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना जवळच सायकलचे काम करणाऱ्या श्रीधर साळवे यांनी वेळीच दवाखान्यात नेऊन संकट टाळले.या प्रकारामुळे पालकांची धास्ती वाढली असून रॉ मटेरियल टाकणाऱ्या ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून रस्ता मोकळा करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ

### बजाजनगरातील धक्कादायक प्रकार

वाळूज महानगर (प्रतिनिधी): घरातील सामान शिफ्ट करण्यासाठी मदत करण्यासाठी बोलावलेल्या एकाने

१५ वर्षीय तरुणीसोबत चाकूचा धाक दाखवून अश्लील चाळे केले. नंतर मी तुझ्यावर प्रेम करतो, असे मेसेज पाठवून लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार बजाजनगरमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरनी वाळुज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून संशयित तरुणास ताब्यात घेतले आहे.

मुलीच्या तक्रारीवरून वाळूज एमआयडीसी पोलिसांनी संशयित शेख युनूस शेख युसूफ (रा. अजवानगर, वाळूज) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी आई, बहीण, भावासह बजाजनगरात राहते. तिची आई कंपनीत कामाला जाते. किरायाचे घर बदलत असताना सामान शिफ्टिंगसाठी तिच्या आईने ३१ ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास ओळखीच्या शेख युनूसला मदतीला बोलावले होते. यावेळी घरात एकटी असताना युनूसने तिच्यासोबत अश्लील चाळे केले. तिने आरडा ओरड केली असता त्याने खिशातील चाकू काढून कोणाला काही सांगितले तर जीवे मारून टाकण्याची धमकी दिल्याने तिने या प्रकाराबद्दल आईला सांगितले नाही. काही दिवसांनी तिच्या आईच्या मोबाइलवर युनूसचा मी तुझ्यावर प्रेम करतो, असा मेसेज पीडित तरुणीसाठी व्हॉटस् ॲपवर आला. तो मेसेज पीडित तरुणीच्या बहिणीने पाहिला. त्यानंतर त्याने सोबत काढलेले काही फोटोही पाठवले. त्यामुळे पीडित मुलगी व तिच्या बहिणीने वाळूज एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. संशयित शेख युनूसला अटक केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. अधिक तपास सहायक पोलीस आयुक्त महेंद्र देशमुख हे करत आहेत.

## लासुरस्टेशन येथे गीताबन कला महोत्सवाचे आयोजन.

### शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी अभिनव उपक्रम

तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.१८ डिसेंबर:

शहराप्रमाणेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना चालना मिळावी यासाठी आमदार प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्त ''गीताबन कला महोत्सव'' स्पर्धेचे आयोजन दि. १८ व १९ जानेवारी रोजी करण्यात आले असून या स्पर्धेत प्राथमिक गट इयत्ता ५वी ते ७वी, माध्यमिक गट इयत्ता ८ ते १० व विद्यालय तसेच महाविद्यालय गट इयत्ता ११ वी ते पदवी शिकणाऱ्या गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतात अशी माहिती आयोजकांनी प्रशांत बंब मित्रमंडळ गंगापूर - (रत्नपुर) खुलताबाद व परिवर्तन प्रतिष्ठानाच्या पदाधिकाऱ्यांनी (दि.१८) लासुर येथे दिली.




गंगापूर खुलताबाद तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक तसेच विद्यालय व महाविद्यालय स्तरावरील ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांना आपली कला सादर करता यावी यासाठी गंगापूर- खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्त गीताबन कला महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा या स्पर्धेचे दुसरे वर्षे आहे. या स्पर्धेत इयत्ता ५वी ते ७वी, इयत्ता ८वी ते १०वी इयत्ता ११ वी ते पदवीमध्ये शिकणाऱ्या गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील सर्व माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी समहू गीत गायन, समूह नृत्य, वैयक्तिक नृय, वैयक्तिक गीत गायन, लावणी समूह आणि वैयक्तिक, तसेच मिमिक्री (सर्व भारतीय) अशा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यात विद्यार्थ्यांना रोख अनुक्रमे ५३५५, ३५५५, दोन २५५५ तसेच प्रत्येक कला प्रकारात दोन उत्तेजनार्थ ११११० रुपयांची अशी ९० पारितोषिके, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आजपासून ते दि. ९ जानेवारी पर्यंत संदीप गायकवाड ९४०४४८७७७९, नितीन गायकवाड ९८८१८६८६१८ या नंबर वरती कॉल किंवा व्हाट्सउप करून आपला कला प्रकार, शाळेचे नाव व इयत्ता सांगून नाव नोंदणी करून गंगापूर - खुलताबाद तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या अंगातील कला सादरीकरण करण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ असून दोन्ही तालुक्यातील शिक्षक वृन्दाणी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारत प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापक, युवा उद्योजक दिनेश जगदाळे यांचा अनोखा उपक्रम

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि १८ डिसेंबर पैठण तालुक्यातील ब्रह्मगव्हाण येथील जिल्हा परिषद प्राथमीक शाळा नदीकाठवस्ती ब्रह्मगव्हाण येथे दि १७ डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी आनंदाचे वातावरण ब्रह्मगव्हाण गावचे जावई युवा उद्योजक यांच्या संकल्पनेतून शालेय विद्यार्थ्यांना साहित्यचा वाटपाचा अनोखा उपक्रम पार पडला यावेळी शाळेच्या वतीने आलेल्या मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले,शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य समावित उत्कृष्ट प्रकारचे शालेय दप्तराची (स्कूल बॅग) चे वाटप करण्यात आले,दिनेश जगदाळे यांच्या मनोगततातून शाळेसाठी लागणाऱ्या विविध शैक्षणिक साहित्य, वेगवेगळे खेळ साहित्य, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून लागणारे साहित्य पुरवले जातील असे सांगण्यात आले,यावेळी रुपेश विष्णू जगदाळे सर यांनी सामाजिक उपक्रमातून शाळेसाठी अनेक गोष्टी देता येतील हे ही मान्य केले,चांगल्या क्वालिटीचे दप्तर बघून विद्यार्थ्यांचा आनंद अगदी बघण्याजोग होता. यावेळी मान्यवरांनी संपूर्ण शालेय परिसर तसेच डेन्स फॉरेस्ट प्रकल्प यांची कुतूहलाने पाहणी केली तसेच माहिती जाणून घेतली.याप्रसंगी विजय केदारे सर, उद्धवराव तेजिनकर, गितेश तेजिनकर, ब्रह्मगव्हाण शाळेचे मुख्याध्यापक तथा शिक्षक पतसंस्थेचे सचिव कैलास मिसाळ सर, नदीकाठ वस्ती शाळेचे मुख्याध्यापक हनुमंत दराडे सर, शाळेचे सहशिक्षक रवी केदारे सर, प्रशिक्षणार्थी शिक्षक रवी तेजिनकर सर आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

## अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडविण्याबाबत प्रशासनाची सकारात्मक भूमिका - जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

अहिल्यानगर, दि.१८ – अल्पसंख्यांक समाजाच्या समस्यांविषयी शासन सकारात्मक असून त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले. अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, बाळासाहेब कोळेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, महानगरपालिका उपायुक्त प्रियंका शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, अल्पसंख्याक समाज प्रतिनिधी यश शहा, हरजितसिंग देवेंद्रसिंग वधवा, सय्यद वहाब व सय्यद अफजल अब्दुल कादर आदी उपस्थित होते. जिल्हा अल्पसंख्यांक समितीची दर तीन महिन्यांतल्या पहिल्या मंगळवारी बैठक आयोजित करण्यात यावी अशी सूचना करीत जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितीत अल्पसंख्याक प्रतिनिधींकडून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. अल्पसंख्याक समाजाच्यावतीने उपस्थित प्रतिनिधींनी अल्पसंख्यांक समाजाच्या विविध मागण्या व समस्यांबाबत मते मांडली. बैठकीला अल्पसंख्यांक विभागाच्या योजना राबविणाऱ्या विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आधी आरोग्य, घनकचरा आणि आता आयुक्तांचे अतिक्रमण कडे लक्ष



अहिल्यानगर : महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर यशवंत डांगे यांनी सुरुवातीला आपले लक्ष आरोग्य विभागावर केंद्रित केले होते. जुलै – ऑगस्टमध्ये विषाणूजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम राबवली होती. डेंग्यू – झिका विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचल्यामुळे रुग्णसंख्येमध्ये कमालीची घट दिसून आली.


त्यानंतर आयुक्त डांगे यांनी एक तास स्वच्छतेसाठी मोहीम सुरू करून दर रविवारी सकाळी एक तास शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवली. आणि आता आयुक्त डांगे यांनी शहरातील प्रमुख रस्त्यांवरील व चौकांमधील अतिक्रमणे काढण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. अनधिकृत व बांधकामे व अतिक्रमणे काढण्यासाठी कोणाचाही दबाव आला तरी कारवाई थांबणार नाही अशी कणखर भूमिका आयुक्त डांगे यांनी घेतली आहे. त्यामुळे आयुक्त पदाचा पदभार स्वीकारण्यापासून आरोग्य विभाग त्यानंतर घनकचरा विभाग आणि आता अतिक्रमण विभागाकडे आयुक्त डांगे यांनी लक्ष केंद्रित केले असल्याचे दिसून येते. मात्र या अतिक्रमण मोहिमेमध्ये सातत्य ठेवून शहरातील प्रमुख रस्ते व चौक अतिक्रमण मुक्त व्हावेत अशी अपेक्षा नगरकरांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मार्केट विभाग हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख विभाग आहे. या विभागाच्या कार्यपद्धतीवर अनेकदा प्रश्न निर्माण झालेले आहेत. मार्केट विभागाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्यासाठी या विभागाकडे देखील आयुक्त डांगे यांनी लक्ष घालावे अशी मागणी देखील नगरकारांतून होत आहे.

## अशोक सराफ आणि वंदना गुप्ते अभिनित नवा मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला!

छत्रपती संभाजीनगर – 'राजकमल एंटरटेनमेंट' या पूर्णतः नवीन प्रॉडक्शन हाऊसच्यामार्फत प्रेक्षकांना एक नवा चित्रपट लवकरच मोठ्या पडद्यवार अनुभवायला मिळणार आहे. विशेष म्हणजे 'राजकमल एंटरटेनमेंट' ही नवीन कंपनी सुरू करणारे मालक म्हणजेच राहुल शांताराम, हे चित्रपती व्ही. शांताराम, ज्यांनी मराठी सोबतच संपूर्ण भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान दिले, त्यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव आहेत. आपल्या आजोबांकडून प्रेरणा घेत, राहुल शांताराम यांनी हितकारक मनोरंजन देणारे चित्रपट तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. चित्रपटाचे शीर्षक अजून गुलदस्त्यातच असले, तरी या चित्रपटात अनेक वर्षांनी आपल्याला दिग्गज अभिनेते महाराष्ट्र भूषण अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांची जोडी रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. त्यामुळे प्रेक्षक वर्गाला नक्कीच हा चित्रपट एक मेजवानी ठरणार आहे. थोडी खट्याळ, थोडी गोंडस आणि थोडी हळवी अशी ही अनोखी गोष्ट आपल्या समोर सादर करायला राहुल शांताराम हे सज्ज आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन लोकेश गुप्ते हे करत आहेत.

अभिनेते अशोक सराफ ह्यांनी या आगामी सिनेमाबद्दल आपलं मत व्यक्त करत सांगितलं बऱ्याच काळानंतर मला इतकी सशक्त भूमिका साकारण्यासाठी मिळालीय, जिची मी वाट बघत होतो. चित्रपटाची गोष्ट सध्याच्या काळाशी सुसंगत आहे. दिग्दर्शक लोकेश गुप्तेने चित्रपटाचा विषय निवडून अगदी सुरेख काम केलंय. शूटिंग दरम्यान त्याचा सिनेमा या माध्यमाचा अभ्यास आणि त्यावरील पकड मला दिसली. वंदना गुप्ते या हरहुन्नरी अभिनेत्रीसोबत मी यापूर्वीही काम केलंय. ती व्यक्ती आणि अभिनेत्री या दोन्ही स्वरूपात कमालीची उत्कट आणि हजरजबाबी आहे. तिचं आणि माझं गिव्ह–अँड–टेकचं टायमिंग छान आहे, त्यामुळे या दोन्ही पात्रांना उठावदारपणा आलाय. आम्ही दोघांनीही नेहमीसारखं प्रामाणिकपणे, जीव ओतून आपापलं पात्र साकारलंय. तिच्यासोबत काम करताना नेहमीच मजा येते. विशेष म्हणजे, निर्माता राहुल शांताराम ह्याला मी लहानाचा मोठा होताना बघितलंय. त्याचे वडील माझा मित्र किरण शांताराम याला माझी बायको निवेदिता गेली ३३ वर्षं राखी बांधत आलेली आहे, त्यामुळे राहुल हा माझा भाचाच आहे.

## असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे सर्वात तरूण अध्यक्ष म्हणून डॉ.प्रविण सूर्यवंशी यांनी स्वीकारला पदभार



छत्रपती संभाजीनगर, दि.१८ : असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या सर्वात तरूण अध्यक्षपदाचा कार्यभार महात्मा गांधी मिशन रुग्णालय व महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ.प्रविण सूर्यवंशी यांनी स्वीकारला असून ते अध्यक्ष म्हणून रुजू झाले आहेत. शनिवार, दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी आग्रा येथे झालेल्या असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या वार्षिक परिषदेत डॉ.प्रविण सुर्यवंशी यांनी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. डॉ. सूर्यवंशी हे वर्ष २०२४–२५ या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून आपले काम पार पाडतील.

असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे ३८००० सभासद असून सर्जन्ससाठी कार्यरत असणारी ही देशपातळीवरील एक सर्वोच्च संस्था आहे. संस्थेचे मुख्यालय चेन्नई येथे असून देशभरातील सर्व भागांतील सर्जन्स संस्थेशी जोडलेले आहेत. ही संस्था देशातील सर्व सर्जन्सची शिखर संस्था म्हणून कार्यरत आहे. दरवर्षी संपूर्ण भारतातून संस्थेच्या अध्यक्षपदासाठी सार्वत्रिक निवडणूक होते. दक्षिण आशिया खंडामध्ये प्रगत तंत्रज्ञानाने व अत्याधुनिक शस्त्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण व ज्ञान या संस्थांमार्फत दिले जाते. एएसआयचे अध्यक्ष डॉ. प्रविण सूर्यवंशी यांना जपान, अमेरिका, युके, मलेशिया, श्रीलंका आणि नेपाळ या देशांच्या वार्षिक परिषदेमध्ये बोलविले जाते व देशातील शासकीय योजना बनविताना त्यांचे मत घेतले जाते.

संस्थेच्या ८५ वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदाच डॉ.सूर्यवंशी यांच्या रूपाने आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष संस्थेला मिळाले आहेत. त्यांनी आजपर्यंत शिक्षण, संशोधन, प्रशासन, प्रशिक्षण, आरोग्य या क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल या निवडीने घेतली असून त्याचीच पोचपावती म्हणून त्यांची ही निवड झाली आहे.

डॉ. प्रविण सुर्यवंशी यांनी आजपर्यंत विविध स्तरावर वेगवेगळया माध्यमातुन गरजुंची रुग्णसेवा करीत कार्यरत आहेत. मराठवाड्यासारख्या दुर्लक्षित भागात पहिल्यांदाच यकृत प्रत्यारोपन शस्त्रक्रिया अत्याधुनिक लॅपरोस्कोपी शस्त्रक्रिया, इंडोस्कोपी शस्त्रक्रिया पहिल्यांदाच करण्याचा मान त्यांनी मिळविला आहे. एमजीएमच्या माध्यमातून सर्व अत्याधुनिक सुविधा गरिबांपर्यंत पोहचवण्यासाठी ते सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आले आहेत. डॉ. सूर्यवंशी यांनी २०१८ साली असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या एक्सिकिटीव्ह कमिटीवर देशातील सर्वात जास्त मतांनी निवडून जाण्याचा मान त्यांनी मिळवला आहे. तसेच असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्या महाराष्ट्र स्टेट चाप्टरचे सर्वात तरुण अध्यक्ष होण्याचा मानही त्यांनी मिळविला आहे.

एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी.एम जाधव, सचिव अंकुशराव कदम, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा तसेच शल्य चिकीत्सा विभागातील सर्वांनी डॉ. सूर्यवंशी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## विश्वसनीय सेवा व दर्जेदार उत्पादनांमुळे सोनी गिफ्टचा नावलौकिक : नरेंद्र फिरोदिया

### लाडक्या बहिणींना खास गिफ्ट, सर्व ब्रॅण्डेड वस्तूंवर ५० टक्के सवलत योजनेचा शुभारंभ



नगर : सोनी गिफ्ट दालनाने पाच वर्षांच्या वाटचालीत सर्वोत्कृष्ट सेवा आणि दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून देत ग्राहकांचा विश्वास व प्रेम मिळवले आहे. वर्धापन दिनानिमित्त या दालनात सर्व ब्रॅण्डेड वस्तूंवर ५० टक्क्यापर्यंत सवलत देण्यात येत आहे. तसेच काही निवडक वस्तूंवर ६० टक्क्यापर्यंत सूट दिली जात आहे. गृहपयोगी वस्तू खरेदी करणाऱ्या लाडक्या बहिणींसाठी हे मोठे गिफ्ट आहे. येथील भरपूर स्टॉक चोखंदळपणे मनपसंत खरेदीचा आनंद देणारा आहे, असे प्रतिपादन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

नगरमधील फ्रँचाईसी बाय डिबी व्हेंचर्सच्या प्रोफेसर कॉलनी चौकातील सोनी गिफ्ट दालनाचा पाचवा वर्धापन दिन साजरा होत आहे. यानिमित्त फिरोदिया यांनी दालनास भेट देवून दि.१८ ते २५ डिसेंबर या कालावधीत आयोजित सवलत योजनेचा शुभारंभ केला. यावेळी सोनी गिफ्टचे संचालक प्रकाश दोडेजा, साहिल दोडेजा, नेहा दोडेजा, इशा दोडेजा, जयरामदास दोडेजा, नाशिक येथील सोनी गिफ्टचे संचालक नितीन मुलतानी आदींसह ग्राहक उपस्थित होते.

प्रकाश दोडेजा यांनी सांगितले की, कोणत्याही चांगले समारंभ, गोड आनंदाचे क्षण साजरे करताना एकमेकांना भेटवस्तू देण्याची परंपरा आहे. अशा भेटवस्तूंसाठी तसेच गृहपयोगी, संसारोपयोगी वस्तूंसाठी सोनी गिफ्ट नावाजले जाते. वर्धापन दिन साजरा करताना दालनात लाडक्या बहिणींना २५ डिसेंबर पर्यंत विविध कंपन्यांच्या ब्रॅण्डेड वस्तूंवर थेट फ्लॅट ५० टक्केपर्यंत सवलत दिली जाणार आहे. तसेच काही निवडक वस्तूंवर थेट ६० टक्केपर्यंत सूट दिली जाणार आहे. नवीन वर्षाचे स्वागत आपल्या घर संसारासाठी मनपसंत खरेदी करण्याची संधी लाडक्या बहिणींना मिळाली आहे. एकाच छताखाली आकर्षक गिफ्ट आर्टिकल्स, घरगुती वापराच्या वस्तू, गृह सजावट, होम अप्लायंसेस उपलब्ध असल्याने खरेदीचा निखळ आनंद ग्राहकांना घेता येतो. कुटुंबातील लहानांपासून ज्येष्ठापर्यंत प्रत्येकाला जे हवं ते सर्व काही उपलब्ध आहे. सर्व नामांकित कंपन्यांच्या ब्रॅण्डेड वस्तू असल्याने खात्रीशीरपणा असतो. याशिवाय उत्कृष्ट आपुलकीची सेवा मिळत असल्याने ग्राहक खरेदीसाठी आवर्जून सोनी गिफ्टमध्ये येतात. ग्राहकांचे प्रचंड प्रेम आणि प्रतिसाद लक्षात घेवून पाचवा वर्धापन दिन साजरा करताना ग्राहकांना अनोखी भेट दिली आहे. लाडक्या बहिणींनी कुटुंबियांसह दालनाला भेट देवून खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन दोडेजा यांनी केले आहे.

## नगरच्या खेळाडूंसाठी लवकरच दोन अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उपलब्ध होणार : आ.संग्राम जगताप



अहिल्यानगर – आपल्या अहिल्यानगर मधील खेळाडूंमध्ये खूप मोठी क्षमता आहे. त्यामुळे विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये कायम नगरचे खेळाडू चमकत आहेत. बुद्धिबळपटू देवेंद्र वैद्य यांनी भारतीय संघाचे नेतृत्व करत आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत भारतास ब्राँझ पदक मिळवून दिले आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्या बरोबरच पुढील काळात अजून मोठी यशस्वी कामगिरी करावी यासाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देत आहोत. शहरातील सर्व प्रकारच्या खेळाडूंसाठी आता लवकरच दोन अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उपलब्ध होत असून त्यांचे काम वेगाने प्रगतीपथावर आहे. या अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधून सर्व आवश्यक व अद्यावत सुविधा खेळाडूंना मिळणार असल्याने याचा लाभ सर्व खेळाडूंनी घ्यावा. बुद्धिबळपटू देवेंद्र वैद्य यांनी मिळवलेले यश अभिमानास्पद असून त्यांनी नगरचे नावलौकिक सातासमुद्रापार वाढवले आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

मलेशियामधील कुआलालंपुर येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय आशियाई पॅसिफिक गेम्स २०२४ या २१ देशांचा सहभाग असलेल्या स्पर्धत बुद्धिबळ क्रीडा प्रकारात भारतीय संघाने कर्णधार देवेंद्र वैद्य यांच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ पदक पटकावले आहे. भारतीय संघाने कर्णधार देवेंद्र वैद्य हे अहिल्यानगरचे आहेत. त्यांच्या या यशाबद्दल नगरकरांच्या वतीने आ.संग्राम जगताप यांनी त्यांचा सत्कात करून अभिनंदन केले. यावेळी माजी नगरसेवक विपुल शेटिया, अनिल लोखंडे व प्रकाश भागानगरे, मर्चंट बँकेचे संचालक कमलेश भंडारी व संजय चोपडा, दिव्यांग राज्य पुरस्कार विजेते अजय गांधी, बुद्धिबळ क्रीडा मार्गदर्शक चेतन कड आदी उपस्थित होते.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना; प्राप्त अर्जांची त्रुटी पूर्तता करणेबाबत आवाहन

छत्रपती संभाजीनगर : शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालय व तंत्रनिकेतनांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह योजनेत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यात आली आहे. छाननीअंती त्रुटी असलेल्या मुलींच्या प्राप्त अर्जाची यादी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मुलींचे शासकीय वसतिगृह बी–५ ज्ञानपीठ कॅम्पस, बालभारती कार्यालयाजवळ, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर व मुलांच्या प्राप्त अर्जांची यादी मुलांचे शासकीय वसतिगृह ज्ञानकॉम टेक्नो पार्क, गरवारे स्टेडियम समोर, सिडको छत्रपती संभाजीनगर येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**उपविभागीय अधिकारी कार्यालय सिल्लोड, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.२०२४/अपील/सिआर–४९/२०२३/काबी–१२६ दि. : ११.१२.२०२४

### जाहीर नोटीस

१) चंद्रकलाबाई डोंगरु निकम रा.नगर देवळा ता.पाचोरा जि. जळगाव

.... प्रतिअपीलार्थी क्र. ०१

विषय :– महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, अजंदार रमेश डोंगरसिंग निकम रा. उप्पलखेडा (अंतुर) ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास अर्जासोबत मा. अप्पर जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचेकडील प्रकरण क्र. २०२०/अपील–एमएलआरसी/सीआर–६९ निर्णय दिनांक २९.०३.२०२३ सादर करुन सदरील निर्णयाप्रमाणे या कार्यालयाचे मुळ अपील क्रमांक २०२०/अपील/सीआर–कावि १२३ निर्णय दिनांक १७.०१.२०२० पुर्नः स्थापीत करणे बाबत विनंती केली आहे. प्रकरणात दिनांक १०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अपिलार्थी यांचे विधिज्ञ यांनी हजर राहुन प्रतिअपिलार्थी कमांक १ यांना नोटीस तामिल होत नसल्याने दैनिक तरुण भारत या दैनिका व्दारे जाहीर प्रिसिध्द नोटीस काढणे बाबत विनंती केलेली आहे. अपिलाथी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

करीता प्रकरणात दिनांक ३१.१२.२०२४ रोजी दुपारी २:०० वाजता तहसिल कार्यालय सोयगाव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर येथे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. तेंव्हा उक्त तारखेस व वेळी आपण स्वतः अथवा विधिज्ञांमार्फत सुनावणीस हजर राहून आपले लेखी म्हणणे, तोंडी युक्तिवाद व पुरावे सादर करावे, नसता प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी,

नोटीसीची एक प्रत घेऊन, दुसरी दिनांकीत स्वाक्षरीत्तह परत करावी,

उपविभागीय अधिकारी, सिल्लोड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर**

एम ए आर जे आय नं.४८४/२०२४

अर्जदार : १) अतुल बाबासाहेब वायसळ, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण रा. रामेश्वर मंदिराजवळ कायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) शितल पि. बाबासाहेब वायसळ, वय २४ वर्षे, धंदा शिक्षण रा. रामेश्वर मंदिराजवळ कायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) ऋतुजा पि. बाबासाहेब वायसळ, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण रा. रामेश्वर मंदिराजवळ कायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) लताबाई भ्र. बाबासाहेब वायसळ, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. रामेश्वर मंदिराजवळ कायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र.१ ते ४ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. पी.डी. देशपांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ चे प्रति नामे बाबासाहेब लक्ष्मण वायसळ हे मौजे कायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहे व अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत व अर्जदारांनी मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप अथवा ऊजर हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तीक किंवा त्यांचे विधिज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात हेअरशिप प्रमाणपत्र जारी करेल. करीता हे जाहीर प्रगटन आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

दिनांक :– १८/१२/२०२४

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश क. स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि. अर्ज क्र. ५८३ /२०२४

अर्जदार : १) बाबासाहेब पि, खंडू शेलार, वय ४६ वर्षे, धंदा शेती, २) भिमराज पि. खंडू शेलार, वय ४२ वर्षे, धंदा शेती, ३) अंकुश पि. खंडू शेलार, वय ४० वर्षे, धंदा शेती, ४) परमेश्वर पि. खंडू शेलार, वय ३६ वर्षे, धंदा शेती, ५) सोजराबाई भ्र. खंडू शेलार, वय ७१ वर्षे, धंदा शेती वरील सर्व रा. वसुसायगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेबाबत..

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विधिज्ञ एम. बी. गुडदे यांचेमार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ५ यांचे पती खंडू नारायण शेलार हे दिनांक ११/१०/२०१४ रोजी मौजे वसुसायगाव पो, रांजणगाव पोळ ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. तसेच मयत खंडू नारायण शेलार यांच्या आई भागूबाई नारायण शेलार ही सन १९८७ साली तर वडील नारायण मनाजी शेलार हे साल सन १९७७ साली मयत झालेले आहेत, मयत खंडू नारायण शेलार यांना मुलगी नाही, त्यामूळे वरील अर्जदारांशिवाय मयत खंडू नारायण शेलार यांना कोणीही वारस नाही, अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहे. मयत खंडू नारायण शेलार यांच्या पश्चात शासकीय–निमशासकीय बाबींचा लाभ अर्जदारांचा मिळावा म्हणून तसेच भविष्यात काही अडचण येवू नये म्हणून अर्जदारांना मयत खंडू नारायण शेलार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे आहे. करीता अर्जदारांनी मयत खंडू नारायण शेलार यांचे वारस असल्याबाबतचे कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी या न्यायालयास केली आहे.

त्याअर्थी वरील अर्जदारांच्या नावे मयत खंडू नारायण शेलार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत/आक्षेप असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा त्यांच्या विधिज्ञामार्फत हजर होवून आपले आक्षेप/हरकत मांडावे नसता कुणाचीही हरकत/आक्षेप नाही असे समजून वरील अर्जदार हे मयत खंडू नारायण शेलार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाप्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता आज दिनांक १८/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात येत आहे.

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ५८६/२०२४

अर्जदार : १) सुमन भ्र. अशोक धुमाळ, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. खादगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) संदिप अशोक धुमाळ, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. खादगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मिनाबाई संजय तायडे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. देवळी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सविता शिवाजी परकाळे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा. पोटुळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. जी.बी. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे नात्याने सख्खे बहिण भाऊ असुन अर्जदार क्र१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे अशोक आसाराम धुमाळ हे मौजे खादगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक १९/०४/२०२४ रोजी मौजे खादगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत अशोक आसाराम धुमाळ यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०१/०२/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक १८/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 468/2024

अर्जदार : लक्ष्मीबाई चंद्रभान रावते, रा.शहापुर बंजर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार यांचे पती नामे चंद्रभान तुकाराम रावते यांचा दि.१८/०२/२०२३ रोजी मौजे आसेगाव, शहापुर बंजर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत चंद्रभान तुकाराम रावते यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत चंद्रभान तुकाराम रावते यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अंर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्यानी आज दिनांक १८/११/२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी– १/ जन्म–मृत्यु नोंद/मिजार–५१४

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक १६/१२/२०२४

अर्जदार : जयश्री पप्पू ढवळे रा समर्थ नगर ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म–मृत्यु अधिनियम १९६१चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी धनश्री पप्पू ढवळेच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी धनश्री पप्पू ढवळेचा जन्म दिनांक २७–०९–२०१५ रोजी पिशोर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी धनश्री पप्पू ढवळेचा जन्म दिनांक २७–०९–२०१५ रोजी पिशोर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी धनश्री पप्पू ढवळेचा जन्म दिनांक २७–०९–२०१५ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १५–०१–२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २७–०९–२०१५ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १६/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

**बुलडाणा अर्बन को–ऑप क्रेडिट सोसायटी म. बुलडाणा र.न. २६७ (मल्टीस्टेट) शाखा : सिल्लोड**

### जाहीर लिलाव

बुलडाणा अर्बन को–ऑप क्रेडिट सोसायटी म. बुलडाणा र.न. २६७ शाखा सिल्लोड येथील गोदाम मध्ये ठेवलेला माल सोडवण्याबाबत वारंवार कर्जदार यांना सूचना / नोटिस देऊन सुद्धा कर्जभरणा न केल्यामुळे गोदाम मधील ठेवलेल्या त्यांच्या मालाचा लिलाव आहे ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत करावयाचा आहे. तरी इच्छुकांनी लिलावात भाग घेण्याकरिता वेळेवर उपस्थित रहावे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | मालाचा प्रकार | मालाची संख्या | अंदाजे वजन क्विंटल | मालाचे लिलावाचे ठिकाण व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेख मुजाहिदोद्दीन शेख नजमोद्दीन मु.पो.ता. भोकरदन, जिल्हा. जालना | सोयाबीन | ४१३ कट्टे | २२७ क्वि. | गोदाम कार्यालय, पिंप्री शिवार, गट नं.१९ भोकरदन रोड सिल्लोड दि.: २३/१२/२०२४ वारः सोमवार वेळ. सकाळी ११ वाजता |
| २. | शेख मुजाहिदोद्दीन शेख नजमोद्दीन मु.पो.ता. भोकरदन, जिल्हा. जालना | सोयाबीन | २७९ कट्टे | १५३ क्वि. | |
| ३ | एम.एन.एस ट्रेडर्स (प्रो.प्रा.शेख मुजाहिदोद्दीन शेख नजमोद्दीन) मु.पो.ता. भोकरदन, जिल्हा. जालना | सोयाबीन | २९१ कट्टे | १६० क्वि. | |
| ४. | एम.एन.एस ट्रेडर्स (प्रो.प्रा. शेख मुजाहिदोद्दीन शेख नजमोद्दीन) मु.पो.ता. भोकरदन, जिल्हा. जालना | सोयाबीन | ३५५ कट्टे | १९५ क्वि. | |
| ५. | एम.एन.एस ट्रेडर्स (प्रो.प्रा. शेख मुजाहिदोद्दीन शेख नजमोद्दीन) मु.पो.ता. भोकरदन, जिल्हा. जालना | सोयाबीन | ३९८ कट्टे | २३८ विव. | |
| ६. | एम.एन.एस ट्रेडर्स (प्रो.प्रा.शेख मुजाहिदोद्दीन शेख नजमोद्दीन ) मु.पो.ता. भोकरदन, जिल्हा. जालना | सोयाबीन | ४३५ कट्टे | २४७ क्वि. | |
| ७. | महेर ड्रिप सिस्टम्स (प्रो. प्रा. वर्षा रवी बोडखे) मु.पो.ता.फुलंब्री, जिल्हा. छत्रपती संभाजीनगर | ठिबक नळी बंडल | १६० नग | ८०००० मीटर | |
| ८. | महेर ड्रिप सिस्टम्स (प्रो. प्रा. वर्षा रवी बोडखे) मु.पो.ता. फुलंब्री, जिल्हा, छत्रपती संभाजीनगर | ठिबक नळी बंडल | २०० नग | १००००० मीटर | |

टीपःवरील लिलावाच्या अटी व शर्ती तसेच सदर मालाचा नमूना शाखा कार्यालय सिल्लोड येथे कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

स्वाक्षरीत/–
विभागीय व्यवस्थापक,
बुलडाणा अर्बन को– ऑप क्रेडिट सोसायटी म.
बुलडाणा र.न. २६७ (मल्टीस्टेट)
विभाग सिल्लोड

## संक्षिप्त वृत्त...

### प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा संयुक्त उपक्रम

**नागपूर,/प्रतिनिधी-** कृत्रिम बुध्दिमत्ता आणि पत्रकारिता या विषयावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांचे उद्या बुधवार दिनांक १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रेस क्लब येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

प्रेस क्लब ऑफ नागपूर व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारितेमध्ये होत असलेल्या कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर या विषयावर आयोजित व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार व माजी राज्य माहिती आयुक्त श्री. राहुल पांडे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रेस क्लब ऑफ नागपुरचे अध्यक्ष श्री. प्रदीप मैत्र तसेच नागपूर व अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे यांनी केले आहे.

### पेडगावात पेव्हर ब्लॉक रस्ता कामाचे उदघाटन

**परभणी / प्रतिनिधी-** माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या मार्गदर्शनाखाली पाच लक्ष निधीतून मंजूर झालेल्या पेव्हर ब्लॉक रस्ता कामाचे मंगळवारी (दि.१७) हनुमंत पाटील हत्तरवाडीकर यांच्या हस्ते नारळ फोडून उद्घाटन करण्यात आले.

येथिल सचिन सराफ यांच्या घरापासून रोहन आसोरे यांच्या घरा दरम्यान हा रस्ता होणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पाथरी विधानसभा अध्यक्ष संतोष देशमुख, चेअरमन दिपक काका देशमुख, बाळासाहेब देशमुख, सरपंच आशिष हरकळ, ग्रा.पं. सदस्य दिपक देशमुख, गोपाळ देशमुख, प्रशांत हरकळ, सतिश सुरवसे, पुरशोत्तम देशमुख, तुकाराम असोरे, राजाभाऊ जंगले, रामदास शिंदे, सचिन सराफ, नितिन देशमुख, गोविंद शिंदे, राजेश पांचलेगावकर , स्वप्निल देशमुख,अर्जुन शिंदे, प्रकाश हरकळ यांची उपस्थिती होती. दरम्यान, आपल्या गावात होत असलेल्या या कामावर आपण लक्ष ठेवावे व होत असलेल्या कामाबद्दल काही सूचना किंवा तक्रार असल्यास ग्रामपंचायत कार्यालयात तोंडी अथवा लेखी स्वरूपात कळवावी तसेच होत असलेले काम दर्जेदारच होईल याची दक्षता घ्यावी, असे आवाहन ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आले आहे.

### २४ डिसेंबरला राष्ट्रीय ग्राहक दिन

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात येत्या मंगळवारी (दि. २४) राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी २४ डिसेंबर रोजी हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार जिल्हा प्रशासनकडून जिल्हाधिकारी कार्यालयात येत्या मंगळवारी दुपारी १२.३० वाजता साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमात ग्राहक हितांचे संरक्षण व जनजागृतीवर मान्यवरांचे चर्चासत्र आयोजन करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### गॅस सिलेंडरचा स्फोट; घर जळून खाक

**पाथरी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील बोरगव्हाणे येथे मंगळवारी (दि.१७) दुपारच्या सुमारास घरगुती वापराच्या सिलेंडरचा स्फोट झाला. या स्फोटात संसार उपयोगी साहित्या व सोन्याच्या दागिण्यासह संपूर्ण घर जळून खाक झाले.

बोरगव्हाण येथील अर्चना शामराव खुडे यांच्या राहत्या घरात हा गॅसचा स्फोट झाला. यावेळी घरावरील सर्व लोखंडी पत्रे यावेळी उडून पडली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले होते. यावेळी त्यांनी अथक परिश्रम घेत आग आटोक्यात आणली. परंतु, या आगीत खुडे यांच्या घरातील संसारोपयोगी साहित्या व सोन्याच्या दागिण्यासह संपूर्ण घर जळून खाक झाले. सुदैवाने घरातील सर्व सदस्य मंगळवारी कामानिमित्त शेतात गेले होते. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

### अपघातात ऊसतोड कामगाराचा मृत्यू

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** महातपुरी फाट्यापासून जवळच भांबरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगळवारी (दि.१७) सकाळी १० वाजता ट्रॅक्टर व दुचाकीच्या समोरासमोर धडकेत २६ वर्षीय ऊसतोड कामगाराचा मृत्यू झाला.

बाळू काशिनाथ राठोड (रा. पोहंडूळ तांडा ता. सोनपेठ) हा ऊसतोड कामगार महातपूरी फाटा येथून दुचाकीवर उसाच्या फडात जाण्यासाठी निघाला होता. त्यावेळी महातपुरी फाट्यापासून जवळच भांबरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर राठोड यांच्या दुचाकीची व समोरुन येणाऱ्या ट्रॅक्टरची जोरदार धडक झाली. यावेळी चालकाने ट्रॅक्टरसह घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच गंगाखेड पोलिस ठाण्याचे सपोनि शिवाजी सिंगणवाड, चालक सुग्रीव सावंत यांनी घटनास्थळी धाव घेतली. रावण भालेराव, हनुमान इंगळे यांनी स्थानिक लोकांच्या मदतीने खाजगी रुग्णवाहिकेतून जखमी राठोड यास गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिल्पा टाके, अधिपरिचारिका प्रज्ञा जोगदंड, संगिता लटपटे, गोविंद वडजे आदींनी जखमीस तपासून मयत घोषित केले. दरम्यान, मयत राठोड याच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.

# तिघा पोलिस अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवा

## अॅड.धर्मपाल मेश्राम यांची सुचना : पोलिस व महसूल यंत्रणेवर जोरदार टिका

**परभणी,/प्रतिनिधी:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीच्या तोडफोडीच्या पार्श्वभूमीवर उसळलेल्या हिंसक घटनांना पोलिस यंत्रणाच कारणीभूत असल्याचे मत राज्याच्या अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सचिव (सचिव दर्जा) अॅड. धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त केले. कायदा व सुव्यवस्था राखण्यात दिरंगाई केल्याबद्दल तीघा पोलिस अधिकाऱ्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत पोलिस यंत्रणेने सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी सूचना केली.



महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य अॅड. मेश्राम हे मंगळवार व बुधवारी दोन दिवस परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यातून अॅड. मेश्राम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. घटनास्थळाची पाहणी केली. तसेच विविध पक्ष, संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाबरोबरही हितगूज केले. सर्वसामान्य नागरीकांच्याही प्रतिक्रिया ऐकून घेतल्या. त्या पाठोपाठ जिल्हाधिकारी, प्रभारी जिल्हा पोलिस अधिक्षक, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांच्याबरोबर स्वतंत्रपणे बैठकीतून हितगुज केले. या साऱ्यांचे म्हणणे ऐकले. त्यानंतर माध्यमांच्या प्रतिनिधींबरोबर बुधवारी दुपारी संवाद साधला.

यावेळी अॅड. मेश्राम यांनी ज्येष्ठ नेते विजय वाकोडे यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली. या घटनेत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूबद्दल संवेदना व्यक्त केली. १० ऑक्टोंबर रोजीच घडलेल्या या घटनेबद्दल आयोगास १२ ऑक्टोंबर रोजी माहिती मिळाली. १३ ऑक्टोंबर रोजी आयोगाद्वारे आपण जिल्हा पोलिस अधिक्षक व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून सविस्तर अहवाल मागविला. त्या पाठोपाठ आपण दोन दिवस सुट्टीचे अपवाद लगेचच दोन दिवशीय जिल्हा दौरा केला. त्यातून संविधानाच्या अवमानाची दुर्दैवी घटना, त्या पाठोपाठ हिंसक घटनांचा विषय समजून घेतला. विषयाचे गांभीर्य ओळखले, असे ते म्हणाले.

विकृत मनोवृत्तीच्या व्यक्तीने भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड केल्याची घटना निश्चितच दुर्दैवी आहे. त्याचबरोबर या घटने पाठोपाठ संभाव्य स्थिती ओळखून यंत्रणेद्वारे सर्वतोपरि खबरदारी घ्यावयाची गरज होती. दुर्दैवाने सरकारी यंत्रणेने त्या संबंधिची काळजी घेतली नाही. काही गोष्टी संयमीपणाने व संवेदनशीलपणे हाताळल्या हे खरे, परंतु कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलिस प्रशासन अपयशी ठरले, अशी खंत अॅड. मेश्राम यांनी व्यक्त केली.

संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड झाल्या पाठोपाठ संबंधित आरोपीस पकडल्यानंतर त्याच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाल्यानंतर या विषयात अज्ञात शक्तींनी शिरकाव करावा, हिंसाचार घडवावा ही गोष्टच आपणास प्रामुख्याने खटकली आहे. सामाजिक सलोखा जाणिवपूर्वक बिघडविण्याचा हा प्रकार संतापजनक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हिंसा मान्य नाही. त्यांचा संविधान आणि कायद्यावरच मोठा विश्वास होता. म्हणूनच परभणीतील या हिंसक घटना निश्चितच संशोधनाचा विषय आहे. त्यामागे कोणत्या शक्ती होत्या. आंदोलन चिघळले कसे, या गोष्टीचा निश्चितच सरकारी यंत्रणेने कसून तपास केला पाहिजे, त्यासाठी मूळापर्यंत गेले पाहिजे, असे ते म्हणाले.


सामाजिक दरी हळूहळू कमी व्हावी असे सर्वार्थाने प्रयत सुरु असतांना अशावेळी सामाजिक दरी विस्तारावी या दृष्टीने होणारे हे प्रयत गंभीर आहेत, या प्रकरणात शांतता व सुव्यवस्था, सलोखा राखतांना राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी व्यापक दृष्टी ठेवणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

सरकारी यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर घेतलेल्या बैठकीतून काही गंभीर गोष्टी आपल्या निदर्शनास आल्या आहेत. विशेषतः पोलिसांच्या गाडीवर उभे राहून केल्या गेलेले बंदचे आवाहन, हिंसक घटनेत अटक केल्यानंतर सोमनाथ सूर्यवंशी या युवकास पोलिसांनी केलेल्या मारहाणीचा निर्दयी प्रकार हे पोलिस यंत्रणा असो, पोलिस अधिकाऱ्याच्या अपरिपक्कपणाचे उदाहरण आहे, असे नमूद करीत त्या गोष्टीचे गांभीर्य प्रशासनास किंवा संबधित अधिकाऱ्यास कळालेच नाही, हे आश्चर्यकारक आणि दुर्देवी आहे, असे ते म्हणाले. परभणीतील या एकंदरीत प्रकरणात तीन पोलिस अधिकाऱ्यांना केलेल्या अक्षम्य दिरंगाईबद्दल सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी सूचना अॅड. मेश्राम यांनी केली.

## भारतीय स्त्रियांनी कुटूंब एकत्र ठेवले- नायगावकर

### मिश्किली हास्य कवितांच्या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू,/प्रतिनिधी :** एकत्र कुटुंब पद्धतीत संवाद होता. नात्यांची वीण घट्ट होती. एकत्र कुटुंब पद्धती ही भारताची ताकद आहे. स्त्रियांनी कुटुंब एकत्र ठेवले आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध हास्य कवी अशोक नायगावकर ( मुंबई ) यांनी केले.



शहरातील साई नाट्यगृहात सोमवार ( दि. १६ ) रोजी माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे मित्रमंडळाच्या वतीने प्रसिद्ध हास्य कवी अशोक नायगावकर यांच्या मिश्किली हास्य कवितांच्या कार्यक्रमास श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अशोक नायगावकर यांनी श्रोत्यांशी मिश्किल संवाद साधत आपल्या विनोदी शैलीत सादर केलेल्या विडंबनाने सेलूकर रसिकांना खळखळून हसवले. तर गंभीर कवितांनी अंतर्मुखही केले. राजकीय चर्चेवर व्यंगात्मक टिका करताना ते म्हणाले की, कालच गटार आजच्या पेक्षा स्वच्छ होते. त्यांनी टिळकांशी संवाद, माय, गाव आणि शहराचे बदलते चित्र स्पष्ट करणारी तेव्हा आणि आता, बहिणाबाई, मिळवती, कर्जमाफी वर्ड बँकेला या कविता सादर केल्या. त्यांची डावे आणि उजवे ही कविता श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेऊन गेली. त्यांच्या स्टेन या शहरात टाकले पण बघ पुन्हा बायपास करावेच लागले या कवितेतील ओळीने वास्तव परिस्थितीची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. स्वागतपर मनोगत माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. हेमचंद्र हडसनकर यांनी करून दिला. सुत्रसंचलन संध्या फुलपगार यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुभाष मोहकरे यांनी केले.



**जिंतूर-सेलु विधानसभेच्या आमदार सौ मेघना बोर्डीकर साकोरे यांची आमदारपदी दुसऱ्यांदा निवडुन आल्याबदल व महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतानां दै.तरुण भारतचे रामप्रसाद कंठाळे दिसत आहेत.**



**परभणी- नागपूर हिवाळी अधिवेशन २०२४ साठी माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर यांच्या समवेत प्रभाकर वाघीकर, सुनिल भोंबे पाटील आणि बाळासाहेब मते आदी दिसत आहेत.**

## डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत नेताजी सुभाष विद्यालयाचे यश

**मानवत/प्रतिनिधी-** नेताजी सुभाष शिक्षण संस्थेच्या नेताजी सुभाष माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयातून १२ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते त्यापैकी ११ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.



१प्रणव इटवाले २समृद्धी माकुडे ३पायल रोकडे ४कृष्णा काळे ५अंजली वाडकर६ प्रतीक ढगे ७आदित्या लिपणे ८इरम फातिमा युनूस ९रुद्रा गरुड १०अभिषेक मगर ११नंदराज शेळके पैकी दोन विद्यार्थी पुढील परीक्षेस पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक गजानन बाराहाते व सुचिता कल्याणकर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थ्या व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक एस जी लाड सर ,यु टी हरकळ सर, उपमुख्याध्यापक विश्वनाथ बुधवंत , शिवराज नाईक,आदी मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थी व पालकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी एस के ढगे सर एस ए होगे. गरुड सर बिरादार सर एबी मुळे मॅडम कुसुम कनकुटे मॅडम सखाराम नाईक सारडा सर शेख सर जाधव सर काचगुंडे सर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व सर्व मान्यवरांचे आभार एस ए होगे यांनी केले.



## विद्या प्रसारणी सभेच्या अध्यक्षपदी डॉ. विनय वाघमारे यांची निवड

**पूर्णा,/प्रतिनिधी-**विद्या प्रसारणी सभा शिक्षण संस्थेचे अध्यक्षपदी डॉ. विनय दत्तात्रय वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

संस्था स्थापनेपासून त्यांचे वडील दत्तात्रय वाघमारे हे या संस्थेचे अध्यक्ष होते, त्यांच्या सेवाकार्याचा सन्मान करत त्यांच्या प्रकृती अस्वास्थामुळे या संस्थेने ही जबाबदारी डॉ. विनय वाघमारे यांच्यावर सोपवली. संस्थेच्या उर्वरित कार्यकारणीतील सचिव विजयकुमार रुद्रवार, श्रीनिवास काबरा उपाध्यक्ष भीमराव कदम, उत्तमराव कदम ,साहेबराव कदम,के. एल. काकडे ,विद्याताई पवार ,ज्ञानदेव रणमाळ ,वसंतराव लासुरे, डी .एफ गायकवाड , मुख्याध्यापक डी .एल उमाटे व मुख्याध्यापक एस .आर हिंगणे,यांनी नवनियुक्त अध्यक्षांचे स्वागत केले.

## दोषी पोलिस अधिकाऱ्यांना निलंबीत करा- आ.पवार

**परभणी,/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृतीचा अवमान करणारी निषेधार्ह घटना आणि त्यानंतरच्या घटनाक्रमात सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यू प्रकरणाची निष्पक्षपणे न्यायालयीन चौकशी करून जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.



आ. पवार यांनी मंगळवारी सकाळी परभणीत येऊन मयत सोमनाथ सुर्यवंशी याच्या आई व भावाची भेट घेतली. तसेच सोमवारी सायंकाळी ऱ्दयविकाराने निधन झालेले आंबेडकरी चळवळीतील नेते विजय वाकोडे यांचे अंत्यादर्शन घेतले. त्यानंतर संपुर्ण घटनाक्रमाबाबत सामाजिक कार्यकर्त्यांकडून माहिती घेऊन जिल्हाधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. त्यानंतर आ.पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवक्ते विकास लवांडे, प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्तीअंबिरे, मराठवाडा शिक्षक सेलचे विभागीय अध्यक्ष प्रा.किरण सोनटक्के, संतोष बोबडे, कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, अजय गव्हाणे, विकास लंगोटे, रमाकांत कुलकर्णी, रितेश काळे, डॉ.अनिल कांबळे, सरचिटणीस गंगाधर यादव, आतिश गरड आदी उपस्थित होते.

संविधान प्रतिकृतीच्या अपमान करणाऱ्या घटनेनंतर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आणि या निषेधार्थ लोकशाही मार्गाने बंद आंदोलन पुकारण्यात आले होते. आंदोलन शांततेने सुरू असताना बाहेरून आलेल्या तोंड बांधून धुडगूस घालणाऱ्या मंडळींनी जाळपोळ, दगडफेक करून दंगल घडविल्याचा आरोप करत पोलीस प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्याना गाफील ठेवून सर्वसामान्य लोकांवर लाठीचार्ज करून कोम्बिंग ऑपरेशन केले. बेकायदेशीरपणे दलित वस्त्यांना लक्ष्य करीत अत्याचार करणाऱ्या पोलिसी कार्यपद्धतीमुळेच सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीत दुर्देवी मृत्यू झाला. सोमनाथ सूर्यवंशी याचा न्यायालयीन कोठडीमध्ये झालेला मृत्यू आणि १० डिसेंबरच्या घटनेसह संपूर्ण घटनाक्रमाची न्यायालयीन व निष्पक्ष चौकशी चौकशी करावी, दोषी प्रशासन व पोलीस अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई करावी, सोमनाथ सूर्यवंशी याच्या कुटुंबास आर्थिक मदत करावी, हिंसाचारातील नुकसानग्रस्त नागरिकांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी पवार यांनी यावेळी केली.

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते दिवंगत विजय वाकोडे हे शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रशासनासोबत राहून प्रयत करत असताना हिंसाचार प्रकरणात त्यांना प्रमुख आरोपी करण्यात आल्याच्या प्रकाराबद्दल त्यांनी पोलिस प्रशासनावर टीका केली.

### ५४ गावाच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सोडवू- आ.राजेश विटेकर

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी विधानसभा मतदारसंघातील परभणी व मानवत तालुक्यातील ५४ गावच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सोडवू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

आ.राजेश विटेकर यांनी मंगळवारी (दि.१७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी विधानसभा मतदारसंघातील परभणी व मानवत तालुक्यातील ५४ गावांना पिण्याचे पाणी व सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्य अभियंता यांना आदेशित अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित कामात सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरात लवकर ५४ गावाच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रताकर गुट्टे, मानवतचे सभापती पंकज आंबेगावकर, डॉ.अंकुश लाड यांची उपस्थिती होती.

# खूनाच्या गुन्ह्यातील कोठडीतील आरोपीला व्हीडीओ कॉल लावून देऊन सोन्याची चैन विक्री करून रकमेचे गमन

## गोरेगाव पोलिस ठाण्यातील तपासी अधिकारी, कर्मचारी यांचा प्रताप, नातेवाईकांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर.**
सख्ख्या भावाच्या खूनप्रकरणी पोलिस कोठडीत असलेल्या आरोपीशी गोरेगाव पोलिस ठाण्यातील तपासी अधिकारी व कर्मचारी यांनी संगणमत करून गुन्ह्यासाठी पैशाची तजवीज करण्यासाठी गहाण ठेवण्यात आलेली सोन्याची चैन विक्री करण्यासाठी पोलिसांनी कोठडीतील आरोपीला व्हीडीओ कॉल करायला लावून सदरील रकमेचे गमन केल्याचा आरोप शेगाव खोडके येथील नारायण खोडके यांनी केला असून याप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे निवेदनकर्त्यानी पोलिस अधीक्षक यांना सीसीटीव्ही फुटेजही सादर केले आहेत.

याबाबत अधिक माहीती अशी की, आरोपी हरिभाऊ किसन खोडके याने त्याचा सख्खा भाऊ शिवाजी किसन खोडके यास शेतीच्या वादातून खून केल्याची कबुली दिली होती. या खूनात त्याचा साथीदार पवन आखाडे यानेही त्याला मदत केली होती. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने शिवाजीचा मृतदेह शेता-तील ओढ्यामध्ये बांबूच्या बांधाजवळ खड्ड्यात पुरला, अशी कबुली आरोपी हरिभाऊ किसन खोडके याने गोरेगाव पोलिस ठाण्यात स्वत: दिली. त्यानंतर गोरेगाव पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन पंचनामा करीत आरोपी हरिभाऊ खोडके आणि पवन आखाडे यांना न्यायालयासमारे हजर केले होते. न्यायालयाने दोघांना ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. अजूनही दोन्ही आरोपी पोलिस कोठडीतच आ-हेत. पोलिस कोठडीत असतांना पोलिसांनी नियमांची पायमल्ली करीत कायदा हातात घेत आरोपीशी संगनमत करून कटकारस्थान रचून दोन्ही आरोपींना हाताशी धरून शिवाजीचा खून करण्याकरिता केलेल्या रकमेची तरतुदीत आरोपीने त्याच्या घरातील सोन्याची चैन सोनाराकडे गहाण ठेवली होती. सदरील सोन्याची चैन पोलिसांनी आरोपीसोबत संगनमत करून आरोपीला पोलिस कोठडीत असतांना मोबाईल पूरविले. आणि त्यावरून व्हीडीओ कॉल करून तसेच एका त्रयस्थ व्यक्तीला संबंधित सोनाराकडे पाठवून सोन्याच्या चैनमधून उर्वरित रक्कम परस्पर सोनाराकडून घेवून आरोपी आणि पोलिस यांनी गमन केले आहे. त्यामुळे शिवाजीचा खून प्रकरणी नियुक्त केलेल्या भ्रष्ट तपासी पोलिस अधिकारी यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच शिवाजी यांच्या खूनाचा तपास पारदर्शक व्हावा, सोन्याची चैन परत मिळावी आदी मागण्या पोलिस अधीक्षक श्रीकृषण कोकाटे यांच्याकडे दिलेल्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. या घटनेमुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, याप्रकरणाची तत्काळ चौकशी करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिले असून दोषींवर निश्चित कारवाई होणार असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

## शिवाजीमध्ये डॉ पंजाबराव देशमुख यांच्यावर व्याख्यान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**
येथील शिवाजी महाविद्यालयात आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी जि. अमरावती व शिवाजी महाविद्यालय, हिंगोलीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख: जीवन व कार्य या विषयावर महात्मा फुले महाविद्यालय, वरूड येथील प्रमुख वक्ते डॉ. चत्रभूज कदम बोलत असताना म्हणाले की, भाऊसाहेबांचे कार्य जनमानसाच्या उद्धाराचे होते.

महापुरुषाचे जीवन चरित्र वाचनाने माणसाचे जीवन समृद्ध होते. आपल्या महाराष्ट्रात संत व समाज सुधारकांनी समाज प्रबोधनाची मोठी चळवळ अभी केली. त्यातील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुखांनी देशभर सामाजिक, कृषीविषयक व शैक्षणिक क्रांती करून बहुजन समाजाला विकासाचा, कृषी विस्ताराचा व शिक्षणाचा मंत्र त्यांनी दिला. त्यांनी केलेले कार्य देशासाठी मोलाचे व जनमानसाच्या उद्धाराचे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. शिवाजीराव पवार उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी या देशात पहिल्यांदा लोकविद्यापीठाची स्थापना करून बहुजन समाजाच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. श्रद्धानंद वसतिगृहाची स्थापना करून गरजू विद्यार्थ्यांना निवासाची सोय उपलब्ध करून दिली. त्यामुळे भाऊसाहेब देशमुख हे तळागाळातील नागरिकांसाठी संजीवनी देणारे आहे. भाऊसाहेबांच्या या श्री शिवाजी शिक्षण संस्थेअंतर्गत होत असलेल्या या उपक्रमांची व कार्याची माहिती आपल्या प्रास्ताविकातून श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी येथील प्राचार्य डॉ. जी. एन. चौधरी यांनी मांडली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. चौधरी व डॉ. कदम यांनी भाऊसाहेबांचा चरित्र ग्रंथ देऊन मा. शिवाजीराव पवार यांचा सत्कार केला. अध्यक्षीय भाषणात मा. शिवाजीराव पवार यांनी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी विदर्भात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रूपाने केलेल्या शैक्षणिक क्रांतीने संपूर्ण देश भारावून गेला आहे. समाज उत्थानाची त्यांची तळमळ अधोरेखित करून त्यांचे देशाला मोठे योगदान लाभले असल्याचे मत या प्रसंगी त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे यांनी केले. आभार डॉ. सुनील कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, विद्यार्थिनी प्राध्यापक वृंद व प्रशासकिय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- संकष्ट चतुर्थी निमित्त येथील विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### होमीभाभा परीक्षेत सांदीपनीचे घवघवीत यश



हिंगोली- डॉ होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४: डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा ही मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशनची एक प्रतिष्ठित स्पर्धा आहे जी १९८१ पासून चालवली जाते आहे. इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या शाळांच्या ६ व्या आणि ९ व्या इयत्तेतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचार आणि ज्ञान वाढवणे हे तिचे उद्दिष्ट आहे.या परीक्षेला एकूण ६८ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ४२ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले. एकूण चार विद्यार्थी दुसऱ्या प्रात्यक्षिक परीक्षेस पात्र ठरले आहेत.दुसऱ्या फेरीस पात्र विद्यार्थी विभव जाधव,आरुष बुक्तरे,कु. तमन्ना जटाळे,आर्यन भगत या यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, शाळेचे प्रशासक मारुती मेखाले आणि शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनचे यश



हिंगोली- अॅड ग्यांनबाराव शिरसाट सेवाभावी संस्थेद्वारा संचलित राष्ट्रमाता विद्यानिकेतन शाळेतील इयत्ता नववी तील विद्यार्थी शिवराज पंडित शिरसाट याने डॉ होमी भाभा सायन्स परीक्षेत घवघवीत यश संपादन करून प्रथम परीक्षा उत्तीर्ण झाली आहे त्याबद्दल शाळेच्या वतीने व संस्थेच्या वतीने त्याचे स्वागत करण्यात आले व पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक श्री एस के डोलारे, पर्यवेक्षक एस एस बल्लाळ, प्राचार्य यु एस शेळके यांच्यासह शाळा व महाविद्यालयाचा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता.

## लिंग आधारीत हिंसाचारापासून दूर करण्यासाठी जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने हिंगाली शहरातील विनर्स कोचींग क्लासेस व निवासी वस्तीगृह येथे चाईल्ड हेल्प लाईन १०९८ कडून लिंग आधारीत हिंसाचारापासून दूर करण्यासाठी नुकतीच जनजागृती मोहीम राबवण्यात आली.

लैंगिक गुन्ह्यापासून मुलांचे संरक्षण, पोक्सो कायदा पीडित भरपाईवर लक्ष केंद्रीत करणे, चांगला स्पर्श, वाईट स्पर्श ओळखणे, निरोगी नाते संबधांना प्रोत्साहन देणे, महिला आणि मुलींच्या प्रतिष्ठेचा आदर राखणे यासारख्या विषयावर चाईल्ड हेल्पलाईन १०९८ चे प्रकल्प समन्वयक संदिप कोल्हे यांनी माहिती दिली. त्याचबरोबर बालविवाह प्रतिबंध कायदा २००६, बालविवाहाचे योग्य वय कोणते, कारणे व त्याचे दुष्परिणाम, शिक्षणाचे महत्व याबाबतची माहिती चाईल्ड हेल्प लाईनचे समुपदेशक अंकुर पाटोडे यांनी दिली. बालकांचे हक्क, अधिकार, कर्तव्य व जबाबदारी तसेच बालकांना शिक्षणाचे महत्व, बालक म्हणजे काय, बालकाने बाल वयात स्वतःची काळजी घेण्याबाबतची माहिती केस वर्कर राजरत्न पाईकराव यांनी दिली. चाईल्ड हेल्प लाईन १०९८ च्या सुपरवायजर श्रीमती धम्मप्रिया पखाले यांनी काळजी व संरक्षणाच्या दृष्टीकोनातून सदर बालकांना अडचणीच्या काळात मदत करण्यासाठी किंवा मदत मागवण्यासाठी व चाईल्ड हेल्प लाईन १०९८ बाबत माहिती दिली. तसेच चाईल्ड हेल्प लाईनचे पर्यवेक्षक श्रीकांत वाघमारे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेबाबत माहिती दिली.यावेळी विनर्स कोचींग क्लासेसचे संचालक व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

## संतोष देशमुख यांच्या हत्या करणाऱ्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपीला तत्काळ अटक करून कठोर कारवाई करावी तसेच परभणी येथील मयत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या पोलिस कोठडीतील मृत्यूची एसआयटी मार्फत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीचे निवेदन सरपंच संघटनेच्यावतीने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपी तसेच संशयीत आरोपी यांना तत्काळ अटक करून एसआयटी मार्फत चौकशी करावी तसेच दोषीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करावी तसेच संतोष देशमुख आणि सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना शासनाकडून ५० लाख रूपये आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनावर शशीकला भवर, रवी डोरले, गायत्री कोरडे, गजानन डांगे, ज्ञानबा मुटकुळे, बळीराम घुगे, सुनील किसनराव, अनुसया आगलावे, वर्षा घ्यार, वंदना निरगुडे, रामेश्वर आगलावे, बद्री खोडेकर, गजानन मांदळे, आम्रपाली जाधव, रचना जाधव, पद्मावती हानवते, गजानन माने, सुनंदा वाघमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नगर परिषदेच्या माझी वसुंधरा अभियान स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसांचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ डिसेंबर**
नगर परिषदतर्फे माझी वसुंधरा ४.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४, या अभियानाची अंमलबजावणी संपूर्ण शहरात प्रशासक तथा मुख्याधिकारी अरविंद मुंढ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा बुधवारी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

यामध्ये प्रामुख्याने भित्तीचित्रे स्पर्धा,जिंगल स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा,पोस्टर/चित्रकला स्पर्धा,शॉर्ट मुव्ही स्पर्धा,स्वच्छ वॉर्ड रँकींग स्पर्धा,टॉयक्थॅान स्पर्धा (टाकाऊ वस्तूंपासून खेळणी तयार करणे),तसेच स्वच्छता हि सेवा अंतर्गत महिलांकरिता रांगोळी स्पर्धा व जेष्ठ नागरिकांकरिता जेष्ठ नागरिक वॉकिंग स्पर्धा ई. स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. घेण्यात आलेल्या सर्व स्पर्धेस शहरातील नागरिकांनी भरपूर प्रतिसाद दिला. जवळपास २५० च्या वर स्पर्धकांनी सदर आयोजित स्पर्धेमध्ये भाग घेऊन उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे यांच्या हस्ते व मुख्याधिकारी तथा प्रशासक अरविंद मुंढे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पाडण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वसुंधरेचे संवर्धन व संगोपन करणेकरिता सर्वांनी उभे राहून हरित शपथ घेतली.यामध्ये भित्तीचित्रे स्पर्धा (१५ वर्षा खालील) गटामध्ये आरुष संदीप जैस्वाल, प्रतिक महेंद्र धाबे आणि जानव्ही नितीन हजारे, शिवराज आनंद शेळके, भित्तीचित्रे स्पर्धा (१५ वर्षा वरील गटामध्ये विष्णू जायभाये, सदानंद रत्नपारखे, किरण दत्तराव कुऱ्हे, लघु चित्रफित (शॉर्ट मुव्ही) गटामध्ये रमेश सुरेश सांडवे, चारुशील माने, विश्वजित बापूराव घोडगे, पूनम माने, जिंगल स्पर्धा (धून स्पर्धा) गटामध्ये स्वप्नील सतीश दुरगकर, शंतनू अंकुशराव पोले, उर्मिला गजानन जगताप, प्रीयांशा श्रीधर दायमा, पथनाट्य स्पर्धा गटामध्ये शाहीर इंगोले अँड पार्टी, विजय ठाकरे अँड टीम शिवाजी महाविद्यालय हिंगोली, टॉयक्थॅान स्पर्धा गटामध्ये आशिष सदाशिव मस्के, मुकेश दिलीप डहाळे, संस्कार गजानन जवंजाळे पोस्टर/चित्रकला (१५ वर्षा खालील) स्पर्धा गटामध्ये श्रेयस दिलीप धामणे, कृतिका संतोष शिंदे, सिया परमेश्वर जावळे पोस्टर / चित्रकला (१५ वर्षा वरील) स्पर्धा गटामध्ये अमोल पेभाकार सालमोठे, दुरसिंग पंडित बरेला, किरण दत्तराव कुऱ्हे रांगोळी स्पर्धा गटामध्ये (फक्त महिलांकरिता) वंदना नारायण भेणे, सुहासिनी वानखेडे, पूजा प्रमोद वाघमारे, करुणा चौधरी, सायली धनराज भूसांडे, चांदणी कुरील, रिया गडाले, गोदावरी कदम, श्रुती लोलगे सिनियर सिटीजन वॉकिंग स्पर्धा महिला गटामध्ये कांता कल्याणकर, शीतल तापडीया, पुष्पा बांगर सिनियर सिटीजन वॉकिंग स्पर्धा पुरुष गटामध्ये विजेते आहेत.बाळासाहेब हरण, कलानंद जाधव ,बाबुराव ढोकणे, स्वच्छ वॉर्ड रँकींग स्पर्धा अंतर्गत शासकीय कार्यालय प्रथम क्रमांक समाज कल्याण ऑफिस, द्वितीय क्रमांक जिल्हा कोषागार कार्यालय, तृतीय क्रमांक सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, स्वच्छ शाळामध्ये प्रथम क्रमांक सॅक्रेड हार्ट इंग्लिश स्कूल, द्वितीय क्रमांक विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल, तृतीय क्रमांक ग्लोबल पब्लिक स्कूल, स्वच्छ हॉस्पिटल गटामध्ये प्रथम क्रमांक शिवम मल्टीस्पेसीआलिटी हॉस्पिटल, द्वितीय क्रमांक लक्ष्मि लाईफ केअर हॉस्पिटल, तृतीय क्रमांक सह्याद्री हॉस्पिटल, स्वच्छ क्लिनिक गटामध्ये आदित्य स्कीन केअर क्लिनिक, स्वच्छ हॉटेल गटामध्ये प्रथम क्रमांक निर्मल कॅफे अँड रेस्टराँ, द्वितीय क्रमांक शिवम स्नॅक्स रेस्टॉरंट, तृतीय क्रमांक हॉटेल श्रीनिवास यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, शाम माळवटकर, प्रभारी नगर अभियंता प्रतिक नाईक,लेखापाल अनिकेत नाईक, देवीसिंग ठाकूर, बाळू बांगर,पंडित मस्के, काझी, आशिष रणसिंगे,विजयरामेश्वरे, पवीन चव्हाण, बाबुराव काळे, शेख साजिद,गजानन जगताप,आकाश गायकवाड, रवी जोंधळे, चेतन भूजवने, कुणाल कांबळे, अथर्व वर्मा, अजय मांडले आदींची उपस्थिती होती.